संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851

महासागर | NAGPUR POST
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English) घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २६८ * * नागपूर * बुधवार, दिनांक २५ डिसेंबर २०२४ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




संपादकीय

## खरीखरी

### जगमित्राची मित्राई

जगमित्र शुगर इंडस्ट्रीजच्या जमिनीचे काही भागीदार आहेत. त्यामध्ये क्रमांक एक धनंजय मुंडे आणि दुसरे वाल्मीक कराड यांच्या संयुक्त नावाने जगमित्रच्या म्हणजेच त्या साखर कारखान्याच्या जमिनी आढळलेल्या आहेत. सध्या वाल्मीक कराड या नावाभोवती जे काळे वलय आलेले आहे. त्याची काळी बाजू प्रख्यात समाजसेविका आणि माहिती अधिकार तज्ज्ञ अंजली दमानिया यांनी समोर आणलेली आहे. या दोन जगमित्रांच्या संयुक्त मालकीच्या 3554 गुंठे जमिनीवर हे जगमित्र उभे आहेत. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड हे दोघेही सध्या तरी संयुक्त भागीदार असल्याचे दिसत आहे. ही जमीन पुण्याजवळ गोटखिंडी येथे आहे. या ठिकाणी जमिनीचा भाव किमान ते कमाल किती आहे याची कल्पना आमच्यासारख्या पामरांना येणार नाही. अनेक जाणकार म्हणतात की या जागेची किंमत 2000 प्रति चौरस फूट पेक्षा जास्त आहे. खरे खोटे घेणारा नेताच जाणत असेल. आजकाल विशेष बातम्यांमध्ये फारसे तथ्य नसते. पण या ठिकाणी आपले मंत्री धनंजय मुंडे हे प्रत्यक्षात काम करतो आहे, असे सांगून ते काय काय करीत आहेत, याची चौकशी केलीच पाहिजे. धनंजय मुंडे कोणे एकेकाळी भाजपचे आमदार होते. ते दमदार असल्यामुळे अजूनही शानदार खेळी खेळू शकले. यामध्ये कोणतेही दुमत असण्याचे कारणच नाही. कारण धनंजय मुंडे यांच्या नावात धनही आहे आणि जयही आहे. त्यांनी राजकारणात अनेक वेळा जय मिळवलेला आहे. हा जय म्हणजे काही लपून राहिलेले रहस्य नाही. अशा एकूण वातावरणात बीड जिल्ह्यात पालकमंत्र्यांची पताका कोणाच्या हातात येते. याची प्रतीक्षा असताना अचानक एक देशमुख नामक एका गावचा सरपंच कोणीतरी काही गाव गुंडांच्या हल्ल्यामध्ये मृत्यूमुखी पडतो. या देशमुखांची या व्यवहारात कुठेतरी दखल आहे का. देशमुख एका गावचे सरपंच होते. ते त्या परिसरातील अत्यंत महत्त्वाची व्यक्ती होते यात शंकाच नाही. पण त्यांचा जीव जाईपर्यंत हा जीव जाणार आहे. हे कोणालाच समजले नाही आणि अचानक जीव गेल्यानंतर म्हणजे जीव गेल्यावर आधुनिक वाल्मिकीचे नाव आले. आधी हा वाल्या होता की वाल्मिकी होता? ते आम्हाला ठाऊक नाही किंवा ठाऊक असण्याचे कारणही नाही. पण त्या प्रकरणातील सगळ्यात महत्त्वाचे नाव धनंजय मुंडे यांचे होते. हे आता सिद्ध झालेले आहे. त्यातच हे प्रकरण गंभीर असेल किंवा नसेलही. पण या प्रकरणाला सध्या जे काही स्वरूप आलेले आहे. ते पाहता या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आहेत. या प्रकरणात जे दोषी असतील त्यांना कठोर शासन मिळेल. असे बोलले जात आहे. हे कठोर शासन कोणते. हा विचार आपण न करता त्याबाबतचा निर्णय आपले न्यायप्रिय, तडफदार आणि महाराष्ट्राच्या हितासाठी जबाबदार असलेल्या मुख्यमंत्री नामदार आणि महाराष्ट्राच्या जबाबदार व्यक्तीवर म्हणजेच देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोडून द्यावा.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# करचोरी, करगळती रोखा; कर्तव्यात हयगय न करता रिझल्ट ओरियंटेड काम करा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश



मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'वित्त व नियोजन'सह 'राज्य उत्पादन शुल्क' मंत्रीपदांची सुत्रे हाती घेताच आज मंत्रालयात दोन्ही विभागांसह शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वित्त, नियोजन आणि उत्पादनशुल्क विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. मंत्र्यांचे खातेवाटप होताच उपमुख्यमंत्री अजित पवार ॲक्शन मोडवर आले असून करसंकलन आणि महसुलवाढीच्या प्रक्रियेत सुसुत्रता, सुधारणा आणत 'रिझल्ट ओरियंटेड' काम करण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. अधिकाऱ्यांनी पारदर्शक कारभार करावा. करचोरी, करगळती रोखण्याच्या कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात 'वित्त व नियोजन' विभागासह 'राज्य उत्पादन शुल्क' विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विभागांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. अशिष जयस्वाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव शैलजा ए., लेखा व कोषागारे विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपसचिव रविंद्र औटे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सहआयुक्त विश्वनाथ इंदिसे, सहआयुक्त सुनिल चव्हाण, अपर आयुक्त यतीन सावंत, उपायुक्त सुभाष बोडखे, उपायुक्त शंकर जगताप आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रलंबित योजना, आवश्यक निधी, तसेच राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला. या बैठकीत राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यासारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना देत राज्याच्या महसूल वाढीसाठी करचोरी, करगळतीसह गैरकारभार रोखण्याच्या सूचना दिल्या. करसंकलनाचे उद्दीष्ट गाठण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात येतील परंतु कामात परिस्थितीत हयगय चालणार नसल्याचे सांगत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचा सविस्तर आढावा घेतला. राज्यातील बेकायदा दारूविक्रीवर कडक निर्बंध आणण्यासाठी पारदर्शक व्यवस्था उभारण्याचे निर्देश दिले.

# सायं. 5 वाजेपर्यंतच्या मतदानाची आणि अंतिम आकडेवारीची तुलना योग्य नाही

## काँग्रेसच्या आरोपांना निवडणूक आयोगाने दिले उत्तर



नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका संपून एक महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. असे असतानाही राज्यात निवडणुकीबाबत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरूच आहेत. राज्यात झालेल्या निवडणुकांबाबत काँग्रेस पक्षाने केलेल्या सर्व आरोपांना निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. काँग्रेस पक्षाने उपस्थित केलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने मंगळवारी सांगितले की, महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांची नावे अनियंत्रितपणे जोडली किंवा काढली गेली नाहीत.

काँग्रेसला दिलेल्या प्रत्युत्तरात निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, संध्याकाळी ५ वाजताच्या मतदानाच्या आकडेवारीची अंतिम मतदानाच्या आकडेवारीशी तुलना करणे योग्य ठरणार नाही. संध्याकाळी 5 ते 11:45 या वेळेत मतदानात वाढ होणे सामान्य आहे, जे मतदारांच्या मतदानाच्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग आहे आणि पडलेली मते आणि मतांची मोजणी यात वास्तविक पण क्षुल्लक फरक कसा असू शकतो हे देखील नमूद केले आहे.

मतदानाचा तपशील देणारा वैधानिक फॉर्म 17C मतदान केंद्रावर मतदान संपल्यावर उमेदवारांच्या अधिकृत प्रतिनिधींकडे उपलब्ध असल्याने प्रत्यक्ष मतदारांच्या संख्येत बदल करणे अशक्य आहे यावर निवडणूक आयोगाने भर दिला. आयोगाने म्हटले आहे की, महाराष्ट्रातील मतदार यादी तयार करताना नियमावर आधारित प्रक्रिया पारदर्शकतेने पाळली गेली आणि राज्यातील मतदारांची नावे वगळण्यात कोणतीही अनियमितता झाली नाही. आयोगाने काँग्रेसला सांगितले की, काँग्रेस प्रतिनिधींच्या सहभागासह मतदार यादी तयार करताना योग्य प्रक्रिया पाळण्यात आली.

## लाडकी बहीण योजना : लाभ वितरणाला सुरुवात

रायगड, दि. २४ प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेसंदर्भात राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्वाची अपडेट दिली आहे. याबाबतची घोषणा त्यांनी याज रायगड जिल्ह्यात केली. विधानसभा निवडणूकीनंतर योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम पुन्हा जमा होण्यास आज पासून सुरूवात झाली असल्याची माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे.

विधानसभा निवडणूकीमुळे लाडकी बहिण योजनेच्या लाभाचे वितरण थांबविण्यात आले होते. आचारसंहितेमुळे या योजनेला काही काळ ब्रेक लागला होता. निवडणूक आचारसंहीता उठल्यानंतर लाडकी बहिण योजनेतील लाभाचे वितरण पुन्हा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आले आहे. १२ लाख ८७ हजार बहिणींच्या खात्त्यात या योजने आंतर्गत दिला जाणारा सन्मान निधी आज जमा करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसात उर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात सन्मान निधी जमा केला जाणार आहे अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

# जगमित्र शुगर्समध्ये धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांची संयुक्त मालकी : अंजनी दमानियांचा दावा

मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

बीडच्या मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा केली जावी, अशी मागणी केली जाऊ लागली आहे. खुद्द संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनीही याबाबत वारंवार भूमिका मांडली आहे. याबाबत एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी





विधानसभेत निवेदन केलं असताना दुसरीकडे या प्रकरणातील आरोपीला धनंजय मुंडे मदत करत असल्याचे गंभीर आरोप विरोधकांकडून केले जात आहेत. यासंदर्भात अंजली दमानियांनी आता काही कागदपत्रे एक्स अकाऊंटवर शेअर केली आहेत.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी निर्घृण हत्या करण्यात आली. त्यांना आरोपींनी गाडीतून नेलं. यानंतर त्यांच्या सहकाऱ्याने पोलीस स्थानकात याबाबत माहिती देऊनही पोलिसांनी पहिले दोन तास कोणतीही कारवाई केली नसल्याचा दावा आमदार संदीप क्षीरसागर यांनी विधानसभेत केला होता. त्याचबरोबर, हत्या झाल्यानंतरच पोलिसांनी हालचाल केल्याचाही आरोप त्यांनी केला.

या प्रकरणात वाल्मिक कराड हे नाव सातत्याने समोर येत असून तोच सरपंच हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याची टीका विरोधकांकडून केली जात आहे. वाल्मिक कराडला सरकारमधूनच संरक्षण मिळत असल्याचाही आरोप होत असून त्यात मंत्री धनंजय मुंडे यांचं नाव घेतलं जात आहे. खुद्द धनंजय मुंडेंनी यासंदर्भातील आरोप फेटाळून लावले आहेत. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या संपूर्ण प्रकरणाबाबत मोठा दावा करणारी काही कागदपत्र २३ डिसेंबर रोजी आपल्या एक्स अकाऊंटवर शेअर केली आहेत. ही कागदपत्रे म्हणजे जगमित्र शुगर्सचे ६ सातबारे असून त्यात धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांची संयुक्त मालकी असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यांनी शेअर केलेल्या सातबाऱ्यांमध्येही इतर काही नावांसोबत धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांचीही नावं दिसत आहेत.

**"धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन! हे घ्या, धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र... जगमित्र शुगर्सचे ६ सातबारे मी ऑनलाईन डाऊनलोड केले आहेत. ३५५४ गुंठे जमीन आहे", असं आपल्या पोस्टमध्ये अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.**

# अजमेर शरीफ दर्ग्यासाठी उद्धव ठाकरेंनी पाठवली चादर



मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

राजस्थानमधील जगप्रसिद्ध अजमेर दर्गा शरीफ गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या दर्ग्याखाली मंदिर असल्याचा दावा काही संघटनांकडून केला जातोय. दरम्यान, येथील ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा 813 वा उरुस लवकरच सुरू होणार आहे. तत्पूर्वी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना(उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी (24 डिसेंबर) दर्ग्यावर चढवण्यासाठी चादर पाठवली आहे. ही चादर खादिम सय्यद जिशान चिश्ती यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

उद्धव ठाकरेंच्या मातोश्री निवासस्थानी ही चादर सुपूर्द करण्यात आली. यावेळी शिवसेना नेते विनायक राऊत, शिवसेना उपनेते नितीन नांदगावकर, मुझफ्फर पावसकर, कमलेश नवले, नौमन पावसकर, उपशाखाप्रमुख गणेश माने आदी उपस्थित होते.

अजमेर दर्ग्याच्या खाली शिवमंदिर असल्याच्या दाव्याबाबत न्यायालयात खटला सुरू असताना उद्धव ठाकरे यांनी ही सादर पाठवली आहे. अशा परिस्थितीत ठाकरे यांनी ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यासाठी चादर पाठवल्याचा मुद्दा विरोधक उपस्थित करू शकतात. राजस्थानच्या अजमेर दर्ग्यामध्ये मंदिर असल्याच्या दाव्यावर शुक्रवारी दिवाणी न्यायालयात दुसऱ्यांदा सुनावणी झाली. याचिकाकर्ते आणि इतर पक्षांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने पुढील निर्णयाची तारीख 24 जानेवारी दिली आहे. अजमेर दिवाणी न्यायालयाने अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, दर्गा समिती अजमेर आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) यांना नोटीस पाठवली होती. आणखी पाच लोकांनी/संस्थांनी स्वतःला पक्षकार बनवण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. यासोबतच दर्गा समितीचे वकील अशोक माथूर यांनी याचिका फेटाळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तर, विष्णू गुप्ता आणि अंजुमन समितीच्या वकिलांनी आपापल्या बाजू मांडल्या.

# राहुल गांधींकडे डिझेलला पैसे नसतील

## संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांची भेट न घेतल्याने जरांगेंची टीका

जालना, दि. २४ प्रतिनिधी

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यभरात संताप व्यक्त होत असून राजकीय वातावरणही तापलं आहे. बीडमधील नेतेमंडळी व नव्याने मंत्री झालेले मुंडे गप्प का आहेत, असा सवाल विचारला जात आहे. दुसरीकडे मराठा क्रांती मोर्चा व बीडमधील सर्वपक्षीय नेते एकत्र आले असून 28 डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांच्या हत्येतील प्रमुख आरोपींना अटक करण्याची मागणी करत जनता रस्त्यावर उतरणार आहे. मराठा आंदोलक आणि उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनीही संतोष देशमुख



हत्याप्रकरणानंतर देशमुख कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. आता, पुन्हा एकदा ते मस्साजोगला जाणार आहेत. बीड जिल्ह्यात 28 तारखेला जनतेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मोर्चातही ते सहभागी होणार असून बीड जिल्ह्यातील जनतेला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचं आवाहनही जरांगे पाटील यांनी केलं आहे. त्यामुळे, आता 28 डिसेंबरच्या आंदोलनाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. कोणाचाही पण बाप येऊ द्या ते मॅटर मी दबू देत नाही, कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी हटणार नाही, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. सरकारला एकमेकांना मोबाईलचे फोन केलेले तपासायला एवढे दिवस लागतात का? एकदा बीड जिल्ह्यातील जनतेनं तपास हातात घेतला तर मग सरकारला कळेल? अशा शब्दात त्यांनी सरकारलाही इशारा दिला. संतोष भैया देशमुखचं मृत्यूप्रकरण कोणाचा बाप आला तरी मी दबू देणार नाही. त्यासाठी, 28 तारखेच्या मोर्चात सगळ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांच्याकडून करण्यात आलं आहे.

दरम्यान, परभणी दौऱ्यावर आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली नाही? यासंदर्भात प्रश्न विचारला असता जरांगे पाटील यांनी राहुल गांधींवर उपहासात्मक टीका केली. त्यांना रस्त्यात येताना गाडी लागली नसेल, त्यांच्याकडे डिझेलला पैसे नसतील, गरीब माणूस आहे म्हणून आला नसेल, असे जरांगे पाटील म्हणाले. तसेच, महायुती किंवा महाविकास आघाडी असू द्या यांचा एकदा भागलं की त्यांना गोरगरिबाचं देणं-घेणं राहत नाही. बीड जिल्ह्यात ज्यांच्या ज्यांच्यावरती अन्याय झाला आहे, त्यांनी समोर येऊन एसपींना सांगितले पाहिजे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केलंय.

# भुजबळ फडणवीसांना भेटायला जातात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत, याचा अर्थ काय ?- अंबादास दानवे

मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होऊन आज जवळपास २० दिवस झाले आहेत. मात्र, तरीही महायुतीमधील काही नेत्यांमध्ये अद्यापही रुसवे-फुगवे सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. कारण महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातून अनेक दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे छगन भुजबळ नाराज असून त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. एवढंच नाही तर मंत्रिपद न मिळाल्यानंतर छगन भुजबळांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत नाराजीही व्यक्त केली. त्यानंतर जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना, असं सूचक विधानही भुजबळांनी केलं होतं. त्यामुळे छगन भुजबळ हे काही मोठा निर्णय घेतात का? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत.



अशातच छगन भुजबळ यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेत तब्बल अर्धा तास चर्चा केली. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. या भेटीत काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्या भेटीवर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत आहेत. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी भुजबळांच्या नाराजीवर भाष्य करत काही सवाल उपस्थित केले आहेत. "भुजबळ फडणवीसांना भेटायला जातात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत, याचा अर्थ काय?", असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे.

"छगन भुजबळ हे अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. मग भुजबळ हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतात. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे छगन भुजबळ यांना भेटत नाहीत. मग यामधून राजकीय अर्थ काय घ्यायचा? आता मागच्या काही काळात असे म्हटले जात होते की, देवेंद्र फडणवीस यांनीच छगन भुजबळ यांना आंदोलने करायला लावले. आता ते सत्य होतं, हे समोर येत आहे. न जाणो, छगन भुजबळ आणखी काही पावलं उचलतील. असं एका दिवसांत कोणती पावले उचलता येत नसतात. त्यासाठी थोडे थांबावे लागतं. आणखी ८ दिवस, १० दिवस किंवा एक महिना. सर्व गोष्टी एका क्षणात स्पष्ट होत नसतात?", असे सूचक भाष्य अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केले.

# भारत-पाकिस्तान 23 फेब्रुवारीला आमनेसामने

दुबई, दि. २४ वृत्तसंस्था

आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चं वेळापत्रक जाहीर केलं आहे. बीसीसीआय आणि पीसीबी यांच्यातील चर्चेला पूर्णविराम लागला असून आता आयसीसीने अखेर स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले. आयसीसीने यापूर्वीच ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलमध्ये खेळवणार असल्याचे जाहीर केले होते. या स्पर्धेला १९ फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. पहिला सामना न्यूझीलंड आणि यजमान पाकिस्तान यांच्यात कराची येथे होणार आहे. तर बहुप्रतिक्षित असा भारत-पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला होणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेला १९ फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. पहिला सामना न्यूझीलंड आणि यजमान पाकिस्तान यांच्यात कराची येथे होणार आहे. फायनल ९ मार्च रोजी होणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे टीम इंडिया आपले सर्व सामने दुबईत खेळणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना २३ फेब्रुवारीला दुबईत होणार आहे. तर यजमान पाकिस्तानमधील रावलपिंडी, कराची आणि लाहोर या तीन शहरांमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने खेळवले जाणार आहेत.

पाकिस्तानमध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी भारत सरकारने टीम इंडियाला पाकिस्तानात जाण्याची परवानगी दिली नाही. यामुळे बीसीसीआयने ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलमध्ये आयोजित करण्याची मागणी केली होती.

# निवडणूक नियमातील बदलांविरोधात काँग्रेसची सर्वोच्च न्यायालयात धाव

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

निवडणुकीशी संबंधित इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे सार्वजनिक करणे बंद करण्याच्या नियमाला काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. 20 डिसेंबर रोजी केंद्र सरकारने मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही, वेबकास्टिंग फुटेज आणि उमेदवारांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग यांसारखी इलेक्ट्रॉनिक कागदपत्रे सार्वजनिक करणे टाळण्यासाठी निवडणूक नियमांमध्ये बदल केले होते. या निर्णयाविरोधात काँग्रेसने मंगळवारी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करून निर्णयाला स्थगिती देण्याचे आवाहन केले.



काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, "निवडणूक आयोगाला अशा महत्त्वाच्या कायद्यात (निवडणूक आचार नियम, 1961) एकतर्फी सुधारणा करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही."

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले की, निवडणुका घेण्याची जबाबदारी आहे, त्यामुळे अशा महत्त्वाच्या नियमात एकतर्फी आणि सार्वजनिक सल्लामसलत न करता अशी निर्लज्ज सुधारणा करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही.सीसीटीव्ही कॅमेरे आणि वेबकास्टिंग फुटेज तसेच उमेदवारांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग यांसारख्या इलेक्ट्रॉनिक दस्तऐवजांच्या सार्वजनिक तपासणीवर बंदी घालण्यासाठी केंद्र सरकारने निवडणुकीशी संबंधित नियमांमध्ये सुधारणा केली आहे. निवडणूक आयोगाच्या शिफारशीवरून, केंद्रीय कायदा मंत्रालयाने निवडणूक आचार नियम, 1961 च्या नियम 93 मध्ये सुधारणा केली आहे, ज्याने सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध 'कागदपत्रे' किंवा दस्तऐवजांचे प्रकार मर्यादित केले आहेत.

# अल्लू अर्जुनची चार तास चौकशी



**पोलिसांनी अभिनेत्याला हे प्रश्न विचारले**

1. प्रीमियरला पोलिसांना येण्याची परवानगी नव्हती हे तुम्हाला माहीत आहे का?
2. पोलिसांची परवानगी नसतानाही स्पेशल स्क्रीनिंगला उपस्थित राहण्याचा निर्णय कोणी घेतला?
3. बाहेर चेंगराचेंगरी झाल्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने तुम्हाला माहिती दिली का?
4. तुम्हाला महिलेच्या मृत्यूबद्दल केव्हा कळले?

हैदराबाद, दि. २४ वृत्तसंस्था

4 डिसेंबर रोजी 'पुष्पा-2' चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीच्या तपासासंदर्भात प्रसिद्ध तेलुगू चित्रपट अभिनेता अल्लू अर्जुन मंगळवारी चिक्कडपल्ली पोलिसांसमोर हजर झाला. 4 तासांच्या चौकशीत त्यांना अनेक प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले. अभिनेत्याला नोटीस बजावून आज सकाळी 11 वाजता पोलिसांसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. पोलिस स्टेशनमधून बाहेर पडण्यापूर्वी त्यांनी हस्तांदोलन करून जमावाचे स्वागत केले. पोलिस स्टेशनमध्ये पोहोचल्यावर पोलिसांनी अल्लू अर्जुनला एकापाठोपाठ एक अनेक प्रश्न विचारले.

तपासादरम्यान अर्जुनला थिएटरमध्ये येण्याची परवानगी होती का आणि त्याला थिएटरबाहेर चाहत्यांशी संवाद साधण्याची परवानगी होती का, याची माहिती पोलिसांना घ्यायची होती, असे सूत्रांनी सांगितले.

४ डिसेंबरला 'पुष्पा-२'च्या स्क्रिनिंगदरम्यान चेंगराचेंगरी झाल्यानंतर अल्लू अर्जुनने सिनेमा हॉल सोडला नाही, असा दावा पोलिसांनी केला होता. या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला होता. हैदराबादचे पोलीस आयुक्त सीव्ही आनंद यांनी अलीकडेच पोलिसांनी बनवलेला एक व्हिडिओ दाखवला होता, ज्यामध्ये चेंगराचेंगरीच्या वेळीची परिस्थिती दिसून येते.

वृत्तवाहिन्या आणि मोबाईल क्लिपचे फुटेज गोळा करून हा व्हिडिओ तयार करण्यात आला आहे. मध्यरात्रीपर्यंत हा अभिनेता सिनेमागृहातच थांबल्याचे समोर आले आहे. आनंदने व्हिडिओवर भाष्य केले नाही परंतु मीडिया स्वतःचे निष्कर्ष काढू शकतो असे सांगितले.

# तुमचाही संतोष देशमुख केला जाईल

## तानाजी सावंत यांच्या दोन पुतण्यांना धमकी

धाराशिव, दि. २४ प्रतिनिधी

महाराष्ट्र बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानं हादरलेला असतानाच आता चिंता वाढवणारी आणखी एक बातमी समोर आली आहे. जिथं, 'तुमचाही संतोष देशमुख केला जाईल' अशी धमकी माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या दोन पुतण्यांना देण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत आणि तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत यांना अज्ञात व्यक्तीकडून धमकीची चिठ्ठी मिळाली आहे. तेरणा साखर कारखान्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टर चालकाकडे बंद पाकीटात 100 रुपयांच्या नोटेसोबत धमकीची चिठ्ठी देण्यात आली.

तेरणा कारखान्याकडे येणारा ऊस ट्रॅक्टर तेर-ढोकी रोडवर मुळेवाडी पाटीजवळ अडवत दुचाकी वरुन आलेल्या दोघांनी बंद पाकीट दिलं. टपाल असल्याचे सांगत बंद पाकीट तेरणा कारखान्यावर सुरक्षा रक्षकाकडे देण्यास सांगितलं. याबाबत ढोकी पोलिसात तक्रार दिली असून पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केलाय. ढोकी पोलीसांकडुन या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, तानाची सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत यांच्या घराबाहेर काही महिन्यांपूर्वी गोळीबार झाल्याचीसुद्धा घटना घडली होती. 13 सप्टेंबर रोजी त्यांच्या घरावर मध्यरात्री उशिरा गोळीबार करण्यात आला होता. तेव्हापासूनच याप्रकरणाचा तपास सुरू असून, तानाजी सावंत यांच्या पुतण्यांना धोका असल्याचं म्हटलं जात आहे.

## संक्षिप्त

### भिवंडीत धुक्याच्या चादरीमुळे वाहन चालकांची तारांबळ, सावधानता बाळगण्याची आवश्यकता

भिवंडी, दि. २४ : प्रतिनिधी

तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागात मागील ३ ते ४ दिवसांपासून मोठ्या प्रमाणात धुक्याची चादर पसरत असून रस्त्यावर धूके जमा झाल्याने त्यामधून वाट काढण्यासाठी वाहन चालकांची तारांबळ उडत असल्याचे दिसून येत आहे.सध्या राज्यभर गुलाबी थंडीची लाट सुरू असून रात्री आणि सकाळच्या सुमारास वातावरणात चांगलाच गारठा निर्माण होत आहे. त्यातच मागील काही दिवसांपासून सकाळी एक ते दोन तासांकरिता भिवंडी शहरासह ग्रामीण मध्ये पसरलेल्या धुक्याच्या चादरीमुळे धुक्याने रस्तेही व्यापल्याने नोकरदार वर्गासह चाकरमान्यांना सुद्धा वाहने चालवत असताना धुक्यातून वाट काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.यासह मॉर्निंग वॉक व कवायतीसाठी बाहेर पडणाऱ्या वयोवृध्द,महिला वर्ग आणि क्रीडा प्रकारातील विविध खेळ खेळण्यासाठी मैदानांवर जाणाऱ्या खेळाडूंनाही विना सरावानेच घरी परतावे लागत असल्याचे चित्र पहावे मिळत आहे. याचा परिणाम ग्रामीण भागात प्रामुख्याने जाणवत असून धुक्याने ग्रामीण भागातील व्यवहाराचा वेग मंदावला आहे. या गुलाबी थंडीतील दाट धुक्याच्या चादरी मुळे पहाटेपासून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांनी सावधता बाळगणे आवश्यक असल्याचे आवाहन जाणकारांकडून केले जात आहे.

### भिवंडी मनपाच्या आरोग्य विभागातर्फे क्षयरुग्णाची शोध मोहीम

भिवंडी, दि. २४ : प्रतिनिधी

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका नागरी आरोग्य विभागाने क्षयरुग्ण शोधमोहीम सक्रिय केली असून २३ डिसेंबर २०२४ ते ३जानेवारी २०२५ या कालावधीत ही मोहीम आशा वर्कर व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत राबविण्यात येणार आहे.भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागात लोकसंख्येचे सर्वेक्षण आशा व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन त्या घरामधील सर्व सदस्यांची क्षयरोग आजाराबाबतची तपासणी करणार आहेत.भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील शहरी भागातील अति जोखमीच्या घरांचे सर्वेक्षण २३ डिसेंबर२०२४ ते ३ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे.सदर सर्वेक्षण मोहिमेसाठी ४१ पथकांची निर्मिती करण्यात आली असुन सदर पथकात ८२ आशा यांच्याव्दारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.सदर मोहिमेचे ८ पर्यवेक्षकांव्दारे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे.सदर मोहिमे दरम्यान आशा व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन ज्या व्यक्तींना दोन आठवडयापेक्षा अधिक कालावधीचा खोकला, दोन आठवड्यापासुन येणारा ताप, वजनात घट, भुक न लागणे, मानेवर व इतरत्र गाठी येणे आदी लक्षणे असणा-या संशयित व्यक्तीची तपासणी करण्यात येणार आहे.ही लक्षणे आढळून आल्यास सदर व्यक्तीची तात्काळ थुंकी नमुने, क्ष-किरण तपासणी करून तपासणीमध्ये क्षयरोग आढळून आल्यास रुग्णास क्षयरोगावरील औषधोपचार पूर्णतः मोफत सुरु करण्यात येणार आहे. तरी भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना भिवंडी मनपाचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य, तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर आणि शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांनी आवाहन केले आहे की, आपल्या घरी येणाऱ्या आशा व आरोग्य कर्मचारी यांना माहिती देऊन सहकार्य करावे.

### 31 डिसेंबरला गडकिल्ल्यांवर होणाऱ्या पार्ट्यांवर निर्बंध आणा

पिंपरी, दि. २३ : प्रतिनिधी

गडकिल्ल्यांचे संवर्धन करीत असताना अनेक गडकिल्ल्यांवर होणाऱ्या ३१ डिसेंबरच्या पार्ट्यां होतात. गडांचे पावित्र्य कायम राखणे गरजेचे आहे. या पार्ट्यांवर निर्बंध आणण्याची गरज आहे, अशी मागणी विधानपरिषद सदस्य अमित गोरखे यांनी अधिवेशनात केली.

विधिमंडळ अधिवेशनात गड-किल्ल्यांच्या विधेयकावर चर्चा सुरू असताना गोरखे यांनी गड-किल्ल्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. गोरखे म्हणाले, 'गड किल्ल्यांच्या बाबतीत आपली चर्चा होत आहे. विधेयक मांडण्यात आले. त्याविषयी तीन सूचना करणार आहे. महाराष्ट्रात अनेक गड किल्ले आहेत. त्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. गड किल्ल्यांवर ३१ डिसेंबरला मोठ्या प्रमाणावर पार्ट्यांचे आयोजन केले जाते. त्यावर निर्बंध आणण्याची गरज आहे. त्याचबरोबर विविध कंपन्यांचा सीएसआर निधी असतो. त्या कंपन्यांना गड किल्ले संवर्धनासाठी दत्तक द्यावे.' पर्यटन स्थळांच्या ठिकाणी सेल्फी घेताना अनेक अपघात होतात. ते रोखण्यासाठी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी सुरक्षित असे सेल्फी पॉइंट निर्माण करण्याची गरज आहे, असे सांगून गोरखे म्हणाले, 'राजस्थानमध्ये अनेक राजवाडे पाहण्यासाठी देशविदेशातून पर्यटक येत असतात. त्या धरतीवर गड किल्ले पाहण्यासाठी आपल्याकडे पर्यटन विकास करण्याची गरज आहे. पर्यटनस्थळे नव्हे तर प्रेरणास्थळे होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे.' ग्रामीण भागामध्ये शासकीय शववाहिन्यांचे प्रमाण कमी आहे. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर रुग्णालयातून घरी आणि घरातून स्मशानभूमीमध्ये शव नेण्यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर खर्च पडतो. राज्यातील तालुक्याच्या ठिकाणी एक शववाहिनी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शासनाच्या वतीने काही शववाहिन्या आहेत. मात्र, त्यांचा उपयोग योग्य पद्धतीने होत नाही, तो व्हावा यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे गोरखे म्हणाले.

# आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली भांगेच्या गोळ्यांची तस्करी करणाऱ्यास अटक

ठाणे, दि. २४ : प्रतिनिधी



आयुर्वेदिक औषधाच्या नावाखाली भांगेच्या गोळयांची तस्करी करणाऱ्या जितेंद्र कामता प्रसाद जैस्वाल याला ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथून उत्पादन शुल्क विभागाने अटक केल्याची माहिती ठाण्याचे अधीक्षक प्रविण तांबे यांनी रविवारी दिली. त्याच्याकडून दोन लाखांहून अधिक रुपयांच्या भांगेच्या गोळयांचा साठा जप्त केला आहे. हा साठा जैस्वाल याने रेल्वेने उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यातून नववर्षाच्या स्वागताच्या नावे ठाणे, पालघर जिल्ह्यातील पान टपऱ्यांवर नशेसाठी विक्रीसाठी आणल्याचा प्राथमिक अंदाज राज्य उत्पादन शुल्क विभागाने वर्तवला आहे.

भाईंदर येथील घरात भांगेचा साठा आणल्याची माहिती ठाणे विभागाचे उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी रत्नाकर शिंदे यांना खबऱ्याकडून मिळाली होती. त्याच आधारे कोकण विभागीय उपायुक्त प्रदीप पवार आणि ठाण्याचे अधीक्षक प्रवीण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे यांनी अमजद तडवी, प्रशांत दळवी आणि शुभम माळी या कर्मचाऱ्यांसोबत भाईंदर येथील एका संकुलातील घरामध्ये २१ डिसेंबर २०२४ रोजी छापा टाकला. त्या छाप्यात सुमारे दोन लाख २३ हजार ६८० रुपये किमतीचा साठा आढळला. याप्रकरणी गुन्हा दाखल करुन जैस्वाल याला अटक केली.

# एसटीत इलेक्ट्रिक बस सुरू करणार - प्रताप सरनाईक

भाईंदर, दि. २४ : प्रतिनिधी

एसटी बस महामंडळात टप्याटप्याने इलेक्ट्रिक बस सुरू करणार आहोत. अगदी ग्रामीण भागात देखील इलेक्ट्रिक बस सुरू केल्या जातील. त्यासाठी ग्रामीण भागात सुद्धा चार्जिंग स्टेशन उभारणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. कोस्टल मार्ग हा वाढवण बंदरपर्यंत विस्तारित होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.



मंत्री झाल्यावर मीरा भाईंदरमध्ये पहिल्यांदाच आलेले प्रताप सरनाईक यांनी डॉ . अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात चाय पे चर्चा उपक्रमाद्वारे मीरारोड भागातील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासह सिमेंट रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करावीत, पाणी पुरवठ्यात वाढ करावी, सीसीटीव्ही कॅमेरे वाढवावेत, दहिसर टोल नाका येथील कोंडी दूर करावी, अनधिकृत रिक्षा चालकांवर कारवाई व्हावी, भाईंदरमधून सुटणाऱ्या एसटी बस संख्या वाढवा आदी मुद्दे उपस्थित केले.

त्यावर बोलताना सरनाईक यांनी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे सांगत सरकार म्हणून मी असल्याने असलेल्या समस्या दूर करण्यासह विकासकामे वेगाने होतील असे सांगितले. टोल नाका हटवून केवळ अवजड वाहनांसाठी २ टोल मार्गिका ठेवण्यात येतील. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी शहराच्या विकासकामांसाठी सुमारे ३ हजार कोटींचा निधी मंजूर केला. पाणी पुरवठा वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो व रस्त्यांची कामे लवकर पूर्ण केली जातील जेणे करून वाहतूक कोंडी सुटेल असे ते म्हणाले.

राज्य परिवहन महामंडळात टप्प्याटप्याने इलेक्ट्रिक बस सुरू करणार असल्याचं सांगत अगदी ग्रामीण भागात सुद्धा इलेक्ट्रिक बस चालवल्या जाणार आहेत . त्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारली जातील असे सरनाईक म्हणाले. यामुळे इंधन खर्चात व देखभाल - दुरुस्तीमध्ये बचत, प्रदूषण टळेल तसेच नागरिकांचा प्रवास आरामदायी होणार आहे.

प्रत्येक एसटी डेपोमध्ये अद्यावत व स्वच्छ असे स्वच्छता गृह केले जाणार आहे. रात्रपाळी करणाऱ्या एसटी चालक आदींसाठी झोपण्याची आणि आंघोळीसाठी गरम पाण्याची सुविधा करणार आहे. ही कामे आपण प्राधान्याने हाती घेतल्याचे मंत्री सरनाईक म्हणाले.

# सवलती दिल्या, घरांचे दर कमी कधी होणार ?

नवी मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

नगरविकास विभागाने सप्टेंबर २०२४ मध्ये आपल्या एकात्मिक बांधकाम नियंत्रण नियमावलीत बदल करून बिल्डरांना एकात्मिक नगर वसाहतींसाठी अर्थात टाऊनशिपसाठी चटई क्षेत्र मोकळे केले आहे. याचा सर्वांत मोठा फायदा नवी मुंबई, उरण- पनवेल, शीळ-महापे परिसरातील १४ गावे आणि ठाणे-भिवंडीच्या वेशीवरील टाऊनशिपना होणार आहे.

सध्या 'एमएमआरडीए' क्षेत्रात घरांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्यामुळे जमिनींचे भाव वधारले आहेत. लोकांना परवडणारी घरे मिळावीत म्हणून सुरुवातीला रेंटल हाऊसिंग त्यानंतर विशेष नगर वसाहत आणि आता एकात्मिक नगर वसाहतीचे धोरण सरकार राबवीत आहे. त्यामध्ये विकासकाला अनेक माध्यमांतून चटई क्षेत्र देण्यात येत आहे. सरकारने सुरुवातीला आणलेल्या विशेष नगर वसाहत योजनेत अवघे १ चटई क्षेत्र देण्याची तरतूद होती. ती परवडत नाही, या सबबीखाली बिल्डरांनी राज्यकर्त्यांकडून वर्ष २०१६ मध्ये एकात्मिक नगर वसाहत योजना मंजूर करून घेतली. ती मंजूर करताना अल्पदरात सर्वसामान्यांना घरे मिळतील, असे सांगितले असले तरी घरांची किंमत ही आभाळाला भिडणारी असल्याचे सांगून आचारसंहिता लागू होण्याआधी बिल्डरांना परवडणारी ही नवी योजना अंमलात आणल्याची चर्चा आहे. यात मिळणारा लाभ बघून पुन्हा एकदा अतिरिक्त चटई क्षेत्र देण्याचे धोरण महायुती सरकारने मंजूर केले आहे. यामध्ये १० टक्के द्या आणि १०० टक्के एफएसआय अर्थात चटई क्षेत्र घ्या, अशी तरतूद आहे. यापूर्वी फक्त ५०० हेक्टर क्षेत्र असलेल्या विकास योजनांना हा लाभ मिळणार होता; परंतु सरसकट सर्वच विकास योजनांना तो मिळणार आहे. बिल्डरांना आता रेडिरेकनरच्या १० टक्के दरात १०० टक्के अतिरिक्त एफएसआय मिळेल. शिवाय स्टॅम्प ड्युटीत ५० टक्के आणि विकास दरात प्रत्येकी ५० टक्के सूट मिळणार असल्याने त्यांचे चांगभलं झाले आहे.

**पायाभूत सुविधांवर येणार ताण**

» वाढीव चटई क्षेत्राच्या खिरापतीमुळे त्या-त्या ठिकाणच्या पायाभूत सुविधांवर ताण पडणार आहे.

» आताच नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उरणसह भिवंडीत वॉटर, मीटर, गटार, रस्ते, वाहतूक या पायाभूत सुविधांची बोंब आहे.

» त्यातच सर्वच शहरात एसआरए आणि पुनर्विकासाचे भूत मानगुटीवर बसले आहे.

» यामुळे पायाभूत सुविधांवर ताण आण आणखी वाढणार आहे; परंतु त्याचे सोयरसुतक कोणालाही नाही.

# खारघरमध्ये चार बांगलादेशीय नागरीक ताब्यात

पनवेल, दि. २४ : प्रतिनिधी

कोपरा गावातील भाड्याच्या खोलीत राहणा-या चार बांगलादेशीय नागरीकांना नवी मुंबई पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पोलीसांनी शनिवारी ताब्यात घेतले. खारघर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कोपरा गावातील संजय ठाकूर यांच्या खोलीमध्ये भाड्याने बांगलादेशातील नागरीक राहत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना मिळाल्यानंतर खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दीपक सूर्वे यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध आणि स्थानिक पोलीसांचे संयुक्त पथक स्थापन करुन संजय ठाकूर यांच्या घराजवळ शनिवारी सापळा रचला. पोलीसांच्या पथकाने यावेळी भाड्याच्या खोलीत राहणा-या ३७ वर्षीय अमिषा कमाल काजी, १८ वर्षीय शर्मिन कमाल काजी, ४० वर्षीय राणी किमारुल शेख, २७ वर्षीय सैफ्फुला अहमद अली खान यांना ताब्यात घेतले. पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या महिला व तरुणींकडे चौकशी केल्यावर खारघर व परिसरात या घरकाम करत असल्याचे समजले.

# डोंबिवलीत 125 हून अधिक रिक्षा चालकांची 'आरटीओ'कडून तपासणी

## 40 हून अधिक रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई

डोंबिवली, दि. २४ : प्रतिनिधी

डोंबिवलीतील रिक्षांची उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) कल्याणमधील अधिकाऱ्यांनी शुक्रवारी तपासणी केली. या तपासणीत १२५ रिक्षा आरटीओच्या पथकाने तपासल्या. यामधील ४० हून रिक्षा चालकांवर नियमभंग प्रकरणी पाच हजारापासून ते वीस हजार रूपयांपर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात आली.

डोंबिवलीत सुमारे एक हजाराहून अधिक आयुर्मान संपलेल्या भंगार रिक्षा चालकांकडून चालविण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. अनेक रिक्षा चालक गणवेश परिधान करत नाहीत. काही गणवेशावर बिल्ला, नावाची ओळखपट्टी लावत नाहीत, काही रिक्षा चालक दामदुप्पट भाडे आकारत आहेत. मोटार वाहन कायद्याचे पालन न करता रिक्षा चालवित असल्याच्या तक्रारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांच्याकडे आल्या होत्या.

अशा बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बारकुल यांच्या आदेशावरून साहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रोहीत पवार, साहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रियंका टपळे, साहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विजय नरवाडे यांच्या पथकाने डोंबिवली पूर्व भागात अचानक येऊन रिक्षा चालकांजवळील कागदपत्रांची तपासणी केली. अनेक रिक्षा चालक गणवेशात नव्हते. काही रिक्षा चालक रिक्षा वाहनतळ सोडून प्रवासी वाहतूक करत होते. काही रिक्षा चालकांनी गणवेशावर बिल्ला, नाव ओळखपट्टी लावली नव्हती. काही रिक्षा चालकांच्या परवान्याची मुदत संपली होती. काहींचे पीयुसी संपले होते. अशा सर्व रिक्षा चालकांवर घटनास्थळीच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केले म्हणून पाच हजार रूपये ते २० हजार रूपयांपर्यंत दंडात्मक कारवाई पथकाने केली.

# इंग्रजीखेरीज इतर विषयांसाठी शिक्षकांची वानवा

भाईंदर, दि. २४ : प्रतिनिधी

मिरा-भाईंदर महापालिकेच्या चेने येथील एका मराठी शाळेमधील इयत्ता 9 वीच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून शिक्षकच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असले तरी या विद्यार्थ्यांना एका कंत्राटी शिक्षकाकडून केवळ इंग्रजी विषयच शिकविला जात असल्याचे समोर आले आहे. मात्र इतर विषय शिकविण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या इयत्ता 10 वीतील प्रवेशावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल आहे.

पालिकेने आपल्या अखत्यारीतील शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये त्यांना किमान इयत्ता 10 वी पर्यंत शिक्षण पूर्ण करता यावे, यासाठी प्रशासनाने 2022 मध्ये इयत्ता 9 वी चे वर्ग सुरू केले. हे वर्ग सुरुवातीला 5 मराठी व उर्दू शाळांमध्ये सुरु करण्यात आले. त्यात काशी मराठी शाळा क्रमांक 4, घोडबंदर मराठी शाळा क्रमांक 9, पेणकर पाडा शाळा क्रमांक 14, माशाचा पाडा मराठी शाळा क्रमांक 19 व मीरारोड येथील उर्दू शाळा क्रमांक 34 चा समावेश आहे. सुरुवातीला या शाळांमध्ये इयत्ता 9 वी साठी 319 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यापूर्वी पालिकेच्या 35 शाळांमध्ये केवळ इयत्ता 1 ते 8 वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षणच दिले जात होते. या शाळांमधून इयत्ता 8 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे खासगी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागत होता.

पालिका शाळांमध्ये शिक्षण घेणारे बहुतांशी विद्यार्थी गरीब कुटुंबातील असल्याने खासगी शाळांमध्ये प्रवेश घेणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे ठरत असल्याने त्यांना अर्धवटच शिक्षण सोडावे लागत होते. अशा विद्यार्थ्यांची शैक्षणिक ससेहोलपट थांबविण्याच्या उद्देशाने प्रशासनाने 2022 पासून सुरुवातीला 5 शाळांमध्ये इयत्ता 9 वीचे वर्ग सुरू केले. हे विद्यार्थी गतवर्षी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचे इयत्ता 10 वीचे शिक्षण सुरू असले तरी या माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पालिकेतील शिक्षकांची शिकवणी तोकडी पडण्याची शक्यता निर्माण झाल्याने प्रशासनाने सुमारे 25 शिक्षकांची ठोक मानधनावर नियुक्ती केली. यातील काही शिक्षक वेळेवर वेतन मिळत नसल्याच्या कारणास्तव नोकरी सोडून गेले. तर काही कंत्राटी शिक्षक केवळ गणित, विज्ञान, इंग्रजी विषयच शिकवीत असल्याचे समोर आले आहे. यामुळे त्यांच्या इतर विषयांच्या शिक्षणाची पंचाईत झाली. यावर उपाय म्हणून पालिका शाळांमध्ये स्थायी स्वरूपात असलेले पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेल्या शिक्षकांना इयत्ता 9 वी व 10 वीतील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले. मात्र त्याचा श्री गणेशा अद्याप झाला नसल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले. अशातच प्रशासनाने चेने येथील मराठी शाळा क्रमांक 10 मध्ये यावर्षी इयत्ता 9 वीचा वर्ग सुरू केला आहे. या वर्गात सध्या सुमारे 25 विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना शिकविण्यासाठी प्रशासनाने 2 कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केली होती. यातील एक शिक्षक काही महिन्यांपूर्वी नोकरी सोडून गेल्याने एकाच कंत्राटी शिक्षकावर या शाळेतील इयत्ता 9 वीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अवलंबून आहे.

**विद्यार्थी अभ्यासापासून वंचित**

एका कंत्राटी शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना केवळ इंग्रजी विषयच शिकविला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून हे विद्यार्थी इंग्रजी विषयाखेरीज इतर विषयांच्या अभ्यासापासून वंचित राहिले आहेत किंवा त्यांना स्व-अध्ययन करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे त्या विद्यार्थ्यांचे यंदाचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले असून त्यांच्या पुढील वर्षीच्या इयत्ता 10 वीतील प्रवेशावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे.

**तत्काळ सक्षम शिक्षक नियुक्तीची पालकांची मागणी**

चेने मराठी शाळेतील इयत्ता 9 वीतील विद्यार्थ्यांना इंग्रजीखेरीज इतर विषय शिकविण्यासाठी तसेच त्यांच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये, यासाठी तात्काळ पुरेशा व सक्षम शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वी शिक्षण विभागांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली असता त्यांना तूर्तास आश्वासन देण्यात आल्याचे पालकांकडून सांगण्यात आले.

# पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची महापारेषणला दोन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

## सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार

रायपूर, दि. २४ : प्रतिनिधी




पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण लोकसभेचे माजी सदस्य डॉ. नंदकुमार साय व छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री श्री. विजय शर्मा यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर, ब्रँडिंग व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

छत्तीसगडमधील रायपूरच्या हॉटेल बेबीलॉन इंटरनॅशनलमध्ये आयोजिलेल्या ४७ व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी 'पीआरएसआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ. यू. एस. शर्मा, डॉ. समीर गोस्वामी, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहीद अली यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**जनसंपर्क विभाग आघाडीवर**

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर सकारात्मकपणे ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण अभिनव कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

# भिवंडी महाविद्यालयात वार्षिक स्नेह संमेलन व बक्षीस वितरण सोहळा संपन्न




भिवंडी, दि. २४ : प्रतिनिधी

अण्णासाहेब जाधव यांनी उदात्त हेतूने समाजाला शिक्षित करण्यासाठी लावलेल्या शैक्षणिक रोपट्याचे वटवृक्ष झाले आहे. त्याचा लाभ घेऊन लाखो विद्यार्थी शिक्षित होत आहेत.म्हणूनच त्यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी राहीले आहे,असे वक्तव्य पत्रकार संजय भोईर यांनी केले आहे.ते बी.एन.एन महाविद्यालयाच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.

शशिकांत म्हारुळकर हे होते.तर या प्रसंगी प्राचार्य डॉ अशोक वाघ,उपप्राचार्य डॉ. सुधिर निकम,डॉ.सुरेश भदरगे,डॉ. सुवर्णा रावळ,डॉ.निनाद जाधव,डॉ. विकास उबाळे,प्रबंधक नरेश शिरसाळे,डि. एल.अहिरे आदी उपस्थित होते.अण्णासाहेब जाधव यांनी भिवंडी शहरात बी.एन.एन महाविद्यालय उभारत असताना शहरातील सर्व धर्मीय जनतेचे सहकार्य त्यांना लाभल्याने आज या महाविद्यालयाने आपला नावलौकिक टिकवून ठेवलेला आहे.त्यामुळेच विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाचा उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरविले गेले आहे.महाविद्यालयात अनेक विषयात पदव्युत्तर शिक्षणाची संधी येथील विद्यार्थ्यांना मिळत आहे.हे भिवंडी शहरातील विद्यार्थ्यांसाठी भाग्याचे असून विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या कुटुंबाचा, महाविद्यालया सोबत शहर व राष्ट्राचा गौरव कसा वाढेल यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन शेवटी संजय भोईर यांनी केले.तर अध्यक्षीय भाषण करताना प्रा.डॉ.शशिकांत म्हारुळकर यांनी महाविद्यालया मार्फत सुरू असलेल्या शैक्षणिक व कला गुणांना वाव देणाऱ्या उपक्रमा बाबत माहिती देत मुलांना प्रोत्साहित केले.या कार्यक्रम प्रसंगी क्रीडा प्रकारात विद्यापीठ स्तरावर बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला.त्यानंतर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.संजय सोनावणे यांनी केले तर आभार प्रा.बी.टी पगारे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

# सरकारने अंगणवाडी सेविकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा

## जळगाव जामोद येथे सीटूच्या मेळाव्यात पंजाबराव गायकवाड यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी,**

**बुलढाणा, दि. २४:** अंगणवाडी सेविका मदतनिसांना किमान वेतन तातडीने लागू करावे ,असे आदेश न्यायालयाने सरकारला दिलेले आहे. न्यायालयाच्या या आदेशाची सरकारने तातडीने अंमलबजावणी करावी. सरकार अंगणवाडी सेविका मदतनीसांना नियमित सेवेत घेऊन शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देत नाही, तोपर्यंत सीटूच्या नेतृत्वात हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा सीटूचे जिल्हा अध्यक्ष पंजाबराव गायकवाड यांनी जळगाव जामोद येथे मेळाव्याचे उद्घाटन करताना सरकारला दिला.

अंगणवाडी कर्मचारी संघटना, सीटूचा मेळावा २१ डिसेंबर रोजी जळगाव जामोद येथील पंचायत समितीच्या सभागृहात तालुकाध्यक्ष विजया शेळके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

या वेळी व्यासपीठावर सचिव लक्ष्मी गवई, सरला मिश्रा, सविता चोपडे, सिंधू बोडखे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या वेळी गायकवाड म्हणाले की, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने अंगणवाडी सेविका मदतनीच्या सेवा व कामाचे तास विचारात घेऊन एप्रिल २०२२ रोजी अंगणवाडी सेविका व मदतनिसांना इतर नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे ग्रॅज्युटी देण्यात यावी, असा निर्णय दिलेला आहे. तो पर्यंत किमान वेतन लागू करण्याचे सुचविले आहे.

या मेळाव्याचे सूत्रसंचालन सविता चोपडे यांनी तर मेळाव्या मागची भूमिका व प्रास्ताविक सरला मिश्रा यांनी केले.

# नियोजित वराला आक्षेपार्ह छायाचित्रे पाठवून तरूणीची केली बदनामी

**महासागर प्रतिनिधी,**

**अमरावती, दि. २४:** एका तरुणीच्या नियोजित वराला बनावट आक्षेपार्ह छायाचित्रे पाठवून तिची बदनामी करण्यात आली. ही घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून अभियंता तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. श्रीतेज राजेंद्र नागपुरे (२९, रा. रुक्मिणीनगर, अमरावती) गुन्हा दाखल झालेल्या अभियंता तरुणाचे नाव आहे. पीडित तरुणी व श्रीतेज यांची मैत्री होती. प्रशिक्षणासाठी सोबत असताना श्रीतेज आणि पीडित तरूणीमध्ये प्रेमसंबंध झाले. २०१४ पासून ती पुढील शिक्षणाकरिता पुणे येथे गेली.



त्यामुळे श्रीतेजनेही पुण्याला अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे पीडित तरूणी व श्रीतेज हे दोघे एकमेकांना भेटत होते. दरम्यान, काही दिवसांनी तो तरुणीवर जास्त लक्ष ठेवायला लागला. त्याला कंटाळून २०१८ मध्ये या तरुणीने त्याच्यासोबत संबंध तोडून टाकले. तत्पूर्वी, त्यांचे प्रेमसंबंध सुरू असताना तरुणीची काही छायाचित्रे श्रीतेजच्या मोबाइलमध्ये होते. २०१९ मध्ये तरुणी ही नोकरी करत असताना श्रीतेज तिला वारंवार मोबाईलवर संपर्क साधून त्रास देत होता. तरुणीच्या बहिणीला सुद्धा त्याने तुम्ही संबंध तोडण्यास संमती कशी दिली, अशी विचारणा करून त्रास दिला. श्रीतेज हा कंपनीतील इतर सहकाऱ्याना छायाचित्रे ठेवून तिची बदनामी करत होता.

त्यामुळे तरुणीच्या तक्रारीवरून मुंबई येथे गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यानच्या काळात तिचे लग्न जुळले. याबाबत कळल्यावर श्रीतेजने २१ डिसेंबरला तरुणीच्या होणाऱ्या पतीला तिचे काही आक्षेपार्ह छायाचित्रे पाठवले. ही बाब तिच्या होणाऱ्या पतीने मोबाइलवर संपर्क साधून तिला सांगितली. ती छायाचित्रे पाहताना तिच्या होणाऱ्या पतीने व्हिडीओ रेकॉर्ड केला. तो पाहताच तिला धक्का बसला. ते सर्व छायाचित्रे बनावट असल्याचे तरुणीच्या लक्षात आले. श्रीतेज हा आयटी कंपनीत इंजिनिअर असून तांत्रिक बाबींचे ज्ञान त्याला आहे, असे पीडित तरूणीने पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

श्रीतेज आणि तरूणीमध्ये प्रेमसंबंध होते. श्रीतेजने बनावट छायाचित्रांचा वापर करून तरूणीला त्रास देण्याच्या उद्देशाने ही आक्षेपार्ह छायाचित्रे तरूणीच्या होणाऱ्या पतीला पाठवली. त्यामुळे तरूणीची बदनामी झाली. याआधीही आरोपीने असे प्रकार वारंवार केले. या सर्व गोष्टींचा प्रचंड मनस्ताप तरूणीला झाला. प्रेमसंबंध तोडण्याच्या रागातून आरोपी हा प्रचंड त्रास देत असल्याचे पीडित तरूणीने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.



# पावसाच्या शक्यतेमुळे बाजार समितीतील माल टीनशेडमध्ये

## अकोला कृउबासत आठवडाभरात ३३ हजार क्विंटल आवक

**महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि. २४ :** पावसाच्या शक्यतेमुळे सोमवारी अकोला कृषी बाजार समितीमधील शेतमाल टीनशेडमध्ये ठेवण्यात आला. याच ठिकाणी खरेदी–विक्रीसहन्य प्रक्रिया पार पडली. या आठवड्यात ३३ हजार ७०९ क्विंटलची आवक झाली आहे. यंदा खरीप हंगामात कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळे उत्पादन प्रचंड प्रमाणात घटले. अनेकदा संततधार पावसामुळे सोयाबीनलाही फटका बसला. परतीच्या पावसानेही शेतात सोंगून ठेवलेले सोयाबीन व कपाशीचीही हानी झाली. परिणामी शेतक?यांनी पिकासाठी लावलेला खर्चही निघणार नाही, अशी स्थिती आहे. दरम्यान काही दिवसांपासून अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक वाढली आहे. समितीच्या एका आठवड्यात आवक अशी १६ डिसेंबर–५७२८, १७ डिसेंबर–६१०९, १८ डिसेंबर–५२०४, १९ डिसेंबर–४४८५, २० डिसेंबर४२५०, २१ डिसेंबर४३३९, २३ डिसेंबर३५९४

# रोहडा रस्त्याच्या दुरवस्थेमुळे गैरसोय

## त्वरित दुरुस्ती न केल्यास ठिय्या आंदोलनाचा इशारा



**महासागर प्रतिनिधी,**

**देऊळगाव घुबे, दि.२४:** चिखली ते देऊळगावराजा मार्गाला जोडणारा रोहडा येथे जाणा?या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. यामुळे वाहनधारक व ग्रामस्थांची गैरसोय होत आहे. या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. वेळीच दुरूस्ती न केल्यास आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे. रोहडा हे गाव चिखली तालुक्यात असून, सिंदखेडराजा मतदारसंघात समाविष्ट आहे. चिखली ते देऊळगावराजा मार्गाला जोडणारा रोहडा, गांगलगाव आणि तपोवन रस्ता वर्षभरापासून उखडला आहे. रोहडा गावाला जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असून, महामार्गापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर आहे. मात्र, या रस्त्यावर मोठ–मोठ्ठेखड्डेपडले आहेत. पावसाळ्याच्या दिवसांत या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहन चालवणे त्रासदायक होत आहे. इतर वेळीही या रस्त्यावरून जाताना वाहनधारकांना खडी उखडल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. सा रस्त्यावर किरकोळ अपघात घडत आहेत. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून करण्यात येत आहे. मात्र, त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या रस्त्याची त्वरित दुरुस्ती न केल्यास ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रोहडा येथील ग्रामस्थांनी दिला आहे. आंदोलन करणार भचिखली ते मेरा चौकीदरम्यानचा रोहडा फाटा ते रोहडा.

# वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव

## कुष्ठरोगी बांधवांचे अभ्यंगस्नान घालून अन्नदान

**महासागर प्रतिनिधी,**

**अमरावती, दि. २४:** अमरावती अखिल विश्वाला महानतेचा संदेश देणारे, निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सव बाबांच्या पवित्र समाधी स्थळी १४ डिसेंबर ते २१ डिसेंबरपर्यंत विविध सेवाभावी उपक्रमातून साजरा होत आहे. कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या विचारांना जोपासत, खऱ्या अर्थाने जनतेच्या सेवेच्या उदात्त हेतूने, परिसरातील गोरगरीब दिव्यांग, कुष्ठरोगी बांधवांचे अभ्यंग स्नान घालून त्यांना कपडे परिधान करत त्यांचे मनोभावे पूजन यावेळी करण्यात आले. दरम्यान संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांनी गोपाला गोपाला देवकीनंदन गोपालाच्या गजरात सोहळ्याला उपस्थित गरजूंना उबदार ब्लँकेट्रसब महिलांना साडी व पुरुषांना वस्त्रदानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी झालेल्या अन्नदान व वस्त्रदानाकरिता कै. गोविंदराव अच्युतराव उर्फ अण्णासाहेब देशमुख तर्फे प्रतिभा देशमुख, व्यवस्थापक प्रशांत देशमुख, सुधाकर साबडे, समाजसेवक गजानन जवंजाळ, समाज प्रबोधनकार भरत महाराज रेळे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहांवर गुन्हा दाखल करा-सम्राट अशोक प्रतिष्ठान

## शहांची केंद्रीय मंत्रिपदावरून हकालपट्टी करा, भारतीय बौद्ध महासभेची मागणी



**महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि. २४ :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याचे सोमवारीही पडसाद उमटले. सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीमशक्ती संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. शाहांवर गुन्हा दाखल करून त्यांना मंत्रिपदावरून हटवण्यात यावे, यासह अन्य मागण्या करण्यात आल्या.

गृहमंत्री अमित शाह यांनी संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संसदेत एकेरी भाषेत उल्लेख करून अवमान केल्याचे सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीमशक्ती सामाजिक संघटनेने राष्ट्र पतींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारंवार एकेरी भाषेत उल्लेख करून बाबासाहेबांचे कार्य, देशासाठी असलेले योगदान विसरून त्यांना कमी लेखण्याचा निंदनीय प्रकार घडला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ एक नाव नसून मानवतेचा समतेचा संदेश देणारा विचार आहे. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्र्यांवर कारवाई करण्यासह अन्य मागण्या मंजूर न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही प्रतिष्ठानतर्फे देण्यात आला आहे. प्रा. विजय आठवले, भीमशक्ती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, अनिल तायडे, अनिल गवई, विद्याधर मोहोड, संदेश गवई, प्रा. सुनील कांबळे, प्रा शैलेश इंगळे उपस्थित होते. सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने पुढील काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा एकेरी उल्लेख करून अवमान केल्या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना तात्काळ त्या पदावरून हटवावे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी बेजबाबदार वक्तव्य करून बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान यांचा अपमान केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेत देशाच्या गृहमंत्र्यांनी चुकीचे वक्तव्य केल्यामुळे संपूर्ण देश दुखावला असून अमित शाह यांनी महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन संपूर्ण देशाची जाहीर माफी मागावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाचा अवमान केल्यास यापुढे देशद्रोहाचा गुन्हे दाखल करण्यात यावे, यासाठी कठोर कायदा तयार करावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

अकोला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या अपमान जनक वक्तव्यामुळे त्यांना त्वरित केंद्रीय मंत्रिमंडळातून निष्कासित करत करावे, अशी मागणी भारतीय बौद्ध महासभेने सोमवारी केली. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. 'सध्या आंबेडकर, आंबेडकर म्हणायची फॅशन झाली आहे. एवढे देवाचे नाव घेतले असते तर सात जन्मासाठी स्वर्ग मिळाला असता', असे वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत केले होते. संसदेच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान आंबेडकरांच्या अवमानावरून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहात गदारोळ झाला होता. दरम्यान भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. गृहमंत्री शाह यांनी केलेल्या अपमानजनक टिपण्णीमुळे संपूर्ण देशातच नव्हे तर देशाबाहेर सुद्धा तीव्र संतापाची लाट उसळलेली आहे. हे वक्तव्य देशाला व संविधानाला काळीमा फासण्यासारखे आहे. त्यामुळे गृहमंत्र्याला त्वरित निष्कासित करावे, अशी मागणी भारतीय बौद्ध महासभेने केली. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष पी. जे. वानखडे, सरचिटणीस नंदकुमार डोंगरे, कोषाध्यक्ष विजय जाधव, डी. एस. ननीर, राहुल अहिरे, पंचशील गजघाटे, आयुष्यमान मेश्राम, रमेश गवई गुरुजी, संजय गवई आदी उपस्थित होते.

महापुरुषांचा अपमान बाबासाहेबांच्या नावाने स्मारके बांधून, बेगडी प्रेम दाखवण्याचा भाजपचा प्रयत्न उघडा पडला असून भारतीय संविधानालाही धोका असल्याचे सिद्ध होत आहे, अशी टीका प्रतिष्ठानने केली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपचे अनेक मंत्र्यांनी ४०० पार गेल्यास आम्ही भारतीय संविधान बदलून टाकू अशा वल्गना केली असेही प्रतिष्ठानचे म्हणणे आहे.

# जुन्या साड्यांपासून ड्रेस, टॉप फॅशनला पसंती!



## कापड जुने लूक नवा, खर्चही कमी; फॅशनसाठी महिलांची वेगळी शक्कल

**महासागर प्रतिनिधी,**

**बुलढाणा, दि. २४ :** सध्या जुन्या साड्यांपासून नव्या पॅटर्नच्या वन पीस जॅकेट, फ्रॉक्स, स्कर्ट, पंजाबी ड्रेस आणि इतर डिझाइनचे ड्रेस शिवण्याचा प्रवाह आहे. यासाठी कपाटातल्या जुन्या साड्यांचा उपयोग केला जात आहे. महिलांना कमी खर्चात नव्या लूकचे नवीन ड्रेस वापरण्यासाठी एक वेगळी संधी या फॅशनमुळे मिळत आहे, अशी माहिती शहरातील नामवंत लेडीज टेलरांनी दिव्य मराठीला दिली.

पूर्वी महिला नऊवारी सोबत कायमखान्याच्या चोळ्या वापरत. खण आणि रेशमी साड्यांच्या काठपदराचे ब्लाऊज त्यापासून ब्लाऊज तयार केला जात. पुढे कालबाह्य झालेल्या व फॅशनला चित्रपट कलावंत आणि मालिकांनी प्रवाहात आणले.

सध्या सण समारंभ, वेगवेगळ्या स्टेज शोमध्ये अनेकजण इरकली साड्या, काठाच्या साड्या, खाण्याच्या साड्या, रेशमी साड्यांपासून ड्रेस तयार करून वापरण्याचे काम करत आहेत. सेंट्रल बेल्ट, अम्ब्रेला, स्कर्ट टॉप, क्रॉस स्कर्ट, प्रिलवाले गोल लोग स्कर्ट फ्रॉक्स, पैठणी साडीपासून टॉप किट, फ्रुल बाह्याचे ब्लाऊज, डीप नेक वाले ब्लाऊज, बंध, लटकन, डिझाइन मोतीवर्क, जरदोसी वर्क, बांगडी वर्क अशा अनेक प्रकारचे वर्क केले जात आहेत. खण आणि रेशमी साड्यांच्या काठपदराचे ब्लाऊज शिवण्यावर भर दिला जात आहे. या नव्या ट्रेंडमुळे बंद कपाटात पडून असलेल्या साड्यांचा फेर वापर होत असल्याने महिलांमध्ये समाधानाचा भाव आहे.

कपाटातील जुन्या काठांच्या साड्यांचा वापर जुनी फॅशन नव्या पद्धतीने कपड्यांच्या रुपात सादर करण्यासाठी अनेक युवती आणि महिला सध्या खणाच्या आणि इरकली व काठपदराच्या साड्यांचे टॉप ड्रेस, वन पीस आणि जॅकेट्स तयार करून घेत आहेत.

यात कपाटात असलेल्या जुन्या आजीच्या, आईच्या आणि काकूच्या साड्यांना बाहेर पडून त्या आता वापरात येत आहे. नवे कापड घेऊन शिवण्यावर वेगळा खर्च करण्यापेक्षा यामुळे बचत होत आहे.

# परभणीतील घटनेच्या निषेधार्थ मेरा खुर्द येथे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

**महासागर प्रतिनिधी,**

**चिखली, दि. २४ :** परभणीतील घटनेच्या पार्श्वभूमीवर मेरा खुर्द येथे २३ डिसेंबर रोजी सकाळी आंबेडकरी अनुयायांनी निदर्शने केली. यावेळी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला. अंढेरा पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या मेरा खुर्द, अंत्री खेडेकर, मनुबाई, गुंजाळा, भरोसा, असोला, शिंदी आदी गावांमधील आंबेडकरी अनुयायी आज सकाळी ११ वाजता मेरा खुर्द येथे एकत्र आले.

परभणी येथे संविधानाच्या प्रतीची विटंबना आणि पोलिस कोठडीत झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूचे प्रकरण तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या वक्तव्याचा यावेळी निषेध करण्यात आला. त्यानुसार कडकडीत बंद पाहण्यात आला. सुरुवातीला आंबेडकरी अनुयायांनी बुद्ध विहारापासून महामार्गावरील मेरा चौकीपर्यंत मिरवणूक काढत अमित शाह यांच्या फ्लकाला चप्पलांची माळ घालून निदर्शने केली. मिरवणुकीदरम्यान आंबेडकरी अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. रास्ता रोको केल्यामुळे वाहनधारकांची तारांबळ उडाली. मात्र, ठाणेदार विकास पाटील यांच्या पुढाकारानंतर आंबेडकरी अनुयायांनी भाषणे देऊन त्रिशरण पंचशील घेऊन रास्ता रोको आंदोल यावेळी सर्जेराव गवई, सुनिल गवई, गौतम गवई रवींद्र गवई, मधुकर गवई, श्रीकृष्ण गवई प्रकाश गवई, आनंद गवई, उत्तम मोरे, समाधान मोरे, भीमा मोरे बबन मोरे, जय मोरे, संतोष गायकवाड आदी आंबेडकरी अनुयायी मोठया संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस प्रज्वलीत करण्यासाठी विज्ञान प्रदर्शन आवश्यक

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात डॉ. सुकेश झंवर यांचे मार्गदर्शन



**महासागर प्रतिनिधी,**

**बुलढाणा, दि. २४ :** छोट्या संकल्पनेतून मोठे शोध लागतात. हे ध्येय ठेवून आणि विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला प्रज्वलीत करण्याच्या दृष्टीकोनातून विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन आवश्यक आहे. विज्ञान व अध्यात्मही लक्षात घेणे आवश्यक आहे, असे सांगत प्रमुख पाहुणे डॉ. सुकेश झंवर यांनी विज्ञान आणि अध्यात्माबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भारती विदर्भ प्रदेश मंडळ आणि सहकार विद्या मंदिर, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ विज्ञान उत्सव २०२४–२५ अंतर्गत जिल्हास्तरीय विज्ञान प्रतिकृती, विज्ञान रांगोळी आणि पोस्टर स्पर्धेचे आयोजन २० डिसेंबर रोजी सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन बुलडाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. सुकेश झंवर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला बुलडाणा शिक्षण विस्तार अधिकारी जयमाला राठोड, वंदना टाकळकर, वाघ, इंगळे, विज्ञान भारतीच्या वतीने मनीषा घारे, लातुरकर, विद्यालयाचे प्राचार्य एल. अलागरसामी, मुख्याध्यापक अरुण पवार आदी मान्यवर उपस्थित होते. मनीषा घारे यांनी विज्ञान भारतीच्या विविध उपक्रमांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देवून भविष्यासाठी मार्गदर्शन केले. प्रदर्शनामध्ये पर्यावरण विज्ञान, आरोग्य विज्ञान व कृषी विज्ञान या विषयावर जिल्ह्यातील विविध शाळांतील ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्रदर्शनाचे परीक्षक म्हणून पाटील, इरफान, मतीन, वैष्णव आणि भांडेकर यांनी सहकार्य केले. समारोपात बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन विशाल देशमुख यांनी, तर आभार प्रदर्शन योगेश लुटे यांनी केले. विजयी विद्यार्थ्यांचा मान्यवरांकडून सन्मान या प्रदर्शनात आराध्या खंडेलवाल, मनस्वी हिवाळे, अनुज अग्रवाल, द्रिष्टी अग्रवाल, श्रीप्रसाद जाधव, नमन सुर्वे, लक्षीका पाटील, रिद्धी मेहत्रे यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. तर द्वितीय परितोषिक सृष्टी हिरगुडे, हेतल राऊत, प्रणव वाकोडे, निकीता सौदार, श्रुतीका जाधव, श्रृष्टी कानेकर यांनी पटकावले.

कार्यालय
ग्राम पंचायत रायपूर
पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर
सूचनाक्रमांक-०१

सन -२०२४-२५ (ई-निविदा) (पहिली वेळ)

ग्रा .पं. रायपूर अंतर्गत मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-विविदा प्रसिद्ध करण्यातयेत आहे.

१ दरपत्रक विक्रीचा दिनांक २४/१२ /२०२४ ला दुपारी ४.३० वा.
२ दरपत्रक स्वीकृतीचा दिनांक ३०/१२/२०२४ ला दुपारी ४.३० पर्यंत उपलब्ध राहील.
३ दरपत्रक उघडण्याचा दिनांक ३१ /१२ /२०२४ ला दुपारी ४.३० नंतर सोई नुसार उपडण्यात येईल.

स्वा.
सरपंच सचिव
ग्राम पंचायत रायपूर
पंचायत समिती हिंगणा जिल्हा नागपूर

Change Of Name

I **AMOL VINOD JOSHI**, MY SON OLD NAME IS **ADITYAVARDHAN AMOL JOSHI** AND NOW HIS NEW NAME IS **SHIVAM JOSHI**.
**ADD :** PLOT NO.8/9 NIRMAL APARTMENT DONGRE LAY-OUT GARDEN NAGPUR 440010

MY OLD NAME WAS **SHEIKH MOHSIN SHEIKH HUSSAIN ANSARI**. NOW MY NEW NAME IS **SHEIKH MOHSIN SHEIKH HUSSAIN.**
**ADD :** IBM ROAD VISWAS NAGAR ,GITTIKHADAN NAG-PUR 440013

MY OLD NAME WAS **KAMALA NAGRARE**. NOW MY NEW NAME IS **KAMAL NAGRALE.**
**ADD :** PLOT NO 21 NEAR SOMALWAR SCHOOL ASHOK COLONY KHAMLA NAGPUR - 440025

I **SANDIP NILAWAR**, MY DAUGHTER OLD NAME IS **SMAHI SANDIP NILAWAR** AND NOW HER NEW NAME IS **SMAHEE SANDIP NILAWAR.**
**ADD:** DUBEWAR LAYOUT PUSAD YAVATMAL

# ख्रिसमस ट्री सजावटीचा काळ



प्रभू येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस म्हणून साजरा होणारा हा सण आहे. नाताळ किंवा क्रिसमस हा एक प्रमुख ख्रिस्ती सण असून तो दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी येशू ख्रिस्त यांचा जन्मदिन म्हणून जगभर साजरा केला जातो. काही ठिकाणी या सणाऐवजी एपिफनी सण ६, ७ किंवा १९ जानेवारीला साजरा केला जातो. ख्रिश्चन श्रद्धेनुसार नाताळ हा सण १२ दिवसांच्या ख्रिसमस्टाईड नावाच्या पर्वाची सुरुवात करतो. जवळपास इ.स. ३४५ वर्षांत त्या वेळच्या पोप पहिला ज्युलियसने २५ डिसेंबर हा दिवस येशूंचा जन्मदिवस मानावा असा निर्णय घेतला. त्या वेळेपासून नाताळ हा दिवस २५ डिसेंबर या तारखेला साजरा केला जाऊ लागला. जगाच्या बऱ्याच मोठ्या भागात हा सण मध्यरात्री साजरा केला जातो, तर काही ख्रिश्चन अनुयायी व काही ख्रिस्ती पंथ मात्र सायंकाळी हा सण साजरा करतात. भगवान येशूंच्या जन्माची सुवार्ता विशद करणाऱ्या संत मॅथ्यू आणि संत ल्यूक यांच्या ज्या कथा आहेत, त्यामध्ये तसेच प्राचीन ख्रिस्ती लेखकांनी सुचविलेल्या तारखांमध्ये काही तफावत दिसून येते. सर्वात प्रथम इ.स.पू. ३३६मध्ये रोम येथे ख्रिसमस हा सण साजरा झाला, असे मानले जाते.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी एकमेकांना विविध भेटवस्तू, नाताळ शुभेच्छापत्र देऊन परस्परांचे अभिनंदन करतात. तसेच आपापल्या घरांना रोषणाई करून घर सजवले जाते. ख्रिसमस वृक्ष सजावट– ख्रिसमस ट्री– नाताळसाठी सजवलेले सूचिपर्णी झाड हा या सणाचा एक अविभाज्य घटक आहे. याच दिवशी रात्री सांता क्लॉज लहान मुलांसाठी भेटवस्तू वाटतो, असे मानले जाते. यामध्ये चॉकलेट, केक, आदी वेगवेगळे पदार्थ बनविले जातात.

प्रभू येशूंच्या जन्मदिनाचे महत्त्व: ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ बायबलच्या संत लूक व संत मत्तय या दोन्ही शुभवर्तमानांमध्ये ख्रिस्तांच्या जन्माची हकीकत वर्णन केली आहे. त्यानुसार त्यांचा जन्म जुदेआच्या बेथलेहेम या गावी एका गोठ्यात झाला. संत लूकच्या लेखनातून येशूची आई मारिया आणि वडील योसेफ यांच्या दृष्टिकोनातून बेथलेहेमच्या यात्रेचा वृत्तान्त दिलेला आहे. असे मानले जाते की, या दिवशी देवदूताने त्यांना मसिहा म्हणून उद्देशिले व आजूबाजूचे सर्व मेंढपाळ त्यांची स्तुती करत होते. तसेच संत मॅथ्यू यांच्या सुवचनानुसार तीन राजे प्रभू येशूंना भेटायला आले होते. त्याच लोकांनी प्रभू येशूंना भेटवस्तू दिल्या. प्रभू येशूंच्या जन्माचा संदेश मिळताच त्यावेळच्या राजा हेरॉडने दोन वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना ठार मारायचे आदेश दिले. त्यामुळे प्रभू येशूंचे कुटुंबीय जीव वाचवण्यासाठी इजिप्तला गेले. आत्म्याच्या योगे गर्भवती झाल्याचे स्वप्नातील दर्शनाद्वारे एका दूताने योसेफाला सांगितले. मोठ्या आनंदाने त्याने मारियाला आपली पत्नी म्हणून स्वीकारले. योगायोगाने त्याच वेळी सीझर ऑगस्टस याने साऱ्या जगाची माहिती नावांनिशी लिहिली जावी, अशी आज्ञा केली. योसेफ हा बेथलेहेम या गावचा असल्याने त्याने आपल्याला वाग्दत्त असलेली मारिया हिलाही आपल्या बरोबर घेतले. तेथे पोहोचल्यावर तिचे दिवस भरले. परंतु सर्व उतारशाळा– धर्मशाळा भरल्या होत्या. त्यामुळे गाईच्या गोठ्यात त्यांनी आसरा घेतला. तिथेच मारियाने आपल्या पुत्राला जन्म दिला. मानव होऊन देव माणसात वस्ती करू लागला. स्वर्गीय देवदूतानी आपल्या राजेशाही थाटात त्यांच्यासाठी गायन गायिले. मेंढरे राखणाऱ्या मेंढपाळानी दिव्य बाळाचे दर्शन घेतले. पूर्वेकडच्या विद्वान लोकांनी येशू बाळाचा शोध घेऊन त्याला नमन केले. तर हेरोद राजाचे धाबे मात्र दणाणले. अशा प्रकारे कितीतरी वर्षापूर्वी विविध भविष्यवाद्यांनी जुन्या करारात केलेले भाकीत पूर्ण झाले. कुमारी गर्भवती होईल आणि पुत्र प्रसवेल (यशया: ७:१४). यहुद्यांच्या वंशास तारणारा जन्मास येईल (उत्पत्ती: ४९:१०). तो दाविदाच्या घराण्यात जन्म घेईल (येहेज्केल: ३४:२३). ख्रिस्तजन्मापूर्वी इ.स.५०० वर्ष आधी मिखा भविष्यवाद्याने देखील हेच भविष्य सागितले होते (मिखा: ५:२).

**नाताळ**
**प्रभू येशू जन्मोत्सव**
**ख्रिसमस डे विशेष**

रोमन कालगणनेनुसार २५ डिसेंबर ही तारीख हिवाळ्यातील संक्रांत अथवा अयनकाळाचा दिवस आहे. प्रतीकात्मक कारणासाठी भगवान येशू यांनी आपल्या जन्मासाठी हा सर्वात छोटा दिवस निवडला, अशी धारणा आहे. प्राचीन धर्मोपदेशक ऑगस्टाईन यांनी नोंदविले आहे की, आपल्या पृथ्वीय अनुमानानुसार भगवान येशू सर्वात छोट्या दिवशी जन्माला आले. तरीही त्यामागील उदात्त आशय असा आहे की, त्या दिवसानंतर पुढे दिवस मोठा होत जातो. त्यामुळे भगवान येशू आपल्यासाठी लीन झाले आणि त्यांनी आपल्या उन्नतीचा मार्ग आपल्याला दाखविला. कारण यानंतरच्या दिवसांमध्ये सूर्य अधिक काळ प्रकाश देत राहतो. या जन्माच्या स्मरणाचे औचित्य साधून चर्चमध्ये सायंकाळपासून प्रार्थना म्हणण्यात येतात. ख्रिस्ती बांधव या विशेष उपासनेस आवर्जून उपस्थित राहतात. काही ठिकाणी नाताळ सणापूर्वी आठवडाभर लहान मुले घरोघरी जाऊन येशूच्या जन्माची गाणी म्हणतात. त्यांना कॅरॉल असे म्हणतात.

क्रिसमस किवा नाताळ हा सण प्रारंभीच्या ख्रिस्तसभेत मुळीच अस्तित्वात नव्हता. खरे पाहता पूर्वी येशूजन्माचा उत्सव मागी लोकांच्या आगमनापर्यंत ६ जानेवारी या दिवशी साजरा केला जाई. पौर्वात्य ख्रिस्तसभेमध्ये तिसऱ्या शतकात आणि रोमन ख्रिस्तसभेमध्ये इ.स. ३०० च्या जवळपास नाताळ साजरा करण्यात येऊ लागला. रोम शहरात ही तारीख २५ डिसेंबर अशी ठरविण्यात आली. परंतु इतरत्र मात्र वेगळ्या दिवशी हा सण साजरा केला जाई. रोममधील रोमन लोक सूर्याची देव म्हणून उपासना करीत. २२ डिसेंबरनंतर सूर्याचे दक्षिणायन संपून त्याचे उत्तरायण सुरू होते व दिवस मोठा होऊ लागतो. रोमन लोकांच्या धार्मिक श्रद्धेनुसार हा सूर्याचा जणू नवीन जन्म असतो. आपल्या देवाचा हा नवजन्म रोमन लोक मोठ्या आनंदाने साजरा करीत. कॉन्स्टन्टाईन या रोमन सम्राटाने याच सुमारास ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्याने ख्रिस्ती धर्माला प्रोत्साहन देण्यासाठी सूर्याची उपासना न करता सूर्याचा निर्माता आणि नीतिमत्तेचा सूर्य जो प्रभू येशू त्याची उपासना करणे सुरू केले. अशा प्रकारे २५ डिसेंबर हा दिवस रोमन कॅथोलिक ख्रिस्तसभेत प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मदिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. सूर्यदेवाच्या वाढदिवसाला रोमन भाषेत नातालीज सोलिस इनइक्टिटी म्हणजे अजिंक्य सूर्यदेवाचा वाढदिवस असें म्हणत. त्यावरून या उत्सवाला नाताळ असें नाव पडले. संत क्रिजोस्तम तर म्हणत, आपल्या प्रभूवाचून आणखी दुसरा अजिंक्य देव तो कोण आहे? तो तर न्यायाचा सूर्य आहे.

कॅथोलिक ख्रिस्तसभेमध्ये ख्रिस्तजन्माची स्मृती म्हणून गोशाळा किवा गायीचा गोठा तयार करण्याचा प्रघात आहे. ही परंपरा संत फ्रान्सिस असिसिकर याने १२२३ साली सुरू केली. ग्रेसिओ नावाच्या एका लहान गावाजवळ असलेल्या गुहेमध्ये त्याने खरी गाय, उंट, मेंढरे, गाढवे आदी आणून असा देखावा निर्माण केला. त्याद्वारे लोकांना देवाच्या अपार दयेची व ख्रिस्ती धर्माची शिकवण दिली. ही प्रथा गावातील लोकांनी पूर्वापार पाळत ठेवली. असे म्हणतात की, त्या वेळी संत फ्रान्सिस याने पवित्र मिस्सा अर्पण केली व लोकांना भावस्पर्शी प्रवचन दिले. त्या प्रवचनाच्या शेवटी या संताच्या हातात खरोखरच एक जिवंत बालक अवतरल्याचे लोकांनी पहिले. त्यामुळे गोशाळा उभारण्याच्या प्रथेला आणखी बळकटी मिळाली. अकराव्या व बाराव्या शतकात ख्रिसमस कॅरॉल किवा नाताळ गीतांची प्रथा जर्मनीत सुरू झाली. दहाव्या शतकात ख्रिसमस ट्री सजवण्याची परंपरा सुरू झाली. ख्रिसमस ट्री हे स्वर्गातल्या ईडन बागेतील झाड व क्रूसाचे झाड यांचे प्रतीक आहे. ख्रिसमस ट्रीचा अधिक सविस्तर उल्लेख १६०५मध्ये आढळतो.

!! ख्रिस्ती बांधवांना नाताळ निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

: संकलन व शब्दांकन :
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी**
गडचिरोली
फक्त मधुभाष ७१३२७९६६८३.

# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी



कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## परमेश्वराच्या अस्तित्वाचा अनुभव : संत राजिन्दर सिंह जी महाराज

चला तर आपण एक प्रयोग करूया. एका दिवसात परमेश्वराची आपण किती आठवण काढतो, एक वेळा अथवा दोन वेळा? इतर वेळेस आपण परमेश्वराला का विसरतो? आणि याच गोष्टीचा विचार करितो की आपणच कर्ताकरविता आहे आणि आपल्या करण्यानेच हे होत आहे?

आपण परमेश्वराची आठवण करण्याच्या वेळामध्ये थोडी वाढ करायचा प्रयत्न करूया. आपण परमेश्वराला आपल्या बरोबर कामावर, आपल्या कुटुंबात, आपल्या मित्रांमध्ये आणि इतर दिनचर्या मध्ये घेऊन जातो का? आपण प्रत्येक क्षणी परमेश्वरा बरोबरच चालतो का? जेव्हा आपल्या जीवाला धोका असतो तेव्हाच आपण परमेश्वराची आठवण करतो. कधी जेवताना, कपडे घालताना, चालताना, चर्चा करताना, काम करताना, खेळताना अथवा झोपताना कधी परमेश्वराला बोलावितो का? पण असे करणारा प्रत्येक जण परमानंद आणि सदैव टिकून राहणारी खुशी प्राप्त करतो. जीवनातील उतार–चढावापासून भय रहात नाही. ही आपल्या अंतरातील ईश्वरीय दैवी शक्ती आहे. जी आपल्याला आव्हानांशी सामना करण्याची शक्ती आणि साहस देते. प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या वेळी शारीरिक समस्यांशी सामना करावा लागतो. कधी कधी आपल्याला आश्चर्य वाटते काय आपण यातून बाहेर निघू शकू? पण जेव्हा आपण या समस्यांना यशस्वी रित्या सामोरे जातो तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटते की आपण हे कसे पार केले. यातील प्रत्येक अनुभव या ईश्वरी शक्तीचा परिणाम आहे, जी सदैव आपणा बरोबर असते. आपण कधीही एकटे नसतो. परमेश्वर सदैव आपल्या बरोबर असतो. जेव्हा पण आपल्याला कोणत्याही अडचणी चा सामना करावा लागतो, जो आपल्याला अत्यंत कठीण वाटतो, तेव्हा आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की आपण एकटे नाही. परमेश्वराचा अदृश्य हात सदैव आपल्या बरोबर आहे. आपण परमेश्वराला पाहू तर शकत नाही, पण परमेश्वराच्या शक्तीचा जरूर अनुभव घेऊ शकतो. बऱ्याच वेळा आपण देखील आपल्या अंतरी परमेश्वराच्या अदृश्य शक्तीचा अनुभव घेऊ शकतो. आपण जेवढे जास्त ग्रहणशील बनू, आत्मसात करू, तेवढे जास्त त्या शक्तीचा अनुभव करू शकू. त्याकरिता जेव्हा पण आपणाला संकटाशी सामना करावा लागतो, तेव्हा आपणाला त्या लोकांना आठवावे, ज्यांच्या समोर याहूनही मोठी संकटे उभी होती, आणि ते सफलतापूर्वक यातून बाहेर पडले. जीवनातील आव्हानांचा सामना आपण निर्भिडपणे करावा. तसेच आपण पूर्ण प्रयत्नांची शर्त करू या, पण परिणाम परमेश्वराच्या इच्छेवर सोडून द्यायला हवा.

# श्रीमहालक्ष्मी व्रतासोबत महाकालीची उपासनाही आवश्यक!

सध्या मार्गशीर्ष महिना सुरु आहे. या महिन्यातील गुरुवारी बहुतांश महिला श्री महालक्ष्मी व्रत करतात. या दिवशी दिवसभर उपवास केला जातो. चौरंगावर श्री महालक्ष्मीच्या रूपाने कलश मांडून तिची मनोभावे पूजा केली जाते. सुगंधी फुलांचा गजरा किंवा वेणी माळली जाते. देवीसमोर श्री महालक्ष्मी व्रताची कथा आणि महती महिती यांचे वाचन केले जाते. देवीची आरती केल्यावर देवीला पाच फळांचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या काही वर्षांपासून पूजेच्या कलशावर देवीचा मुखवटा लावून त्यावर वस्त्र आणि दागिने यांची सजावट करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. अनेक महिला हौस म्हणून पूजेच्या चौरंगाभोवती आकर्षक फुलांची सजावट करतात, दाराबाहेर रांगोळी काढून दारात पणत्या लावतात. नैवेद्यासाठी गोडधोड बनवतात. महाराष्ट्रात बहुतांश प्रांतात महिला हे व्रत करत असून वर्षागणिक व्रत करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढच होत आहे. शहरासारख्या ठिकाणी नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलाही वेळात वेळ काढून हे व्रत करतात. येणारा गुरुवार हा मार्गशीर्ष महिन्यातील अखेरचा गुरुवार असणार आहे. या दिवशी महालक्ष्मी व्रताचे उद्यापन केले जाते त्यानिमित्ताने सवाष्ण महिलांना वाण, गजरा अथवा फुल आणि हळद कंकू दिले जाते. श्री महालक्ष्मी देवीप्रती असलेली श्रद्धा याबरोबरच महालक्ष्मी देवीची कृपा आपल्या कुटुंबावर सदैव राहावी हा सकाम हेतूही या व्रतामागे दडलेला असतो.

शालेय जीवनात ज्ञानार्जन करून आपण श्री सरस्वती देवीची उपासना करत असतो. अनेक महिला आज उच्च शिक्षण घेऊन न्याय, वैद्यक, संशोधन, सैन्य, पोलीस आदी सर्वच क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. उद्योजक क्षेत्रातही अनेक महिलांनी आज उत्तुंग भरारी घेतली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढू लागला आहे. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान घेऊन त्यामध्ये पारंगत होणे ही श्री सरस्वती देवीची उपासनाच आहे. शक्तीची अर्थात देवीची तीन प्रमुख रूपे आहेत. त्यांतील श्री सरस्वती आणि श्री महालक्ष्मी या देवीच्या तारक रूपाची उपासना आपण प्रत्येक जण करत आपापल्या परीने करत असतो; मात्र देवीच्या ज्या रूपाच्या उपासनेची आज नितांत आवश्यकता आहे त्या भक्तांच्या उद्धारासाठी दृष्टांचा संहार करणाऱ्या महाकालीची उपासना महिलावर्ग केव्हा करणार आहे ?



सध्याची देशाची आणि समाजाची स्थिती पाहता कोणत्याच क्षेत्रात महिला सुरक्षित नाहीत. स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये वर्षागणिक कमालीची वाढ होऊ लागली आहे. शहर असो वा खेडे, गरीब असो वा श्रीमंत, शाळकरी कन्या असो वा वयोवृद्धा वासनांधांच्या विखारी नजरांपासून आज कोणीच सुरक्षित नाहीत, दर मिनिटागणिक देशात कुठल्या ना कुठल्या ठिकाणची स्त्री आज अत्याचाराला बळी पडू लागली आहे. स्त्री अत्याचारावर अंकुश आणण्यासाठी कठोर कायदे करूनही या घटनांमध्ये घट झालेली नाही. स्त्रीने आर्थिक दृष्ट्या सबळ व्हावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली मात्र महिलांच्या सुरक्षेसाठी शासन राबवत असलेल्या योजना केवळ नावाला शिल्लक असल्याने स्त्री अत्याचाराचा आलेख तिळमात्र कमी होताना दिसत नाही.

ज्या महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण दिली त्याच छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात स्त्रीची होत असलेली अवहेलना लज्जास्पद आहे. पोलीस प्रशासन असो वा नातेवाईक, सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या मदतीला धावून येऊ शकत नाहीत. त्यासाठी स्त्रियांनी स्वतःचे रक्षण स्वतः करण्यासाठी सिद्ध व्हायला हवे. प्रतिकूल प्रसंग केव्हा येईल ही वेळ कधी सांगून येत नाही त्यासाठी आपले मन आणि शरीर सततच प्रतिकारक्षम ठेवण्याची गरज आहे आणि त्याकरिता प्रत्येक स्त्रीने स्वतःचे रक्षण स्वतः करण्याची कला अवगत करून घ्यायला हवी. स्वसंरक्षणाचे किमान प्रशिक्षण प्रत्येकीने आजच्या काळात घ्यायलाच हवे. देवीच्या महाकाली स्वरूपात तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहे. या शस्त्रांचा वापर करून तिने सज्जनांचे रक्षण आणि दृष्टांचा संहार केला आहे. देवीच्या या रूपाची उपासना आज प्रत्येकी स्त्रीने करायला हवी. राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, राणी चेन्नमा यांनी आपल्या राज्याच्या रक्षणासाठी प्रसंगी शस्त्र हाती घेऊन पराक्रम गाजवला आहे, पराक्रमी स्त्रियांची अशी अनेक उदाहरणे इतिहासात घडून गेली आहेत. या प्रत्येकीने शस्त्रांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले होते, त्यांच्यामध्ये कमालीचे मनोधर्य आणि दुर्दम्य इच्छाशक्ती होती. या रणरागिणींचा आदर्श समोर ठेवून समाजात माजलेल्या वासनांध शक्तींचा संहार करण्यासाठी आता प्रत्येक स्त्रीने सज्ज हायला हवे. लाठीकाठी, ज्युडो काराटे आदींचे अद्यावत प्रशिक्षण घेऊन दृष्ट शक्तींवर प्रहार करण्यासाठी सज्ज व्हायला हवे. स्त्रीची अबला ही ओळख पुसून ती प्रसंगी सबला होऊन रणरागिणीही होऊ शकते हे समाजाला दाखवून देण्याची वेळ आली आहे. विद्येची देवता श्री सरस्वती, धनाची देवता श्री महालक्ष्मी यांसोबत येणाऱ्या नवीन वर्षात शक्तीची देवता श्री महाकाली मातेची उपासना करण्याचा संकल्प करूया. जेणेकरून येणाऱ्या काळात राज्यातील स्त्री अत्याचाराचा आलेख उतरलेला असेल.



**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# भीक देणेघेणे हा अक्षम्य गुन्हा!



आपणांस सगळीकडे खास करून बस स्टॉप, तिर्थक्षेत्री किंवा जिथे लोकांची जास्त वर्दळ असते अश्या ठिकाणी भीक मागणारे आवर्जून पहायला मिळतात. याचे कारण मानवी भुतदया हे आहे. याचा गैरफायदा घेणारे अनेक असामाजिक तत्व कार्यरत आहेत. असे सरकारला आढळून आले आहे. गरीब घरची मुलं–मुली, बाया, अपंग व्यक्ती खासकरून भिक मागतांना आढळून येतात. यातील अनेक बनावट असतात. लहान मुलांना पळवून नेऊन त्यांना अशी कामे करायला भाग पाडले जाते. असे अनेक सर्वेक्षणात आढळून आले आहे.

भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्यांचा मध्य प्रदेश सरकारने पर्दाफाश केला आहे. मध्य प्रदेशातील इंदोरला भिकारी मुक्त करण्यासाठी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. इंदोर शहरात फिरणाऱ्या भिका–यांना नविन वर्षात भीक मागण्याची बंदी घातली गेली आहे. असा बंदीचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केला आहे. १ जानेवारी २०२५ पासून ही बंदी कार्यरत होणार आहे. यासाठीची जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. १ जानेवारीपासून कुणीही भीक देतांना आढळून आला तर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला जाणार आहे. भीक देऊन पापाचे भागीदार बनू नका असे प्रशासनाचे म्हणणे आहे. ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. मुंबई शहरात अनेक भीकारी हे लक्षाधीश असल्याचे निदर्शनास आले आहेत. भीका–यांचे सुध्दा सक्षम नेटवर्क तयार झाले आहे. याला धंद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यात अनेक गुन्हेगारांचे संघटन कार्यरत आहेत. ते लहान मुलांना हेरून त्यांचे अपहरण करतात आणि त्यांना वाममार्गाला लावतात. चोरी, भीक मागायला बळजबरीने भाग पाडतात. भीक मागून उदरनिर्वाह चालवीणे याची काही कामचोर लोकांना सवय जडली आहे. मोठ्या शहराच्या ठिकाणी भीक मागण्याच्या आडून अनेक अनैतिक कामे शारीरीकदृष्ट्या सक्षम लोकांकडून करून घेतली जातात. याचे मोठे रॅकेट, जाळे असल्याचे पोलिस विभागाला निदर्शनास आले आहे. याला अवैध छुप्या व्यवसायाचे स्वरूप प्राप्त करून दिले जात आहे. या व्यवसायाची उलाढाल लाखों रूपयांची आहे. यासाठी लहान मुलामुलींना, अपंग व्यक्तींना, मनोरूग्णांना भीक मागण्यास भाग पाडले जाते. त्यांचे मानसिक व आर्थिक शोषण केले जाते. त्यांना भुकेले ठेवले जाते. त्यांची प्रतारणा केली जाते. यावर कुणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. काहीही काम न करता भिका–याचे सोंग घेऊन हे लोक गर्दीच्या ठिकाणी वावरतांना आढळून येतात. अनेकदा पाकिटमारी, सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये यांचा समावेश असलेला दिसून येतो. यात काही महिला पणं आघाडीवर असतात. यांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारने पाऊल उचलणे सुरू केले आहे. कुठलेही कष्टीक काम न करता भीक मागणे सोपे काम झाले आहे. काही फुकटछाप सरकारी योजना पणं यासाठी कारणीभूत ठरतात आहेत. याकडे पणं जनतेचे लक्ष वेधले गेले पाहिजे. आज लोकांना कुठलेही काम न करता विविध योजनांचा लाभ मीळत असल्याने शेतीसाठी व इतर कामांसाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. यामुळे कामचुकारपणा वाढीस लागलेला आहे. भीक मागून उदरनिर्वाह चालवीणे याची काही कुटुंबांतील लोकांना सवय जडली आहे.

इंदोर येथील जिल्हाधिकारी यांचा आदर्श सर्वच जिल्हातील जिल्हाधिकारी यांनी घेतला पाहिजे. या योजनेची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे सर्वत्र झाली पाहिजे. असे करतांना भीकारी लोकांच्या पणं ज्या काही समस्या असतील त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. त्यांना चांगले व स्वाभिमानी जगणे जगण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. काहींच्या हातांना काम उपलब्ध करून दिले पाहिजे. त्यांच्या वयोमानानुसार त्यांना सरकारच्या सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. सरकारच्या लालफित शाहीचा फटका त्यांना बसणार नाही याची काळज जिल्हाधिकारी यांनी घेतली पाहिजे. अखेर काय मानवता जपली गेली पाहिजे. सगळेच भीकारी हे स्वइच्छेने भीकारी झालेले नसतात. तर अनेकांना बळजबरीने या कामात ढकलले जाते. याचे पाठीमागे कोणं आहेत याचा पणं शोध जिल्हाधिकारी यांनी घेतला पाहिजे. यासाठी जवाबदार असणा–या लोकांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. लोकांच्या हातांना काम द्या. त्यांचे कडून कामे करवून घ्या. तरच भीकारीमुक्त शहराचे आणि गावांचे स्वप्न साकार होईल असे वाटते.

**मिलिंद गड्डमवार, राजुरा**
**(सामाजिक कार्यकर्ता, मुक्त पत्रकार)**
**मो.क्र. ९५११२१५२००**

# ‘कायद्या’पेक्षा ‘हे’ मोठे आहेत का?’

**वाचकांचे मनोगत**

भारताच्या राजकारणात ‘भावी पंतप्रधान’ अशी ओळख असलेले, शरद पवार गटाचे सर्वेसर्वा आणि वयोवृद्ध (?) कारभारी शरद पवार यांचा काही दिवसांपूर्वी दिल्ली येथे धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्यात आला. ते आजही जाहीरपणे सांगतात की, मी अजून म्हातारा (?) झालो नाही. म्हणूनच त्यांना, त्यांच्या कुटुंबियांना, कार्यकर्त्यांना, बगलबच्च्यांना वाईट वाटू नये म्हणून कितवा वाढदिवस याचा उल्लेख केला नाही, असो. महाराष्ट्राचा 'जाणता राजा' (?) असल्याने राजकीय, उद्योग, सांस्कृतिक, सामाजिक आदी सर्वच क्षेत्रांतील रथी–महारथी या सोहळ्याला जातीने हजर होते. या सर्वांसमक्ष काकांनी वाढदिवसाचा केक कापला खरा. पण, चाकू, सुरी न वापरता त्यांनी चक्क तलवारीने केक कापला. पण, कोणालाही आश्चर्य वाटले नाही. तलवारीने केक कापणे हा कायद्याने गुन्हा आहे. आजपर्यंत अनेक मुले, तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. काहींनी तर 'सरकारी पाहूणचार'ही घेतला आहे. मुंबईत एका व्यक्तीने आपल्या कुटुंबासह घरात तलवारीने केक कापला. पोलिसांना ही बाब समजताच, तात्काळ ते त्याच्या घरी पोहोचले; आणि त्याच्यावर गुन्हा दाखल केला. आपल्या काकांनी तर हजारो माणसांसमोर सार्वजनिक ठिकाणी तलवारीने केक कापला. पण, हजर असलेल्या कोणा एकाही 'प्रतिष्ठी'ताला, त्यात काही चुकीचे वाटले नाही. विशेष म्हणजे, दिल्ली पोलिसांनाही हे खटकले नाही. कारण ते महाराष्ट्राचे 'जाणते राजे' आहेत. पुढेही त्यांच्यावर गुन्हा दाखल होणार नाही, ही 'काळ्या दगडावरची पांढरी रेघ' आहे. आश्चर्य म्हणजे, 'उघडा डोळे, बघा नीट' असा प्रेक्षकांना शहाणपणाचा डोस पाजणा–या वृत्तवाहिन्यांनीही आपल्या डोळ्यावर पट्टी बांधनेच पसंद केले, असो. पण, यावरून हेच सिद्ध होते की, कायदा बनविणारेच कायद्याची कशी 'पायमल्ली' करतात, 'कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, कायदा हा सर्वांसाठी समान आहे' या फक्त 'शिळोप्या'च्याच गप्पा असतात. एकंदरीत 'कायद्याचा बडगा' हा फक्त गोर–गरीब व सर्व सामान्य माणसांविरुध्द वापरण्याचे हत्यार आहे. धन्य ते कारभारी आणि धन्य ते प्रशासन.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक. मोबाईल ८७६७५९२९८०**

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरने केली यशस्वी दुर्मिळ हृदयरोग शस्त्रक्रिया

## महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णाचे वाचविले प्राण



**नागपूर, २४ डिसेंबर :** भंडारा येथील टंडन वॉर्डतील निवासी ६३ वर्षीय पुरुष रुग्णाला छातीत वेदना आणि धडधडीच्या तक्रारीसह शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या आपत्कालीन विभागात दाखल केले गेले. अत्यंत गंभीर स्थितीत रुग्णालयात दाखल झालेल्या या रुग्णाला हृदयाशी निगडीत दोन गंभीर आणि गुंतागुंतीच्या आजाराचे निदान करण्यात आले.

रुग्णाच्या हृदयातील सिंगल-व्हेसलमध्ये अडथळा येत होता. सोबतच त्याच्या मोठ्या अपिकल पोस्ट-मायोकार्डियल इन्फार्क्शन व्हेंट्रिक्युलर सेप्टल रप्चर आणि लेफ्ट व्हेंट्रिक्युलर अपिकल एनीरीझममुळे रक्तवाहून नेणाऱ्या धमण्या अरुंद झाल्या होत्या. त्याच्या हृदयात निर्माण झालेली गुंतागुंत पाहता जलद हस्तक्षेप करीत रक्तपुरवठा सुरळीत करण्यासाठी त्वरित शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक झाले होते.

रुग्णाला तातडीने डॉ. सुंबुल सिद्दीकी यांच्या तज्ज्ञ देखरेखीखाली शालिनीलाई मेघे रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या आपत्कालीन हृदयविकार विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुपरस्पेशलिटी इन्स्टिट्यूटमध्ये (१०२० खाटांचे रुग्णालयात) हलविण्यात आले. येथे सर्व तपासण्या पूर्ण केल्यानंतर रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी तयार करण्यात आले.

डॉ. सुंबुल सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील कौशल्यपूर्ण शस्त्रक्रियाच्या टीमने जलद हस्तक्षेप करीत व्हीएसआर पॅच क्लोजर आणि डीओआर ची प्रक्रिया पूर्ण केली. या शस्त्रक्रियेत डॉ. अजय हरदास यांनी सहाय्य केले. तर डॉ. रुपाली शेंद्रे यांनी भूल व्यवस्थापन केले. शस्त्रक्रियेदरम्यान योग्य रक्ताभिसरण व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी पर्फ्युजनिस्ट्स श्री. क्रिस्टीना आणि श्री. अंशुल यांनी मोलाचे योगदान दिले. शल्यक्रिया विभागातील व्यवस्थापन सिस्टर आरती, सिस्टर मिताली आणि ओटी तंत्रज्ञ किशोर, ओंकार, रागिनी आणि ब्रदर गणेश यांनी सांभाळले. क्लिनिकल सहाय्यक म्हणून डॉ. मोहम्मद आवेस हसन, डॉ. समीन, डॉ. निलकंठ, डॉ. गजानन, डॉ. सोनाली आणि डॉ. कुमकुम यांनी जबाबदारी सांभाळली.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला हृदयविकार विभागातील अतिदक्षता युनिटमध्ये दाखल करण्यात आले. येथे ब्रदर आशिष, स्वप्निल, प्रवीन, अमित, ऋतिक, आदर्श, संघर्ष, निखिल, आणि हर्षल यांच्या देखरेखीखाली रुग्णाच्या प्रकृतीचे व्यवस्थापन करण्यात आले. वार्ड इंचार्ज सिस्टर कल्पना, रोशनी आणि स्वाती यांनी रुग्णाची सुश्रूषा करीत योग्य देखरेख केली. पॅरामेडिकल स्टाफ अमन, प्रियंका आणि प्रभीन यांनी देखील रुग्णाच्या देखरेखीत महत्त्वाची भूमिका निभावली.

रुग्णाला यशस्वीरित्या डिस्चार्ज देण्यात आला. त्याच्या कुटुंबाने हृदयविकार विभागातील टीम आणि शालिनीताई मेघे हॉस्पिट आणि रिसर्च सेंटरच्या त्वरित आणि जीवन वाचवणाऱ्या हस्तक्षेपाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ही प्रगत शस्त्रक्रिया महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत विनामूल्य करण्यात आली. त्यासाठीचे आयोजन श्री. प्रतीक आणि श्री. धनंजय यांनी श्री. अहमिंद्र जैन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रशासकीय प्रमुख डॉ. नूरुल अमीन आणि विभाग व्यवस्थापक प्रणाली पोखळे यांनी प्रशासकीय बाजूंची काळजी घेतली.

या शल्यक्रियेबाबत डॉ. सुंबुल सिद्धीकी म्हणाले, अक्यूट मायोकार्डियल इन्फार्क्शन नंतर व्हेंट्रिक्युलर सेप्टल रप्चर ही हृदयविकारातील दुर्मिळ आणि अत्यंत घातक स्थिती असते. अशा वेळी त्वरित निदान आणि ठराविक शस्त्रक्रिया करून जीवन वाचविण्याचे आव्हान डॉक्टरांसमोर असते.

रुग्णाची गुंतागुंत पाहता जलद हस्तक्षेप शक्य झाल्याने रुग्णाचे प्राण वाचविल्या बद्दल टीमचे कौतूक करताना शालिनीताई मेघे रुग्णालय आणि रिसर्च सेंटरचे संचालक डॉ. अनुप मरार म्हणाले या शस्त्रक्रियेमुळे रुग्णालयातील बहुआयामी टीममधील अद्वितीय कौशल्य आणि समन्वय सिद्ध होते. रुग्णासोबत तयार झालेली जटिल स्थिती पाहता कुशल टीमवर्कमुळे रुग्णाचे प्राण वाचविण्यात यश आले. अशी प्रगत हृदय शस्त्रक्रिया यशस्वी पार करण्याची क्षमता असलेल्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मधील टीमचे समर्पणही यातून दिसत आहे. आर्थिक दुर्बल घटकातल्या रुग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य विमा योजनांच्या माध्यमातून दर्जेदार उपचार सेवा पुरवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सोबतच ही शल्यक्रिया शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरची उत्कृष्टता, नवकल्पना आणि सर्वांगीण रुग्ण देखरेखीतील वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

# तनाएराने सुरु केले 'फॉर ब्युटीफुल बिगिनिंग्स' कॅम्पेन




**नागपूर, २४ डिसेंबर :** लग्न म्हणजे भावभावनांचा उत्सव, भूतकाळ आणि नव्या अध्यायाच्या शुभारंभाचा मिलाप, असा समारंभ जिथे प्रेमाला सीमा नसतात आणि नव्या कहाण्यांची सुरुवात होते. संपूर्ण जगभरात अतिशय उत्साहाने साजऱ्या केल्या जाणाऱ्या लग्नसमारंभाचे महत्त्व अनोख्या पद्धतीने व्यक्त करत, टाटा समूहातील ब्रँड तनाएराने सुरु केले आहे 'फॉर ब्युटीफुल बिगिनिंग्स' कॅम्पेन. मृणाल ठाकूरचा प्रमुख सहभाग असलेल्या या कॅम्पेनमध्ये आठवणींचे हिंदोळे, नव्या आयुष्याबद्दलची हुरहूर आणि उत्सुकता, असीमित आशा यांच्यासह माहेरचा उंबरठा ओलांडत असलेल्या नवरीची कहाणी गुंफली गेली आहे. भारतातील विविध संस्कृतींमध्ये एकसमान असलेला अनोखा अनुभव हे लग्नाचे महत्त्व या कॅम्पेनमधून प्रस्तुत करण्यात आले आहे.

प्रदेश किंवा परंपरा कोणत्याही असोत, सर्व नवरींना एका धाग्यामध्ये गुंफण्याचे काम करतात त्या भावना आणि या कॅम्पेनमध्ये त्याच भावनांना तनाएराने सन्मानित केले आहे. लग्नामध्ये नवरीने परिधान केलेली साडी म्हणजे तिच्या आठवणी, तिची स्वप्ने आणि तिच्या आशाआकांक्षांचे सुंदर प्रतीक असते. तनाएराच्या 'फॉर ब्युटीफुल बिगिनिंग्स' मध्ये सहभागी करून घेण्यात आलेल्या सात क्षेत्रांमध्ये नवरीची साडी, वैविध्यपूर्ण कापड प्रकार, नेसण्याची पद्धत आणि डिझाईन यांच्यासह नवरीच्या आयुष्यातील परिवर्तनाची साथीदार बनते.

# दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था, सावंगी, वर्धा येथे उच्च-गुणवत्तेच्या आणि अचूक रेडिएशन उपचारांसाठी वचनबद्ध

आजकाल कर्करोग लिंग, वय किंवा वर्गाचा विचार न करता जगभर महामारीप्रमाणे पसरत आहे. हे लक्षात घेऊन आम्ही दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था, सावंगी, वर्धा येथे एक टीम म्हणून सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलची स्थापना केली आहे, उच्च पात्र वैद्यकीय आणि पॅरामेडिकल व्यावसायिकांसह अत्याधुनिक तंत्रज्ञानासह सर्वसमावेशक कर्करोग युनिट. डीएमआयएचईआरमध्ये आमच्याकडे व्हॅरियन मेडिकल सिस्टीम्सचे व्हाइटल बीम लिनियर एक्सीलरेटर आहे जे केवळ रेडिओथेरपी उपचारांमध्ये अत्यंत प्रगत नाही तर मिलिमेट्रिक ट्यूमरला लक्ष्य करण्यासाठी अचूक आणि अचूक देखील आहे. यासह, आमच्याकडे लोडर-आधारित ब्रेकीथेरपी नंतर गॅमा मेड प्लस आहे ज्यामध्ये कमी विषाच्या उच्च पातळीच्या अनुरूपतेच्या लाभासह अंतर्गत रेडिएशन थेरपी वितरणाचा समावेश आहे.

**डॉ अनुराग लुहारिया,**
**प्रमुख आणि सल्लागार रेडिओ भौतिकशास्त्रज्ञ आणि सल्लागार रेडिओलॉजिकल सेफ्टी ऑफिसर (रेडिओलॉजी / थेरपी / न्यूक्लियर मेडिसिन)**
**दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था, सावंगी, वर्धा.**

कर्करोगाच्या उपचारांच्या मुख्य घटकामध्ये रेडिएशनचा समावेश असतो जो मूलगामी आणि उपशामक हेतूने दिला जाऊ शकतो. कर्करोगाच्या उपचारासाठी रेडिएशन थेरपीला उपचार नियोजन आणि वितरणासाठी वापरल्या जाणाऱ्या उच्च-अंत तंत्रज्ञानाची अत्याधुनिक समज आवश्यक आहे. रेडिएशन थेरपी विभागातील टीममध्ये रेडिओलॉजिकल सेफ्टी ऑफिसर, रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट, रेडिओ फिजिसिस्ट आणि रेडिओथेरपी टेक्नॉलॉजिस्ट, आरटी नर्सेस यांचा समावेश आहे. संपूर्ण टीम शून्य दिवसापासून ते पूर्ण होईपर्यंत उपचाराच्या व्यवस्थापनासाठी जबाबदार आहे आणि प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचार डिझाइन करते. रेडिएशनमध्ये अत्यंत प्रगत रेडिएशन जनरेशन मशीनमधून क्ष-किरणांची निर्मिती असते. रेखीय प्रवेगक हे एक उच्च-ऊर्जा एक्स-रे जनरेटिंग मशीन नसून, संगणक-आधारित नियोजन प्रणालीद्वारे दिलेल्या सूचनांवर कार्य करते, जी सरकारच्या प्रशासन आणि देखरेखीखाली आहे.

रुग्णाच्या जीवनमानाशी तडजोड न करता सर्वोत्कृष्ट स्थानिक नियंत्रणासह कर्करोग पूर्णपणे बरा करणे हे वैयक्तिक रुग्णांसाठी संस्थेचे ध्येय आहे. या अत्यंत तंतोतंत रेडिएशन थेरपी प्रक्रियेसाठी इष्टतम नियोजन आणि अंमलबजावणीची आवश्यकता असते ज्याचा विकास आणि चाचणी प्रक्रिया सुधारण्यासाठी कठोर गुणवत्ता हमी कार्यक्रमाच्या मदतीने वचन दिले जाते. मशीनचे कार्यप्रदर्शन त्याच्या नियतकालिक सर्व्हिसिंगवर अवलंबून असते, जे तज्ञ RSO द्वारे केले जाते; जे आमच्या अत्यंत प्रगत लिनियर एक्सीलरेटर मशीनवर दैनंदिन, साप्ताहिक, मासिक आणि वार्षिक गुणवत्ता हमी प्रक्रियेसह वेळेवर तपासण्यांच्या स्वरूपात केले जाते.

उपचार सुरुवाती पूर्वी, दरम्यान आणि उपचारानंतर गुणवत्ता हमी आणि सुरक्षितता आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. आमच्या संस्थेत, प्रणालीच्या प्रत्येक घटकाचे सुनियोजित दर्जाचे ऑडिट केले जाते, जे डॉ. अनुराग लुहारिया यांनी केले आणि व्यवस्थापित केले. या प्रक्रियेचा मुख्य उद्देश रुग्णांना अचूक आणि सुरक्षित उपचार सुनिश्चित करणे आणि आम्ही वचन दिलेली गुणवत्ता प्रदान करणे हे आहे. वैधानिक प्रयोगशाळेच्या मानकांविरुद्ध सत्यापित केलेल्या सर्वात अलीकडील डोस गुणवत्तेच्या ऑडिटमध्ये, DMIHER मधील डोस अचूकता भारतातील रेडिएशन पद्धतींसाठी सक्षम नियामक संस्थेद्वारे प्रमाणित ९९% अचूक असल्याचे समोर आले. त्यापलीकडे, नियमित सर्व्हिसिंग आणि नियतकालिक AQ चे ऑडिट केले जाते आणि भारतीय नियामक संस्था म्हणजेच अणु ऊर्जा नियामक मंडळानुसार सातत्याने देखरेख केली जाते.

९९% अचूकतेचा हा ऑडिट निकाल आणि डॉ. अनुराग लुहारिया द्वारे कर्मचारी आणि रुग्ण सुरक्षा व्यवस्थापनासह विस्तृत रेडिएशन गुणवत्ता हमी कार्यक्रमासह व्यावसायिकांची उच्च पात्रता प्राप्त टीम आश्वासन देते की DMIHER तुम्हाला सर्वोत्तम रुग्ण सेवेसह उच्च दर्जाचे आणि अचूक उपचार प्रदान करते.

# बजाज फिनसर्व्ह ELSS टॅक्स सेव्हर फंडचे बजाज फिनसर्व्ह AMC कडून लाँचिंग

**नागपूर, २४डिसेंबर :** बजाज फिनसर्व AMC ने बजाज फिनसर्व ELSS टॅक्स सेव्हर फंडची घोषणा केली आहे, जो तीन वर्षांच्या कायदेशीर लॉक-इन कालावधी आणि करसवलतीसह एक खुल्या प्रकारची इक्विटीशी संबंधित बचत योजना आहे. हा फंड सदस्यतेसाठी २४ डिसेंबर २०२४ रोजी सुरू होईल आणि नवीन फंड प्रस्ताव कालावधी २२ जानेवारी २०२५ रोजी संपेल.

बजाज फिनसर्व ELSS टॅक्स सेव्हर फंड दीर्घकालीन कालावधीत कर बचतीसह संपत्ती निर्माण करण्याचे दुहेरी लाभ साध्य करण्यासाठी इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे जे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याच्या संधी शोधत आहेत आणि ज्यांना मुख्यतः इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित साधनांमध्ये गुंतवणूक करायची आहे, त्याचबरोबर १९६१ च्या आयकर अधिनियमाच्या कलम ८० अंतर्गत कर सवलतीचा लाभ घ्यायचा आहे.

बजाज फिनसर्व्ह एएमसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोहन म्हणाले, आम्ही व्यक्तींना त्यांच्या दीर्घकालीन उद्दिष्टांशी सुसंगत स्मार्ट वित्तीय उपायांसह सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहोत. इक्विटी बाजार अल्पकालीन अस्थिर असू शकतात, परंतु दीर्घकालीन काळात संपत्ती निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. ईएलएसएस, ज्यामध्ये कर बचतीचा (आयकर कायद्याच्या कलम ८० अंतर्गत), इक्विटीमधून संपत्ती निर्मितीचा आणि इतर कर-बचत साधनांच्या तुलनेत सर्वात कमी लॉक-इन कालावधीचा तिपटीचा फायदा आहे, गुंतवणूकदारांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांना गाठण्यास मदत करू शकतो.

बजाज फिनसर्व्ह एएमसीचे मुख्य गुंतवणूक अधिकारी निमेश चंदन म्हणाले, या फंडामध्ये दीर्घकालीन दृष्टिकोनातून समभाग निवडीची प्रक्रिया अवलंबली जाते, ज्यामध्ये सखोल मूलभूत विश्लेषणाद्वारे दर्जेदार व्यवसायांची ओळख करून गुंतवणूक केली जाते. हा फंड मजबूत आणि वाढक्षम व्यावसायिक मॉडेल असलेल्या, चांगल्या व्यवस्थापनाच्या आणि वाजवी मूल्यांकनावर उपलब्ध असलेल्या कंपन्यांची निवड करण्यावर लक्ष केंद्रित करतो. हा फंड आमच्या इनहाउस INQUBE गुंतवणूक तत्त्वज्ञानावर आधारित आहे, ज्यामध्ये उत्कृष्ट माहिती संकलन, वर्तनात्मक अंतर्दृष्टी आणि परिमाणात्मक विश्लेषणाचा वापर करून एक मजबूत आणि संतुलित पोर्टफोलिओ तयार केला जातो.

बजाज फिनसर्व ELSS टॅक्स सेव्हर फंड नियमित आणि थेट योजनांअंतर्गत वाढ आणि IDCW पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. या योजनेत गुंतवणूक एकरकमी किंवा SIP च्या माध्यमातून करता येते, ज्यासाठी किमान छ५०० चे योगदान आवश्यक आहे. फंडातील इक्विटी भागाचे व्यवस्थापन निमेश चंदन आणि सोरभ गुप्ता करतील, तर कर्ज भागाचे व्यवस्थापन सिद्धार्थ चौधरी यांच्याकडे असेल.

# महाकुंभमध्ये ४५ कोटी लोकांना सेवा देण्यासाठी बस आणि ट्रेन्सची सेवा सज्ज: रेडबस

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर :** रेडबस या जगातील सर्वात मोठ्या बस तिकिटिंग व्यासपीठाने जगातील सर्वात मोठ्या धार्मिक आणि सर्वाधिक अभ्यागत असणाऱ्या महाकुंभसाठीची तयारी सुरू केली आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या काळात महाकुंभमेळा होणार आहे. नेहमीच्या काळाच्या तुलनेत या दिवसांमध्ये खासगी आणि सरकारी बस सेवांमध्ये उत्तर प्रदेश आणि प्रयागराजच्या दिशेने दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सीट्समध्ये जवळपास १८० टक्के वाढ होईल, असा रेडबसचा अंदाज आहे. ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रेडबस राज्य रस्ते वाहतूक महामंडळ (आरटीसी) आणि खासगी कंपन्यांच्या सहकार्याने दररोज साधारण ७०० (६७३) सेवा देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

रेडबस उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमधील आरटीसी तसेच खाजगी कंपन्यांसोबत ही सेवा देईल आणि करोडो लोकांना सहजगत्या बुकिंग करणे आणि प्रवासाचा अधिक चांगला अनुभव मिळावा यासाठी काम करेल. सरासरी पाहता, या व्यासपीठावर दररोज ३०,००० सीट्स उपलब्ध असतील, असा रेडबसचा अंदाज आहे. त्याचप्रमाणे महाकुंभमध्ये महिलांचा समावेश अधिक म्हणजेच साधारण ३३ टक्के असेल असाही रेडबसचा अंदाज आहे. महिलांसाठी हा प्रवास अधिक आरामदायी आणि सहजसुंदर व्हावा यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

रेडरेल या रेडबसच्या रेल तिकिटिंग व्यासपीठासोबत ही ऑनलाइन तिकिटिंग कंपनी जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात भारतभरातून ४५ कोटी प्रवाशांना सेवा देण्यास सज्ज आहे. बस आणि रेल्वेतून सर्वाधिक प्रवासी उत्तर प्रदेशच्या विविध भागांसोबतच दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, बिहार आणि झारखंडमधून येतील.

आपल्या व्यासपीठाच्या माध्यमातून सोयीस्कर आणि विश्वासार्ह बुकिंग पर्याय देऊ करत तीर्थक्षेत्रांसाठी ट्रेनचा प्रवास उपलब्ध करून देण्यात रेडरेल फार महत्त्वाची भूमिका बजावत आहे. महाकुंभमेळ्याच्या काळात रेल्वे प्रवासाचीही मागणी वाढणार हे गृहित धरून रेडरेल या आयआरसीटीसीच्या अधिकृत भागीदार कंपनीच्या माध्यमतून भारतीय रेल्वेतर्फे सुरू करण्यात आलेल्या सर्व खास गाड्यांचे बुकिंग करता येईल. शिवाय, या खास गाड्यांची रिअल टाईम माहितीही रेडरेलवर उपलब्ध असल्याने प्रवाशांना अधिक चांगल्या प्रकारे प्रवास करता येईल. त्याचप्रमाणे, प्रतिक्षायादीतील सीट्ससाठी रेडरेलतर्फे कनेक्टिंग ट्रेन (थेट ट्रेन उपलब्ध नसल्यास), सीट गॅरंटी (प्रतिक्षायादीतील सीट कन्फर्म न झाल्यास तिप्पट परतावा) आणि कन्फर्म (नजीकच्या स्टेशनसाठी उपलब्ध सीट्स दाखवणे) अशा सुविधा देऊ करत आहे. त्यामुळे, प्रवाशांना काही दिवसांनंतरही बुकिंग करता येईल. रेडरेलतर्फे KUMBHRAIL या कोडसह तिकिटांवर सवलतही दिली जात आहे.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्सकडून बी अ सांता उपक्रमातून गरजूंसाठी ख्रिसमसचा आनंद

**नागपूर २४ डिसेंबर :** ख्रिसमसच्या पर्वावर सामाजिक जबाबदारीच्या भावनेला मूर्त रूप देत गरजुंच्या जीवनात आनंदाचे चार क्षण निर्माण करण्यासाठी वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या वतीने बी अ सांता उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून समाजातील विविध समुदायांशी संपर्क साधून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यात आला. विशेषतः जे लोक पारंपरिक सण कुटुंबासोबत साजरा करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी हा दिवस खास बनविण्यात आला.

या उपक्रमाचा भाग म्हणून वोक्हार्ट हॉस्पिटलच्या टीमने शांती भवन येथील वृद्धाश्रमाला भेट देत त्यांना ख्रिसमसच्या पर्वावर नवीन कपडे, भेटवस्तू आणि स्नॅक्स वितरित केले. हा कार्यक्रम आनंद आणि उत्साहाने भरलेला होता, ज्यामध्ये खेळ, केक कापणे आणि प्रार्थना यांचा समावेश होता, ज्यामुळे एकता आणि आनंदाचा दिवस सुनिश्चित झाला.

या निमित्त वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती जाहबिया खोराकीवाला म्हणाल्या, वोक्हार्ट हॉस्पिटल्सची सहानुभूती आणि दयाळूपणावर श्रद्धा आहे. विशेषतः सणाच्या हंगामात. बी अ सांता सारखे उपक्रम आम्हाला ख्रिसमसचा आनंद द्विगुणीत करण्याची संधी देतो. काळाच्या गरजेनुसार देणगीची भावना यातून दिसून येते. सामाजिक उत्तरदायित्वासाठी वोक्हार्ट हॉस्पिटल्सची बांधिलकी कायम आहे आणि बी अ सांता सारखे उपक्रम संस्था आणि ती सेवा देत असलेल्या समुदायांमधील बंध आणखी मजबूत करण्यास मदत करतात. ज्यामुळे वंचितांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडतो.

या वेळी आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाने समुदायाची भावना निर्माण केली. प्रेम आणि आशीर्वादाचे क्षण देखील यातून प्रतिबिंब झाले हे या कार्यक्रमाचे अनोखे वैशिष्ट्य ठरले.

वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूरचे केंद्र प्रमुख श्री रवी बगाली म्हणाले, या उपक्रमातून आम्ही समाजातल्या गरजूंविषयी असलेली दातृत्वाची भावना जपली याचा आम्हाला अभिमान आहे. ख्रिसमस हा प्रेम आणि आनंद पसरवण्याचा क्षण आहे. त्यामुळे गरजूंपर्यंत पोहोचून, त्यांचा दिवस आनंदी बनवण्याची संधी आम्हाला मिळाली.

सामाजिक जबाबदारीबद्दलची वोक्हार्ट हॉस्पिटल्सची वचनबद्धता दृढ आहे, आणि 'बी अ सांता सारख्या उपक्रमांमुळे संस्था आणि ती ज्या समुदायांना सेवा पुरवते त्यांच्यातील नाते मजबूत होतात, ज्यामुळे गरीब आणि वंचित लोकांच्या जीवनात सकारात्मक प्रभाव पडतो.

# कलाकार यंदा ख्रिसमसला बनणार सांता!

**मुंबई, २३ डिसेंबर :** ख्रिसमस सण जवळ आला असताना सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले आहे आणि सिक्रेट सांताबाबतच्या उत्सुकतेने सुट्टीतील आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर केली आहे. एण्ड टीव्हीवरील कलाकार आयुध भानुशाली (मालिका 'अटल'मधील यंग अटल), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि विदिशा श्रीवास्तव (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी) बालपणीच्या सांताबाबतच्या गोड आठवणींना आणि त्यांच्या इच्छांना उजाळा देत आहेत, ज्या त्यांचा सिक्रेट सांता पूर्ण करेल अशी त्यांना आशा होती. मालिका 'अटल'मध्ये शीर्षक भूमिका साकारणारा आयुध भानुशाली म्हणाला, ''मला नेहमी सांताक्लॉजची ओढ असायची आणि ख्रिसमसला त्याच्याकडून सायकल मिळेल असे स्वप्न मी पाहायचो. मी पत्र लिहायचो आणि माझ्या बेडखाली पत्रामध्ये व्यक्त केलेल्या वस्तू सापडण्याची आशा करायचो. माझ्या आईवडिलांनी सायकल देत मला सरप्राइज केले आणि माझे स्वप्न पूर्ण झाले. तो क्षण आजही माझ्या लक्षात आहे. यंदा, माझी इतरांना तो आनंद देण्याची इच्छा आहे. नुकतेच, मी स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयीजी यांचे मूळगाव ग्वाल्हेरला गेलो होतो, योगायोगाने ख्रिसमसलाच त्यांचा जन्म झाला होता. ही भेट प्रेरणादायी ठरली. मला अटलजींचे उल्लेखनीय जीवन व योगदानांबाबत समजले आणि सार्वजनिक ग्रंथालय व त्यांच्या बालपणीच्या घराला दिलेली भेट माझ्यासाठी अत्यंत भावूक ठरली. शिक्षणाप्रती त्यांच्या कटिबद्धतेने मला भविष्यात त्यांच्यासारखीच कामगिरी करण्यास प्रेरित केले आहे. त्यांच्या वारसाला सन्मानित करण्यासाठी आणि उत्सवी उत्साहाचा प्रसार करण्यासाठी मी विशेष पद्धतीने सण साजरा करण्याचे ठरवले आहे. मी सेटवर सांताक्लॉजप्रमाणे पेहराव करणार आहे आणि प्रत्येकाच्या रूम्समध्ये सरप्राइज गिफ्ट्स ठेवणार आहे. काहीजणांना त्याबाबत अंदाज असला तरी मी ते सिक्रेट ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. या सिक्रेट सांता मिशनच्या माध्यमातून माझा आनंद पसरवण्याचा उद्देश आहे, जसे माझ्या आईवडिलांनी माझ्यासाठी केले होते. यंदा ख्रिसमसला इतरांसाठी दान करा, तसेच त्यांची काळजी घ्या.''


मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''बालपणी मला वाटायचे की ख्रिसमस ट्री वर किंवा सॉक्समध्ये इच्छा ठेवल्या की त्या पूर्ण होतात. आमच्याकडे ख्रिसमस ट्री नसायचा, ज्यामुळे मी घरातील प्लांट्समध्ये माझ्या इच्छा ठेवायची. माझ्या इच्छा पूर्ण झाल्या नाही तर मला वाटायचे की आमच्याकडे खरा ख्रिसमस ट्री नाही म्हणून तसे झाले असावे (हसतात). आम्ही किती निरागस होतो ना! पण त्या आठवणी आजही मला आनंदित करतात. मोठे झाले तसे मला समजले की सांताक्लाज कोणीतरी व्यक्ती आहे, जो तुमच्या गरजा समजून घेतो आणि विचारण्यापूर्वीच त्या पूर्ण करतो. माझ्यासाठी माझी आई सांता राहिली आहे. ती सदैव माझी सांता आहे, जिने माझ्या सर्व इच्छा पूर्ण केल्या आहेत. आता, माझी परतफेड करण्याची वेळ आहे. माझ्या भाच्यांसह मी माझ्या आईसाठी गिफ्ट्स खरेदी केले आहेत. त्यांना सरप्राइज वाटणार नाही, पण यंदा ख्रिसमसला आईच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला आनंद होईल.

**MUNICIPAL COUNCIL GADCHIROLI**
**E- ENDER NOTICE**
**COMPUTER DEPT**

Municipal Council Gadchiroli invited the bids form eligible bidders for supply of school learning material. All the terms and conditions regarding bid will be available on Goverment eMarket place Portal.

**Chief Officer**
**Municipal Council**
**Gadchiroli**

# शब्दकोडे क्रमांक १९९९




**आडवे शब्द :-**
१) मर्कट
३) व्यायाम
६) नावात केलेला बदल
११) मागणी, विनंती
१२) तालु क्याचे वसुलीचे काम
१४) विधानसभा, लोकसभा येथील लोकप्रतिनिधी
१८) रात्र
१९) वडाचे झाड
२०) पगार
२१) छोटी विश्रांती
२३) शपथ
२४) पटल
२६) घरोघर
२८) वर-वधुची मिरवणूक
३०) सूर्य
३२) उंट हाकणारा
३४) दीपोत्सव
३६) सौंदर्य
३८) गढूळ (प्रा. म.)
४०) पायाच्या तळव्याचा एक भाग
४१) नवरा मुलगा
४३) एक प्रकारचे लोकरीचे कापड
४५) वर्ण
४७) प्रेत
४९) किराणा व्यापारी
५०) खरडून काढलेला भाग
५१) आप्तजन
५३) वाळा
५४) मोठा हातोडा
५५) चरबी
५७) चमक, मुरगळा
६०) चक्कर, मूर्च्छा, भोवळ
६१) आल्याच्या रसाची वडी
६३) पाप
६४) परतफेड
६६) भला, छान
६७) सैन्याला मालपुरवठा
६९) सुसर
७०) गोव्याची राजधानी
७२) सत्ता, अधिकार, कैफ
७३) पवित्र
७४) कारस्थान
७६) जन्मदाता
७८) पुष्पगुच्छ
७९) कळलाव्या मुनी
८०) कर्णेंद्रिय
८१) धातूची तार काढणारा
८२) शंभर
८३) रक्षण करणारा

**उभे शब्द :-**
२) लेखणी
४) प्राणी आणि विदुषक यांचा खेळ
५) सिद्ध
६) विविध
७) लोकनाट्य
८) दारूचा एक प्रकार
९) कडक व चिवट
१०) हिंदुस्थान
१३) त्वरित
१४) संगीतातील तान
१५) वैरी, खटला दाखल करणारा
१६) घराणे, कुल
१७) वडिलांचे आई-वडील (हिं )
१८) आश्रय, थारा
२२) छाया
२५) होळीच्या सणातील हडळीचे सोंग
२७) धपाटा, चापट
२९) मोठा डेरेदार वृक्ष
३१) आर्जव, विनंती
३३) चावट
३५) धाक, जरब
३७) पंख
३८) अफूचे बी
३९) अव्याहत, सतत
४१) देवाशी केलेला करार
४२) देवघेव
४४) लाडात वाढलेला
४६) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
४८) लेख लिहिणारा
५२) चुकीचे(हिं )
५६) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५८) छोटी लढाई
५९) चानी
६१) झुकझुकगाडी
६२) मनोरंजन
६३) पाय, चरण
६४) घागरा
६५) संतापी
६८) मनाला टोचणारे दुःख
७१) आयुष्य
७३) पळस
७५) पालव
७६) बारा महिन्याचा काळ
७७) वेल
७९) श्वसनेंद्रिय
८०) कावळा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

## पोलिस कारवाईत १० हजारांचा मुद्देमाल जप्त



■ महासागर प्रतिनिधी,
वाशीम, दि.२४ : शहरातील बागवानपुरा परिसरात नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर पोलिसांनी २२ डिसेंबर रोजी धाड टाकून या प्रकरणी तिघांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई १० हजार ८० रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सक्तीचे आदेश देऊन नायलॉन मांजा बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, कुणीही नायलॉन मांजाची विक्री केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात आला. असे असताना वाशीम शहरात आगामी मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजा विक्रीचा प्रकार सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने तीन दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे.

या दरम्यान अब्दुल्ला पतंग सेंटर येथून मो. अब्दुल्ला मो. हाफिज (वय २३) याच्या ताब्यातून ६ नायलॉन मांजा रील (किंमत २ हजार ५२०), लकी पतंग सेंटर येथून शे. नजीर शे. गफ्फूर (वय ४२) याच्याकडून १० नायलॉन मांजा रील (किंमत ४ हजार २००) आणि न्यू लकी पतंग सेंटर येथून शे. अजीज शे. गफ्फूर (वय ४९) याच्याकडून ८ नायलॉन मांजा रील (किंमत ३ हजार ३६०) जप्त करण्यात आल्या. जिल्ह्यात अवैध मांजाची विक्री सुरू असून, ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात कारवाईची मागणी होत आहे.

# साईनगरीत मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी आजपासून परिषद

## अमरावती जिल्ह्यातून ९० मंदिरांचे विश्वस्त करणार प्रतिनिधित्व



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४: साईनगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिर्डी येथे मंगळवार, २४ डिसेंबरपासून मंदिर संस्कृती रक्षणार्थ दोन दिवसीय परिषद होत आहे. या परिषदेसाठी अमरावती जिल्ह्यातून तब्बल ९० प्रतिनिधी रवाना झाले आहेत. रविवारी सकाळी हे प्रतिनिधी साईनगरीकडे रवाना झाले. तत्पूर्वी त्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनांची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

आपल्या राजे-महाराजांनी मंदिरांची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरांचे संरक्षण केले. तसेच मंदिरांचा जीर्णोद्धार केला. आज मात्र भारताने 'सेक्युलर'वादी राज्यव्यवस्था स्वीकारल्यामुळे केवळ मंदिरांचे सरकारीकरण आणि त्या मंदिरांचा भ्रष्टाचार, पैसे घेऊन 'व्हीआयपी' दर्शन, मंदिरांची भूमी बळकावणे, 'वक्फ बोर्ड'चे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण चालू आहे, असा मंदिर न्यासच्या पदाधिकाऱ्यांचा आरोप आहे. वाघा माता संस्थान परतवाडा, अंबादेवी, एकवीरा देवी संस्थान अमरावती, कार्तिक स्वामी व लक्ष्मीनारायण संस्थान अचलपूर, पिंगळादेवी संस्थान नेरपिंगळाई, महारुद्र हनुमान मंदिर जहागीरपूर, नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री, राष्ट्र संत तुकडोजी महाराज गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी, संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेड, संत गुलाब बाबा संस्थान टाकरखेडा मोरे, जयपुरी महाराज संस्थान निमखेड बाजार, श्रीराम मंदिर संस्थान रिद्धपूर, मारुती महाराज संस्थान मोर्शी, मारुती महाराज संस्थान हिवरखेड, नवजवान दुर्गा देवी मंदिर अमरावती, आशा मनीषा देवस्थान दर्यापूर, मारुती संस्थान हातुर्णा, श्रीकृष्ण मंदिर चांदूर रेल्वे यासारख्या ९० हून अधिक मंदिरांचे विश्वस्त या परिषदेत आपापल्या संस्थांचे प्रतिनिधित्व करणार असल्याची माहिती हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक नीलेश टवलारे यांनी दिली.

# चिखली शहरातील जांबुवंती नदीला आले गटारगंगेचे स्वरुप

## शहराच्या नाल्यांतील कचरा, घाण वाहून येते नदीपात्रात



■ महासागर प्रतिनिधी,
चिखली,दि. २४ : एकेकाळी चिखलीचे वैभव म्हटल्या जाणाऱ्या जांबुवंती नदीला आता विस्तारलेले शहर आणि वाढत्या लोकसंख्येमुळे गटारीचे स्वरूप आले आहे. नदीच्या परिसरात दुर्गंधी सुटल्याने सकाळी नदीच्या पुलावरून फिरायला जाणाऱ्या शहरवासीयांना नाक दाबून जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने नदीची स्वच्छता करण्याची मागणी केली जात आहे.

जुन्या चिखली परिसरापासून जांबुवंती नदी शहराजवळून वाहत आहे. या नदीच्या काठावर अनेकांनी घरे बांधली आहेत. शिवाय बैलजोडी परिसरातील एक ओढा आणि इतरही नाले या नदीस येऊन मिळतात. या नाल्यांमधून शहरातील घाण व कचरा वाहत या नदीत येतो. तसेच नगरपालिकेची घंटागाडी आली नाही तर नागरिक या नाल्यांमध्ये कचरा नेऊन टाकतात. त्यामुळे जांबुवंती नदीला गटारीचे स्वरूप आले आहे. नदीपात्रात प्लास्टिक बॅग, प्लास्टिकचे चहाचे कप, लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या पत्रावळ्या, द्रोण, जनावरांचे मृतदेह आणून टाकले जातात. त्यामुळे स्वच्छ पाण्याने वाहणारी ही नदी आजघडीला गटारगंगा झाली आहे.

केंद्र सरकारने सनब २०१५ मध्ये हरहर गंगे मिशनअंतर्गत गंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्याच स्वरूपात नगरपालिकेने जांबुवंती नदीच्या साफ-सफाईसाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जांबुवंती नदीचे पाणी वाहत पेनटाकळी धरणात जाते. या धरणावरून शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. शहरातील घाण, कचरा, मलमूत्र या नदीपात्रातून वाहत धरणात जात आहे. पेनटाकळी धरण मोठे असून, त्यामध्ये पाणीसाठाही जास्त आहे. मात्र, त्या पाण्यात या नदीतील घाण मिसळली जात असल्याचे वास्तव आहे. तेच पाणी नागरिकांना प्यावे लागत आहे. परिणामी, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याबाबतचा धोका निर्माण झाला आहे. तो टाळण्यासाठी नदीपात्रातील घाणीची शहराजवळच योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्यात यावी, तसेच नगरपालिकेने नदीच्या स्वच्छतेसाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे. भजांबुवंती नदीत कचरा टाकला जात असल्याने एकप्रकारे गटाराचे स्वरुप आले आहे. त्यामुळे नगरपालिकेने नदीची साफ- सफाई करावी, अशी अपेक्षा आहे. नागरिकांनीही नदीत कचरा टाकणे टाळले पाहिजे.

**-नितीन राजपूत, नागरिक, चिखली.**

**पालिकेने साफ-सफाईकरावी**

नगर पालिकेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबवणार भनगर पालिकेच्या वतीने दरवर्षी शहरातील नाल्यांसह जांबुवंती नदीची स्वच्छता मोहीम हाती घेतली जाते. आता त्वरित ही स्वच्छता मोहीम राबवून नदीची साफ्फ-सफाईकरण्यात येईल. नागरिकांनी या नदीत कचरा आणून टाकू नये. तसे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**-प्रशांत बिडगर, मुख्याधिकारी, नगरपालिका, चिखली.**



# रोडगे, गूळ भाकर, आलू-वांग्याचीभाजी बहिरमच्या प्रसिद्ध यात्रेची परंपरा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४: संपूर्ण राज्यात दीर्घकाळ चालणारी यात्रा म्हणून ओळख असलेल्या बहिरमच्या यात्रेला आजपासून उत्साहात प्रारंभ झाला. शेकडो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र बहिरम येथे विधिवत पूजा करण्यात आली. सर्वप्रथम बहिरमबुवाच्या मूर्तीला शेंदूर, दूध-दहीमध व लोण्याचा अभिषेक करण्यात आला. पूजेनंतर मंदिरासमोरील यज्ञात पूर्णाहुती देण्यात आली. होमहवन व आरती करून रोडग्याचा नैवेद्य बहिरमबुवाला दाखवण्यात आला. त्यानंतर शंखनाद करून यात्रेचे नारळ फुटले.

बहिरमबाबांच्या दर्शनाला दरवर्षी हजारो भाविक येतात. विदर्भातच नव्हे तर संपूर्ण राज्यात ही यात्रा प्रसिद्ध असल्याने भक्तमंडळी सलग दीड महिना देवदर्शन व यात्रेचा लाभ घेते. बहिरम बुवाच्या महापूजेला सुरुवात झाली. शिव मंदिर, हनुमान मंदिर, महागणपती मंदिर याठिकाणी अभिषेक करण्यात आला.

ही यात्रा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत चालते. गूळ, रेवडी, लाह्या, फुटाणे व नारळ हा बहिरमबुवाचा आवडीचा प्रसाद. त्यासह लोणी व शेंदूर हा विशेष मान असतो. भाविक त्याची श्रद्धा अर्पण करताना आलू-वांग्याची भाजी व रोड्याचा नैवेद्य चढवतात. गवळी बांधवांसह आदिवासींचेसुद्धा बहिरम हे श्रद्धास्थान आहे. आदिवासी बांधव बहिरमबुवाला गुळ-भाकरचौवेद्य चढवतात. बोकड अर्पण करून त्याचा बळी देण्याची प्रथा होती. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केलेल्या प्रबोधनानंतर लोकांचे मनपरिवर्तन झाले. प्राण्यांचा बळी देण्याची प्रथा बंद झाली.

**बहिरमच्या यात्रेचा इतिहास**

अमरावती जिल्ह्यातील कौडिंण्यपूरचा संदर्भ बहिरमशी जोडला जातो. भगवान श्रीकृष्ण व कौडिंण्यपूर राजा रुख्मी यांच्या दरम्यान युद्ध झाले होते. तेव्हा बलराम यांच्या सैन्यात गवळ्यांचा समावेश होता. ते सैनिक म्हणजेच गवळी वऱ्हाडात थांबले. ते गवळी बांधव बहिरम डोंगराच्या पायथ्याशी हेटी करून राहू लागले. त्या हेटीचे गवळ्यांच्या गावात रूपांतर झाले. त्या तीर्थस्थळावर बहिरमबुवाची म्हणजेच भैरवाची मूर्ती बघण्यास मिळते. फार पूर्वी भैरवनाथाच्या मूर्तीसमोर सुपारी ठेवली जाई. गवळ्यांचे वास्तव्य असल्याने दुधदुभते भरपूर. ते गवळी लोक त्यांच्या दैवताला प्रसन्न करण्यासाठी त्यांच्या घरचे लोणी आणि त्यासोबत शेंदूर सुपारीला लावत.

# वाहनाच्या धडकेत पुन्हा एका बिबट्याचा बळी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४: राष्ट्रीय महामार्गाच्या रहाटगाव ते बडनेरा या नवीन बायपास मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घट्ना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. वाहनाच्या धडकेत बिबट्याचा बळी जाण्याची ही गेल्या पंधरा दिवसांतील ही दुसरी घट्ना आहे.

शहराला लागून जाणाऱ्या रहाटगाव-बडनेरसव्या बायपासवर वडाळी ते महादेव खोरी दरम्यान गुणवंत बाबा मंदिरानजीक रस्त्याच्या कडेला बिबट्याचा मृतदेह शुक्रवारी सकाळी नागरिकांना आढळून आला. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच वनविभागाचे पथक घट्नास्थळी पोहचले. या बिबट्याचे वय अंदाजे २ वर्षे असल्याचे सांगण्यात आले. या घट्नेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घट्नास्थळी गर्दी केली होती. नवीन बायपास मार्गाच्या लगत वडाळीचे जंगल आहे.

या परिसरात बिबट्याचे वास्तव्य आहे. यापुर्वी या भागात बिबट्यांची पिल्ले आढळून आली होती. रात्री अज्ञात वाहनाच्या धडकेत या बिबट्याचा मृत्यू झाला असावा, अशी माहिती मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी दिली.

गेल्या ७ डिसेंबर रोजी पोहरा मालखेड राखीव जंगलाच्या चांदूर रेल्वे वनपरीक्षेत्रा अंतर्गत चिरोडी गावाजवळ रस्ते अपघातात बिबट्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे जंगलालगतच्या रस्त्यावरील वन्यप्राण्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

राष्ट्रीय महामार्गावर यापुर्वीही वाहनांच्या धडकेने वन्य प्राण्यांचे बळी गेले आहेत. वडाळी, पोहरा जंगलांमध्ये बिबट्याचे प्रमाण वाढले आहे. बिबट सोबतच रानगवे, चितळ, हरीण, ससे या प्राण्यांसह मोरांचे वास्तव्य या जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. या जंगलातील बिबट्र राज्य राखीव पोलीस दल वसाहतीसह संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात अनेकदा आढळून आले आहेत. अमरावती-चांदूर रेल्वे मार्गावरही अनेकांना बिबट दिसून आले आहेत. बिबट्यांचे अस्तित्व जाणवणाऱ्या अनेक घटना गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. रस्त्यावर वन्यप्राण्यांच्या होणाऱ्या अपघातांना रोखण्यासाठी काही उपाययोजना करण्यात येऊ शकतात. उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बोगदे किंवा इतर मानवनिर्मित संरचनांच्या माध्यमातून प्राण्यांना रस्त्यांवरून न जाऊन मार्ग दाखवता येतो. यामुळे प्राणी-वाहनअपघात टाळता येतात आणि प्रजातींना त्यांच्या निवासस्थानातून सुरक्षित मार्ग मिळतो. वन्यजीव अपघात रोखण्यासाठी गती निरीक्षण प्रणालींचा वापर केला जातो. महामार्गांवर वन्यजीवांसाठी स्वतंत्र मार्ग असणे गरजेचे आहे. वन्यप्राण्यांसाठी अनुकूल उपशमन रचनांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्यासाठी त्यांच्या वापरावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

# गृहमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी शहर काँग्रेस धडकली जिल्हा कचेरीवर

## राष्ट्रपतींसह पंतप्रधानांना पाठवले निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४: अमरावती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. गुरुवारी त्याच आरोपाचा पुनरुच्चार करत शहर जिल्हा काँग्रेसने गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या मागणीसाठी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत थेट राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निवेदनही पाठवण्यात आले. अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिट्रीचे अध्यक्ष बबलू शेखावत, प्रदेश प्रवक्ते माजी महापौर मिलिंद चिमोट्रे, प्रदेश उपाध्यक्ष भैया पवार, प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर, माजी महापौर विलास इंगोले यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. एक दिवस आधी जिल्हा ग्रामीण काँग्रेसनेही याच मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणा दरम्यान संविधान निर्माते, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांच्या या कृतीचा जाहीर निषेध देशभरातील काँग्रेसजनांनी केला आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे समस्त जनमानस ढवळून निघाले असून त्यांनी अद्यापही त्या वक्तव्याबाबत माफ्फी मागितली नाही. हा भारतीयांचा अपमान आहे. भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्याचा अपमान केल्यामुळे गृहमंत्री शाह यांच्या राजीनाम्याची आणि माफीची मागणी आम्ही करत आहोत, असे या निवेदनात म्हटले आहे. प्रशासनाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी हे निवेदन स्वीकारले. दरम्यान, शह यांची कृती योग्य नसल्याने पंतप्रधानांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळातून तातडीने बरखास्त करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे. आंदोलनात माजी महापौर अशोक डोंगरे, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, मुन्ना राठोड, विनोद मोदी, सलीम मिरावाले, शोभा शिंदे, सलीम बेग, प्रा. बी. टी. अंभोरे, रवींद्र शिंदे, विजय खंडारे, अपर्णा मकेश्वर, विजय वानखडे, प्रा. अनिल देशमुख, मैथिली पाटील, शिरीन खान यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. 'अमित शाह माफी मांगो'चे संसदेतही गुंजले स्वर या मागणीकरिता काँग्रेसचे सर्व खासदार आणि इतर विरोधी सदस्यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची छायाचित्रे घेऊन संसदेत 'जय भीम' आणि 'अमित शाह माफी मांगो' अशा घोषणा दिल्या.

# महावितरणच्या अभय योजनेत ६५,४४५ ग्राहकांकडून ८६ कोटी रुपयांची वसुली

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४: अमरावती थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या अभय योजनेमुळे राज्यभरात ६५ हजार ४४५ ग्राहकांकडून ८६ कोटी रुपये महावितरणच्या तिजोरीत जमा झाले आहेत. गेल्या काही वर्षांतील वसुलीच्या तुलनेत ही रक्कम अधिक असल्याचे महावितरणचे म्हणणे आहे. या योजनेमुळे सदर ग्राहकांना ४४ कोट्री ३५ लाख रुपयांचे व्याज व विलंब आकाराची माफ्फी मिळाली आहे. या योजनेंतर्गत वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ्फ केला जात आहे. त्यामुळे ग्राहकांचाही चांगला प्रतिसाद मिळत असून त्यांच्या मागणीनुसारच ही मुदतवाढ देण्यात आल्याचे महावितरणचे म्हणणे आहे. १ सप्टेंबरपासून ही योजना लागू करण्यात आली आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या थकीत बिलामुळे काही ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडित करण्यात आला होता. दरम्यान या योजनेस एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आल्याने या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. नव्या वेळापत्रकानुसार वर्षअखेरपर्यंत या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

नागपूर परिमंडळातील ७,५९२ वीज ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून, हे परिमंडळ पहिल्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर परिमंडळ (६१०१ ग्राहक) आणि पुणे परिमंडळ (५८९३ ग्राहक) दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहे. विभागांमध्ये नागपूर विभाग २०,४०० लाभार्थी ग्राहकांसह पहिल्या क्रमांकावर आहे. त्या नंतर कोकण विभाग (१७,७९८), पुणे विभाग (१७,४४८) व छत्रपती संभाजीनगर (९८१८) यांचा क्रम लागतो. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेचा मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रेंचायजी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे. या आहेत अतिरिक्त सवलती अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० ट्रक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरायची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा ट्रक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच ट्रक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रेंचायजी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे. असा घ्या योजनेचा लाभ संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/ws s/wss या वेबसाईटवरून ऑनलाइन अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल ऍपवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या ट्रोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी विविध १६ प्रयोगांची निवड

**तालुका प्रदर्शनात ११३ प्रयोगांचा सहभाग**



■ महासागर प्रतिनिधी,
कारंजा (लाड), दि. २४: प्रादेशिक विद्या प्राधिकरण, रवीनगर नागपूर, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद वाशीम, विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १७ डिसेंबर रोजी कारंजा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन झील इंटरनॅशनल स्कूल, कारंजा येथे करण्यात आले होते. १७ डिसेंबर रोजी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी १६ प्रयोगांची निवड जिल्हास्तरीय प्रदर्शनी करिता निवड करण्यात आली. प्रदर्शनाच्या समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष शार्दूल सुनील मेश्राम तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थापक अध्यक्ष सुनील मेश्राम, डॉक्टर पंजाबराव मोरे, डॉ. अरुण व्ही देशमुख, डॉ. आर. सी मुकवाने, डॉ. राजा गोरे, विदर्भ विज्ञान अध्यापक मंडळाचे सचिव विजय भड आदि मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनामध्ये प्राथमिक गटात ६७, माध्यमिक गटात ३७, शिक्षक गटांत ९ अशा एकूण ११३ प्रतिकृतीची मांडणी करण्यात आली होती. समारोपीय कार्यक्रमात डॉ. आर. सी. मुकवाने, डॉ. पंजाबराव मोरे, डॉ. राजा गोरे यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनानंतर बक्षीस वितरण कार्यक्रमाला सुरुवात झाली.

सदर प्रदर्शनात प्राथमिक विद्यार्थी गटात जे. डी चवरे विद्या मंदिरच्या ओजस विवेक गहाणकरी याने सादर केलेल्या फ्फार्मर हेल्पिंग स्टिक या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक, आर. जे. चवरे प्राथमिक शाळेचा पार्थ अमित बगडे याने सादर केलेल्या बनाना फायबर ऍक्शन या प्रतिकृतीला द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक विद्यारंभ स्कूलची संजली राऊत हिने सादर केलेल्या डिझास्टर मॅनेजमेंट, चौथा क्रमांक एम. बी. आश्रम हायस्कूलचा अर्हम संदीप तांगडे याने स्मार्ट सिटीचा प्रयोग सादर केला.

दिव्यांग गट्रातून शार्दूल उके याच्या प्रयोगाची निवड शैक्षणिक साहित्य निर्मिती गट्रांमध्ये प्राथमिक शिक्षकांमधून प्रथम क्रमांक जि. प. शाळा जयपुरचे शिक्षक राहुल दादाराव गुळदे यांच्या आनंददायी गणित शिक्षण या शैक्षणिक साहित्याला प्राप्त झाला, माध्यमिक शिक्षकांमधून विद्याभारती ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षिका विभा वैभव लाहोटी यांच्या मल्टिपल रिफ्लेक्शन अँड डीप वेल या शैक्षणिक साहित्याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. प्रयोगशाळा परिचर गटांमधून मुलजी जेठा उर्दू स्कूल कारंज्याचे प्रयोग शाळा परिचर सय्यद इज्जतुल्ला अताऊल्ला यांनी तयार केलेल्या प्रयोगातून शिका विज्ञान या साधनाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

तसेच दिव्यांग विद्यार्थी गटातून शार्दूल रवी उके याने तयार केलेल्या प्रयोगाची निवड जिल्हास्तरासाठी झालेली आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




## लाभ पाण्याचे

लाईफस्टाईल

भरपूर पाणी पिण्याचा सल्ला कायमच दिला जातो. काही तज्ज्ञ पाण्याच्या बाबतीत आठ गुणिले आठचा नियम पाळण्याचा सल्ला देतात. म्हणजेच दिवसभरात आठ अंस(२४० मिलीलीटर) पाण्याचे आठ ग्लास प्यायला हवेत. म्हणजेच दिवसभरात साधारण दोन लीटर पाणी शरीरात जातं. महत्त्वाचं म्हणजे शरीराचे संकेत ओळखा. तहान लागली की लगेच पाणी प्या. पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्याने आरोग्य सुधारतं. पाणी पिण्याचे अनेक लाभ आहेत. त्याविषयी...

पाणी प्यायल्यामुळे पोटफुगीची समस्या दूर होऊ शकते. शरीरात पाणी साठून रहाणं हे पोटफुगीचं एक महत्त्वाचं कारण असलं तरी जास्तीच्या पाण्यामुळे शरीरातली विषद्रव्यं बाहेर पडायला मदत होते. पाण्यासोबतच शरीरातलं सोडियमही बाहेर पडतं. यामुळे आराम मिळतो.



पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्यामुळे जास्त घाम येतो. यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात रहातं. म्हणूनच उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यायला हवं. यामुळे वजन नियंत्रणात रहायला मदत होते. त्वचा, केस यांचं आरोग्यही उत्तम रहातं.

## एकटेपणामुळे स्मृतिभंश

वेगळं काही

एकटेपणा हा मंद विषासारखा आहे. हा आजार मर्यादा ओलांडतो, तेव्हा अनेक धोकादायक समस्या उद्भवू शकतात. याचा सर्वाधिक फटका मानसिक आरोग्याला बसतो. आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या अभ्यासात असे आढळून आले आहे, की एकाकीपणामुळे स्मृतिभ्रंशाचा धोका ३१ टक्के वाढतो. 'नेचर मेंटल हेल्थ'मध्ये प्रकाशित झालेल्या नवीन संशोधनात ही बाब समोर आली. संशोधकांना असे आढळून आले, की एकटेपणा वाटतो अशा लोकांना स्मृतिभ्रंश होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे मेंदूला गंभीर नुकसान होऊ शकते. एकाकीपणाचा संबंध अनेकदा उदासीनता आणि दुःखाशी असतो. बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे, की एकटे राहणारी व्यक्ती मानसिकदृष्ट्या कमकुवत बनते. हे बऱ्याच अंशी खरेही असू शकते. 'मेयो क्लिनिक'च्या एका संशोधनात असेही म्हटले आहे, की एकाकीपणाचा परिणाम केवळ मानसिक आरोग्यावरच नाही तर जैविक देखील असू शकतो. यामुळे व्यक्ती लवकर वृद्ध होऊ शकते. एकटेपणामुळे नकारात्मक विचारही निर्माण होतात. यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात. अनेक वेळा माणूस आत्महत्येचा विचारही करू लागतो.



**✻ एकटेपणाची भीती**

'नेचर मेंटल हेल्थ'मध्ये प्रकाशित केलेल्या एका अभ्यासात असे सुचवण्यात आले आहे, की दीर्घकाळ एकटं राहणाऱ्या लोकांना हृदयविकाराची समस्या असू शकते. त्यांना नैराश्याने ग्रासल्यामुळे त्यांचा अकाली मृत्यूही होऊ शकतो. या अभ्यासात एकाकीपणा आणि स्मृतिभ्रंश यांच्यातील संबंधदेखील आढळून आला. अलिकडच्या वर्षांमध्ये, असे दिसून आले आहे, की सामाजिकदृष्ट्या अलिप्त असलेल्या आणि कमी मित्र असलेल्या लोकांमध्ये स्मरणशक्ती कमी होणे किंवा स्मृतिभ्रंश होणे अधिक सामान्य आहे.

**✻ समाजापासून अलिप्त राहणे धोकादायक**

संशोधन टीमने जगभरातील ६०८,५६१ लोकांच्या डेटाचे विश्लेषण केल्यानंतर असे आढळले, की एकाकीपणामुळे स्मृतिभ्रंशाचा धोका वाढतो. या संशोधनात अमेरिका, युरोप, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील डेटा घेण्यात आला. 'न्यूरोसायकोलॉजिकल' चाचण्यांद्वारे सर्व लोकांच्या एकाकीपणाची पातळी ओळखण्याचा प्रयत्न केला गेला आणि असे आढळून आले, की असे लोक समाजापासून अलिप्त राहतात आणि त्यांना त्वरीत स्मृतिभ्रंश होऊ शकतो.

## प्रक्रिया केलेले पदार्थ खाताय?

आपण कुठे चुकतो?

प्रक्रिया केलेले पदार्थ बाजारात अगदी सहज उपलब्ध आहेत. अत्यंत चविष्ट असे हे पदार्थ आपण आवडीने खातो. मात्र रासायनिक प्रक्रियेदरम्यान अन्नघटकांमधले बरेच पोषक घटक निघून जातात. त्यामुळे अशा पदार्थांना काहीच अर्थ उरत नाही. असे पदार्थ वारंवार खात राहिल्याने बरेच धोके निर्माण होतात. प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ आरोग्यासाठी कसे घातक ठरू शकतात, याविषयी...



खारट, चरबीयुक्त आणि गोड पदार्थ खूप चविष्ट लागतात. अशा पदार्थांकडे आपण लगेच ओढले जातो. उत्पादक पदार्थांवर प्रक्रिया करून त्यांची चव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आपणही या जाळ्यात अगदी नकळत ओढले जातो. वेफर्स, बिस्किटं असे पदार्थ गरजेपेक्षा जास्त खाल्ले जातात. परिणामी, वजन वाढू लागतं. प्रक्रिया केलेल्या पदार्थांचं सततचं सेवन स्थूलपणाला आमंत्रण मिळवून देतं.

प्रक्रिया केलेल्या पदार्थांमध्ये भरपूर साखर असते. त्यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण बिघडतं. या पदार्थांच्या सेवनामुळे मधुमेहही होऊ शकतो. या पदार्थांमधली घातक रसायनं आपल्याला माहीतही नसतात. त्यांचे आरोग्यावर दूरगामी परिणाम होऊ शकतात.

## जुलाब झाले तर...

आयुर्वेद आणि विकार

पावसाळ्यात जुलाबाची समस्या निर्माण होते. दूषित पाण्याच्या सेवनामुळे उलट्यांचाही त्रास होतो. सततचे जुलाब आणि उलट्यांमुळे शरीरातलं पाणी कमी होतं. त्यामुळे रुग्णाला त्वरित आराम मिळण्यासाठी गरम पाण्यात थोडं मीठ, साखर आणि लिंबू घालून प्यायला द्यावं. हा सहज,सोपा आयुर्वेदिक उपाय आहे. काही खाल्ल्यानंतर उलट्या होत असतील तर ओठ कोरडे पडतात. ओठांचा कोरडेपणा कमी करण्यासाठीही लिंबू पाणी देता येईल. तसंच साध्या पाण्याऐवजी रुग्णाला भाताची पेज देता येईल. यासोबतच इतरही काही उपाय आहेत.



डाळिंबाच्या वाळलेल्या सालांचा वापर करून जुलाबावर आयुर्वेदिक औषध तयार केलं जातं. यासाठी डाळिंबाची वाळलेली तीन ते चार सालं घ्या. ही सालं पाण्यात घाला आणि मध्यम आचेवर उकळून घ्या. भांड्यात अर्धं पाणी राहिलं की गॅस बंद करा. जेवणानंतर तासाभराने हे पाणी प्या. हे पाणी तुम्ही दह्यात मिसळू शकता. घट्ट दही घ्या. त्यात एक चमचा डाळिंबाची सालं उकळलेलं पाणी घाला. रिकाम्या पोटी हे पाणी प्या.

जुलाबांवर विविध आयुर्वेदिक उपाय करण्यासोबतच डिहायड्रेशन टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. यासोबतच फळांचे रस, नारळाचं पाणी यांचंही सेवन करायला हवं. पण कॅफेन आणि सोड्यापासून लांब रहा.

## पर्यटनानंतरचं आजारपण

व्याधी विचार

उन्हाळ्याच्या सुट्टीत अनेकजण बाहेर फिरायला जातात. सध्या मान्सूनचा काळ आहे. या दिवसातही सहलींचं आयोजन होतं. सहलीला गेल्यावर खूप छान वाटतं. ताजेतवाने होऊन घरी जाऊ, पुन्हा कामाला लागू अशा विचारांमध्ये आपण घरी येतो. पण घरी आल्यावर अनेकजण आजारी पडतात. सर्दी, पोटदुखी, ताप, खोकला, जुलाब, डोकेदुखी अशा समस्या निर्माण होतात.

सहलीनंतरचं आजारपण ही आता सर्वसाधारण बाब बनून गेली आहे. पण हे नेमकं का घडत असावं? तज्ज्ञांच्या मते सुट्टीनंतर आपण आपल्या दैनंदिन आयुष्याला सुरूवात करण्याच्या तयारीत असलो तरी शरीराने तशी तयारी केलेली नसते. सहलीला गेल्यावर आपण नेहमीच्या वातावरणापासून लांब गेलेलो असतो. तिथे आपण वेगळ्या बॅक्टेरियांच्या, विषाणूंच्या संपर्कात येतो. या विषाणूंशी आपला कधीच संपर्क आलेला नसतो. या काळात आपण विविध पृष्ठभागांना स्पर्श करतो. त्यावर जंतूंचा वास असतो. अशा वेळी आपण अनेक लोकांना भेटतो, नव्या गोष्टी करतो.



या सगळ्याचा शरीरावर प्रचंड ताण येतो. यामुळे शरीर थकत जातं. पर्यटनामुळे काही काळ बदल जाणवतो. पण हवेतले असंख्य बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करण्यासाठी सज्ज असतात.

आणखी एक महत्त्वाचा आणि फारसा लक्षात घेतला जात नसलेला मुद्दा म्हणजे प्रवास. पर्यटनाच्या निमित्ताने आपण सतत फिरत असतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असतो. यामुळे शरीराला आराम कमीच मिळतो. फिरायला जायच्या आधीच आपण दमलेले असतो. तयारी करताना रात्री उलटून जातात. नेहमीचं काम सांभाळून आपण तयारी करत असतो. या सगळ्याचा झोपेवर परिणाम होतो. यामुळे फिरून आल्यावर आपण आजारी पडतो. त्यामुळे फिरून घरी परत असल्यानंतर शरीराला थोडा आराम द्यावा. आधीच्या वातावरणाशी जुळवून घ्यायला शरीराला वेळ मिळणं गरजेचं असतं. त्यामुळे पर्यटन करून आल्यावर लगेच कामाला जाऊ नका. थोडी अतिरिक्त सुट्टी घ्या. घरी परत आल्यानंतर आहाराकडे विशेष लक्ष द्या. जास्तीत जास्त पाणी प्या. फळं, भाज्या खा. सकस आहार घ्या. यामुळे आजाराला आळा बसू शकेल.

## देशातील पहिली डायबिटीज बायोबँक

संशोधन

देशात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. सर्व वयोगटातील लोक त्याला बळी पडत आहेत. बिघडलेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे तरुणांमध्ये मधुमेहाचा धोका वाढत आहे, हे लक्षात घेऊन 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसीएमआर) आणि मद्रास डायबिटीज रिसर्च फाउंडेशन (एमडीआरएफ) यांनी संयुक्तपणे चेन्नईमध्ये भारतातील पहिली डायबिटीज बायोबँक तयार केली आहे.

या जुनाट आजारावर संशोधन करणे हा त्याचा उद्देश आहे. 'बायोबँक'चे उद्दिष्ट मधुमेहाच्या कारणांवर हायटेक संशोधन करून त्याचे उपचार सोपे करणे हा आहे. यासह आरोग्याशी संबंधित परिस्थितीची देखील काळजी घेतली जाईल. बायोबँक नवीन बायोमार्कर ओळखण्यात मदत करेल. त्यामुळे मधुमेहाची सुरुवातीच्या टप्प्यात ओळख करून उपचार सुधारण्यात मदत होईल. त्यामुळे आगामी काळात संशोधनासाठी आवश्यक डेटा उपलब्ध होणार आहे.

**✻'डायबेटिस बायोबँक' चा काय फायदा होईल?**

बायोबँक तयार केल्याने या आजाराचे योग्य व्यवस्थापन आणि प्रतिबंध करण्यासाठी संशोधन आणि अभ्यासात मदत होईल. यासह मधुमेहाविरुद्धच्या जगात सुरू असलेल्या लढ्यात भारताची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे भारत जगाला मदत करू शकेल आणि इतर देशांचेही सहकार्य मिळेल. हे भांडार हाय-टेक सॅम्पल स्टोरेज आणि डेटा शेअरिंग तंत्रज्ञान वापरून स्वस्त आणि प्रभावी उपचार शोधण्यात मदत करेल.



**✻'डायबेटिस बायोबँक' अभ्यास काय सांगतो?**

डायबेटिस बायोबँकचा पहिला अभ्यास 'आयसीएमआर-इंडियाब' मध्ये आहे. त्यात ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील दीड लाखांहून अधिक लोकांचा समावेश होता. यामध्ये भारतात मधुमेह आणि प्री-डायबेटिसचे उच्च दर आढळून आले. देशातील १० कोटींहून अधिक लोकांना मधुमेह हा एक साथीचा रोग आहे, हेदेखील समोर आले आहे. अधिक विकसित राज्यांमध्ये मधुमेहाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. दुसऱ्या अभ्यासात तरुणांमध्ये आढळणाऱ्या मधुमेहाच्या प्रकरणांचा मागोवा घेण्यात आला. देशभरातील ५,५०० हून अधिक सहभागींचा समावेश होता. त्यात असे आढळून आले की टाइप वन आणि टाइप टू मधुमेह तरुणांमध्ये अधिक सामान्य आहे. अशा परिस्थितीत लोकांना या आजारापासून वाचवण्यासाठी 'डायबेटिस बायोबँक'ची भूमिका महत्त्वाची ठरू शकते.

## पुरेशी झोप घ्या

नवसंशोधन

खारट आणि गोड पदार्थांप्रती ओढ कमी करायची असेल तर पुरेशी झोप घेणं गरजेचं असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे. सात तासांपेक्षा कमी वेळ झोपल्याने तुम्हाला बराच त्रास होऊ शकतो. यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. दक्षिण आफ्रिकेतल्या केपटाउन विद्यापीठात याबाबत अभ्यास करण्यात आला. स्लीप रिसर्च या जर्नलमध्ये हे अध्ययन प्रकाशित झालं आहे. पुरेशा झोपेमुळे शरीराची इन्शुलिनच्या प्रती असणारी संवेदनशीलता वाढते. याचा परिणाम भुकेवर होतो. आपल्याला भूक कमी लागते. परिणामी, वजन वाढत नाही. या संशोधनासाठी शास्त्रज्ञांनी १३८ जणांचा अभ्यास केला. यात निरोगी आणि कमी वेळ झोपणारे, स्थूल आणि कमी वेळ झोपणारे अशा विविध व्यक्तींचा समावेश होता.



## अल्झायमर टाळायचा तर...

दंतारोग्य



शास्त्रज्ञांनी हिरड्यांचे विकार आणि अल्झायमर यांचा संबंध जोडला आहे. नॉर्वेतल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. हिरड्यांच्या विकारांवरून अल्झायमरचा अंदाज बांधता येतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे तोंडाचं आरोग्य राखणं गरजेचं आहे. नियमित दात घासल्यामुळे तुम्ही अल्झायमर म्हणजे स्मृतिभ्रंशाचा धोका टाळता येऊ शकतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. यासोबतच नियमित फ्लॉसिंग करणंही गरजेचं आहे.

## या सवयी आहेत?

डोळ्यांचं आरोग्य

दररोजच्या काही सवयींमुळे आपले डोळे खराब होतात. पण याकडे आपलं लक्षही जात नाही. कोणत्या सवयींमुळे डोळ्यांचं नुकसान होऊ शकतं हे माहीत असायला हवं. काहीजण दिवसभर कॉंटॅक्ट लेन्स वापरतात. अनेकजण या लेन्स घालूनच झोपतात. पण सलग दोन दिवस लेन्स घातल्यामुळे डोळ्यांमध्ये जंतूसंसर्ग होऊ शकतो. आपल्या लेन्स इतरांना देऊ नयेत तसंच जुन्या लेन्स घालू नयेत. सतत डोळे चोळल्यामुळे हातांवरचे बॅक्टेरिया आणि धूळ डोळ्यात जाऊन जंतूसंसर्ग होऊ शकतो. यामुळे तुमचे डोळे गुलाबी दिसू लागतात. डोळे चोळल्यामुळे कॉर्नियाला धोका निर्माण होतो. कायमस्वरूपी नुकसान होऊ शकतं.



## गुणकारी पपई

आजीबाईचा बटवा

पपई हे फळ आपल्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. पपईत भरपूर प्रमाणात 'क' जीवनसत्त्व असतं. यात फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी होतं. हृदयविकार आणि उच्च रक्तदाबालाही आळा बसू शकतो. रोगप्रतिकारकशक्तीमुळे अनेक रोगांना आपण लांब ठेऊ शकतो. पपईच्या सेवनामुळे शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. वयपरत्वे डोळे कमकुवत होतात. पपईतल्या 'अ' जीवनसत्त्वामुळे डोळ्यांचं आरोग्य सुधारतं. यातल्या पॅपिन या घटकामुळे पचनशक्ती सुधारते. मासिक पाळीच्या समस्याही सुटू शकतात. रक्तस्राव नियमित होऊ शकतो. त्यामुळे कोणतेही गैरसमज न बाळगता पपई खायला हवी.



## भावनांचा निचरा व्हावा

जीवनशैली बदलली तसा ताणही वाढला. आज आपण प्रत्येक वयोगटातील व्यक्ती तणावात असल्याचं पाहतो. सर्व गोष्टी मनासारख्या कधीच घडत नसतात. काम मनासारखे न झाल्यास ताण वाढतो. सतत तणावग्रस्त राहिल्यास शारीरिक आणि मानसिक स्तरावर लक्षणे दिसू लागतात. ही लक्षणे दीर्घकाळासाठी घातक सिध्द होतात. त्यामुळेच यावर वेळीच उपाययोजना केलेली बरी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ताण आहे हे लक्षात घेणे आणि तो स्वीकारणे. तणाव कमी करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर प्रयत्न केले जावेत. यासाठी तज्ज्ञांचे सहाय्य घेता येऊ शकते. काही औषधोपचाराने ताण हलका होत असतो. मात्र स्वत:विषयी एवढी काळजी घेणे अभावानेच आढळते. त्यामुळे वारंवार निराशा येत असल्यास, चीडचीड होत असल्यास, समाजाशी संपर्क नकोसा वाटत असल्यास, एकांतवास हवासा वाटत असल्यास अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही.



तणाव कमी करण्यासाठी विनोदनिर्मिती, उपयुक्त स्व-संवाद, व्यायाम, मेडिटेशन, योगा यासारखे उपाय उपयुक्त ठरतात. त्याचबरोबर आहार-विहाराचे योग्य नियम पाळूनही मनस्थिती जागेवर ठेवता येते. बरेचजण फार कमी पाणी पितात. पण शरीरातील प्रत्येक अवयव, पेशी तसेच मेंदूचे कार्य योग्य प्रकारे चालण्यासाठी पाण्याचे योग्य प्रमाण असणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्तीने दिवसभरात १०-१२ ग्लास पाणी पिणे गरजेचे आहे. योग्य प्रमाणात पाणी प्यायल्यास शरीरातील मज्जासंस्था आणि इतर अवयवांमधील संतुलन राहण्यास मदत होते. परिणामी, तणावही कमी होतो. बरेचदा दिवसभर लागोपाठ कामे केली जातात. यामुळेही शारीरिक अथवा मानसिक स्तरावर प्रचंड थकवा येतो. विशेषत: कौशल्यपूर्ण आणि अचूक काम केल्यावर थकवा जाणवतो अशा वेळी काहीकाळ विश्रांती घेणे श्रेयस्कर ठरते. २०-३० मिनिटांची छोटी डुलकी शरीर आणि मनावरचा ताण हलका करण्यासाठी पुरेशी असते. यामुळे पुन्हा ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. त्याचबरोबर स्थायूंमधल्या वेदना नाहीशा होण्यासही मदत होते. मनामध्ये निर्माण होणारे तणावात्मक विचार व्यक्त करायला हवेत. बरेचदा राग, भीती, चिंता, मत्सर, दु:ख अशा भावना मनाला व्यापून टाकत असतात. त्या मनातच दाबून ठेवल्याने ताण वाढतो. त्यामुळे अशा भावनांचा वेळीच निचरा करावा.

# हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :** राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.



यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर - सिंह, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत काम सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर चालविण्यात येतील.

या कार्यक्रमाला उंबर्डा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यातील उंबर्डा येतील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट आहे. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार आहे. धाराशीव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील प्रकल्प २ मेगावॅट क्षमतेचा आहे. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. वाशिम आणि धाराशीव जिल्ह्यातील एक - एक सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प यापूर्वीच सुरू झाले आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतील पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत राज्यात नोव्हेंबर अखेर १५,७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १,३०,४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री अशा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी अनेक दशकांची मागणी आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली.

या योजनेत राज्यभरात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून विकेंद्रीत स्वरुपात कृषी फीडर्सना विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल तसेच या योजनेत किफायतशीर दरात वीज मिळाल्यामुळे राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल.

## मद्यधुंद डंपरचालकाने फुटपाथवरील नऊ जणांना चिरडले

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :** पुण्यातील वाघोली येथील केसनंद फाटा चौकात फुटपाथवर झोपलेल्या पवार कुटुंबीयांवर काळाने घाला घातला. मद्यधुंद डंपरचालकाने गाढ झोपेत असलेल्या या १२ जणांच्या कुटुंबापैकी ९ जणांना रविवारी मध्यरात्री सव्वा वाजेच्या सुमारास चिरडले. त्यात एक, दोन वर्षांच्या दोन चिमुकल्यांसह एका २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. सहा जखमींवर ससून सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. अमरावती येथे राहणारे पवार कुटुंबीय कामाच्या शोधात पुण्यात आले होते. डंपरचालक गजानन शंकर तोटरेला अटक करण्यात आली आहे. त्याने मद्यपान केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मृतांच्या नातेवाइकांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. लाडकी बहीण योजनेत पैसे मिळत नसल्याची तक्रारही पवार कुटुंबातील महिलांनी केली.

विशाल विनोद पवार (२२), वैभवी रितेश पवार (१) आणि वैभव रितेश पवार (२, सर्व रा. अमरावती) अशी मृतांची तर, जानकी दिनेश पवार (२१), रिनिशा विनोद पवार (१८), रोशन शशादू भोसले(९), नागेश निवृत्ती पवार(२७), दर्शन संजय वैराळ (१८), आलिशा विनोद पवार (४७) अशी जखमींची नावे आहेत. २६ वर्षीय डंपरचालक तोटरे (सध्या रा. केसनंद, ता. हवेली) नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील पाळा गावचा मूळ रहिवासी आहे. वीरेंद्र भोसले (४५, मूळ रा. सारवाडी देववाडी, ता. कारंजा घाडगे, जि. वर्धा) यांच्या फियार्दीवरून त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मूळचे अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असलेले सुमारे ४० जण गेल्या चार वर्षांप्रमाणे यंदाही कामाच्या शोधात रविवारीच सायंकाळीच पुण्यात आले होते. ते सर्व केसनंद फाटा चौकात फुटपाथवर झोपले. या वेळी केसनंद-आव्हाळवाडी येथून डंपरचालक तोटरे खडी घेऊन केसनंद चौकातील पोलिस ठाण्यामागील रस्त्याने एका बांधकामाकडे गेला. तेथे खडी उतरवून तो पुन्हा केसनंदकडे जात होता. तेव्हा बेपर्वाईने त्याने डंपर फुटपाथवर चढवला. विशाल, वैभवी आणि वैभव यांच्या थेट अंगावरून डंपरचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर सहा जणांना चाक घासून गेले. जखमींचा आक्रोश कानावर येताच वाघोली पोलिस ठाण्यातील कर्मचारी आणि रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेतली.

## नव्या मंत्र्यांचे शासनाकडून दालन, बंगल्यांचे वाटप

### रामटेक चंद्रकांत बावणकुळे, पंकजा मुंडेंना पर्णकुटी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** गेल्या दोन दिवसांपासून पालकमंत्री पदावरून महायुतीत रस्सीखेच सुरू असताना, राज्य शासनाने नवनिर्वाचित मंत्र्यांना दालन आणि बंगले देण्याचा शासन आदेश सोमवारी जारी केला. महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना रामटेक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना पर्णकुटी, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्यासह ३९ मंत्र्यांना बंगल्याचे वापट करण्यात आले आहे. तसेच मंत्र्यांनी विस्तार आणि मुख्य इमारतीत दालने देणारा आदेश काढण्यात आला. त्यामुळे काहींना मनासारखे दालन आणि बंगले मिळाले तर काहींना मनाविरुद्ध खाते, दालन तसेच बंगले देखील मिळाले.

महायुती सरकारचा १५ डिसेंबरला विस्तार झाला. ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. हिवाळी अधिवेशनात मंत्र्यांना खाते मिळतील, अशी अपेक्षा होती. परंतु, खाते वाटप न करता, अधिवेशन पार पडले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नव्या मंत्र्यांना खातेवाटप जाहीर केले. त्यानंतर पालकमंत्री पदावरून मंत्र्यांमध्ये चुरस लागली. मात्र त्यापूर्वीच नव्या मंत्र्यांना बंगले आणि दालने देण्यात आली आहेत. वनमंत्री गणेश नाईकांना पावनगड बंगला मिळाला आहे. तर हसन मुश्रीफ यांना विशाळगड, चंद्रकांत पाटील यांना सिंहगड, गिरीश महाजन यांना सेवा सदन, गुलाबराव पाटील यांना जेतवन, जयकुमार रावल यांना चित्रकूट, अतुल सावे यांना शिवगड,आशिष शेलार यांना रत्न सिंधू, दत्तात्रय भरणे यांना सिद्धगड,, अदिती तटकरे यांना प्रतापगड, शिवेंद्र राजे भोसले यांना पन्हाळगड, माणिकराव कोकाटे यांना अंबर, जयकुमार गोरे यांना प्रचितीगड, नरहरी झिरवाळ यांना सुरुची, संजय सावकार यांना अंबर ३२ तर संजय शिरसाट यांना अंबर ३८ हा बंगला देण्यात आला आहे. उदय सामंत यांना मुक्तागिरी तर धनंजय मुंडे यांना सातपुडा हा बंगला देण्यात आला आहे. संजय राठोड यांना शिवनेरी बंगला, दादा भुसे यांना ब तीन जंजिरा हा बंगल्याचे वाटप केले आहे.

## कल्याणच्या आधारवाडी तुरुंगात गृहरक्षकाला न्यायबंद्याची मारहाण

■ **महासागर प्रतिनिधी, कल्याण, दि. २४ :** येथील आधारवाडी तुरुंगात सोमवारी संध्याकाळी एका न्यायबंदीने एका गृहरक्षकाला शिवीगाळ करत मारहाण केली. या गृहरक्षकाच्या गणवेशावरील शासकीय खुणा तोडून नुकसान केले. कर्तव्य करत असताना सरकारी कामात अडथळा आणला म्हणून गृहरक्षकाच्या तक्रारीवरून खडकपाडा पोलिसांनी न्यायबंदी विरुद्ध गुन्हा दाखल केला.

पंकज संतलाल यादव असे मारहाण करणाऱ्या न्यायबंदीचे नाव आहे. विनायक धर्मदास भालेराव असे आधारवाडी कारागृहातील गृहरक्षकाचे नाव आहे. आधारवाडी तुरुंगातील रुग्णालय कक्षात हा प्रकार सोमवारी संध्याकाळी घडला.

गृहरक्षक भालेराव यांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की न्याय बंदी पंकज यादव यांना आपण तुरुंगातील मुलाखत कक्षातून घेऊन रुग्णालय कक्षात परत येत होतो. मुलाखत कक्ष ते रुग्णालय कक्षादरम्यान न्यायबंदी पंकज यांनी गृहरक्षक भालेराव यांना, तू माझी मुलाखत पूर्ण होऊ दिली नाही.

माझी मुलाखत अर्धवट राहिली, असे बोलून पंकज यांनी भालेराव यांना हातवारे करून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी गृहरक्षक भालेराव यांनी तुमची मुलाखत अर्धवट राहिलेली नाही.

तुम्ही माज्याशी नीट बोला. हे वाक्य पूर्ण होताच न्यायबंदी पंकज यादव यांनी रागाच्या भरात गृहरक्षक भालेराव यांच्या अंगावर धाऊन जाऊन त्यांच्या सदऱ्याची गळपट्टी पकडली. अचानक न्याय बंदीने हल्ला केल्याने भालेराव यांनी त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला.

आक्रमक झालेल्या पंकज यांनी भालेराव यांना शिवीगाळ करत ठोशाबुक्क्याने मारहाण केली. त्यांचा सदरा आणि गळपट्टी पकडली. या झटापटीत भालेराव यांच्या गणवेशावरील शासकीय खुणांची पट्टी तुटली. इतर कर्मचारी धाऊन आल्यानंतर भालेराव यांची सुटका झाली.

सरकारी कामात पंकज यांनी अडथळा आणला म्हणून भालेराव यांनी त्यांच्या विरुद्ध खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलमाने गुन्हा दाखल केला आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक टी. जी. जोशी याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## महाबळेश्वर आणि पाचगणी या दोन्ही नगर परिषदांना निधी उपलब्ध करून देणार



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** महाबळेश्वर आणि पाचगणी येथील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तसेच इथे येणाऱ्या पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे पत्रकारांशी बोलताना दिली.सातारा जिल्ह्यातील दरे या मूळ गावी आज आले असता आपल्या निवासस्थानी संबंधित अधिकाऱ्यांसोबत घेतलेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विश्रांती घेण्यासाठी सध्या सातारा जिल्ह्यातील दरे या त्यांच्या मूळगावी आले आहेत.तिथे गेले दोन दिवस आराम केल्यानंतर आजपासून त्यांनी पुन्हा एकदा ॲक्शन मोडवर येत कामाला सुरुवात केली.

त्याची सुरुवात म्हणून आपल्या दरे येथील निवासस्थानी त्यांनी आज महाबळेश्वर आणि पाचगणी नगर परिषदांचे मुख्याधिकाऱ्यांना बोलावून या दोन्ही नगरपरिषदांची आढावा बैठक घेतली. यावेळी या दोन्ही नगरपरिषदांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

यात महाबळेश्वर आणि पाचगणी या दोन्ही पर्यटनस्थळांवर नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. यावेळी घाटातील रस्ते अरुंद असल्याने इथे वारंवार मोठी वाहतूक कोंडी होते. त्यामुळे पर्यटकांना अडकून पडावे लागते.

तसेच येणाऱ्या वाहनांना पुरेसे पार्किंग उपलब्ध व्हावेत यासाठी नव्याने पार्कींग लॉट तयार करावे, शक्य असेल तिथे एलिव्हेटेड पार्कींगचा प्रकल्प राबवावा असेही त्यांनी सुचवले.

तसेच इथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना योग्य त्या सुविधा देताना त्यांना सौजन्यपूर्ण वागणूक मिळेल याकडे विशेष लक्ष द्यावे असेही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले.तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांना वारंवार इथे यावेसे वाटावे यासाठी त्यांना आकर्षित करण्यासाठी काही नाविन्यपूर्ण प्रकल्पही राबवावे असेही सुचवले.

त्यासाठी लागणारा निधी नगरविकास विभागाच्या माध्यमातून देण्याच्या सूचना देखील उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या असून या दोन्ही नगरपरिषदांना लागेल तो निधी तत्काळ देण्यासही त्यांनी या बैठकीत मान्यता दिली.

यावेळी महाबळेश्वर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील, पाचगणी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निखिल जाधव आणि महाबळेश्वर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक बी.पी. सांडभोर आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

## पुढचा महाराष्ट्र कसा असेल याची भीती वाटते

### सुप्रिया सुळेंनी व्यक्त केली चिंता

■ **महासागर प्रतिनिधी, बारामती, दि. २४ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे या सध्या बारामतीच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्रातील वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करत चिंता व्यक्त केली आहे. तसेच पक्षाची 8 व 9 जानेवारी रोजी मुंबईत बैठक होणार असल्याची देखील त्यांनी माहिती दिली आहे. यात पक्षाची आगामी भूमिका ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, आजवर जे सिनेमात गुन्हेगारीचे चित्र पाहायला मिळायचे ते आता महाराष्ट्रात वास्तवात दिसू लागले आहे. या घटना महाराष्ट्राला शिभणाऱ्या नाही. आता पुढचा महाराष्ट्र कसा असेल



अशी भीती मला वाटत आहे, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्राच्या भविष्याची काळजी व्यक्त केली आहे. परभणी येथील घटनेवर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, परभणीतील घटना महाराष्ट्रासाठी अतिशय निंदनीय आहे. शरद पवार गेल्यानंतर राज्यातील इतर नेते, लोक गेले तोपर्यंत कोणीही त्या ठिकाणी भेट द्यायला गेले नव्हते,अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

### उभ्या ट्रकवर धडकून एकाचा मृत्यू

**नागपूर :** उभ्या ट्रकवर धडकून एका चारचाकी चालकाचा मृत्यू झाला. ही घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. प्रविण कृष्णा नागपुरे (28) रा. गुंथाळा, खापरखेडा असे मृताचे नाव आहे.

प्रविण एमएच-28/व्ही-3338 क्रमांकाच्या एसयूव्ही वाहनाने वाडीतून घरी जात होता. अमरावती मार्गावर गुरूद्वारासमोर ट्रक क्र. एमएच-34/बीजी-4146च्या चालकाने त्याचे वाहन रस्त्यावरच उभे केले होते. परिसरात अंधार असल्याने रस्त्यावर ट्रक उभा असल्याचे प्रविणला समजलेच नाही आणि त्याची एसयूव्ही ट्रकच्या मागच्या भागात जाऊन धडकली. यात प्रविण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी प्रविणला घरी पाठवले. कुटुंबीयांनी त्याला उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

## कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही : अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वित्त व नियोजन तसेच राज्य उत्पादन शुल्क मंत्रिपदाचे सूत्र हाती घेताच मंगळवारी दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्या या दोन्ही विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच करसंकलन आणि महसूलवाढीच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याचे निर्देश अजित पवारांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. अधिकाऱ्यांनी पारदर्शक कारभार करावा. करचोरी, करगळती रोखण्याच्या कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देखील अजित पवारांनी दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रलंबित योजना, आवश्यक



निधी तसेच राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला.

मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात वित्त नियोजन विभाग तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सविस्तर माहिती घेतली आहे. या बैठकीत वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा व इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यासारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना देत राज्याच्या महसूल वाढीसाठी करचोरी, करगळतीसह गैरकारभार रोखण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी अजित पवारांनी करसंकलनाचे उद्दीष्ट गाठण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात येतील परंतु कामात परिस्थितीत हयगय चालणार नसल्याचे सांगत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**श्री रंगनाथ स्वामी** नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित .वणी

**सोनेतारण जाहीर लिलाव नोटीस**

**श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित .वणी सोने** तारण खालील शाखेचे कार्यालय खालील नमुद केलेले खात्यांचे **सोने तारण** कर्जदार यांना वारंवार मुदत संपलेचे पत्र रजिष्ट्रर ए.डी.,मोबाईलवर मेसेज व्दारे/समक्ष भेट देऊन नोटीस दिली आहे. तरीही त्यांनी मुदतीत कर्ज परतफेड केलेली नाही अथवा खाते नुतणीकरण केले नाही. खालील थकबाकीदाराकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांचे कर्जाचे तारणापोटी ठेवलेल्या दागिण्यांचा जाहीर लिलाव **शुक्रवार , दि.१०/०१/२०२५** व **सोमवार , दि १३-०१-२०२६** रोजी खालील नमुद ठिकाणी शाखा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी नमुद केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. मात्र लिलावाचे पुर्वी थकीत कर्जदाराने कर्जफेड वा कर्ज नुतणीकरण केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. लिलाव स्थगित ठेवणे व लिलाव मुदत वाढ देणे,रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवले आहेत

| अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | लिलावाची दिनांक व वेळ लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाखा –चंद्रपूर,भद्रावती | | | | | | | | | |
| १ | ८०००१०१ | पवन सुरेश श्रीवासकर | ३ | ११०००२६० | जुगल शंकर डुकरे | ५ | ११०००३४८ | निलम विलास तामडगे | शाखा - वणी मुख्य कार्यालय राम शेवाळकर परिसर ,यवतमाळ रोड ,ता .वणी जि .यवतमाळ वार – शुक्रवार दिनांक -१०.०१.२०२६ |
| २ | ८०००१०७ | बोकडे रोहन अरविंद | ४ | ११०००३१० | बिधान संन्यासी | ६ | ११०००३४९ | थावरी आकाश राजू | |
| शाखा - ब्रम्हपुरी,चिमूर ,वडसा | | | | | | | | | |
| अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | |
| १ | १२०००२०७ | भार्गव श्रीरंग अनिल | ४ | १२०००२११ | खलोरे दिलजित विनोदराव | ७ | १५००००२२ | ढोरे सुरेश हिरालाल | शाखा – ब्रम्हपुरी जॉन डीअर ट्रॅक्टर शोरूम वरती नागभीड रोड, ब्रम्हपुरी, वार – सोमवार दिनांक -१३.०१.२०२६ वेळ-१२ .०० वा |
| २ | १२०००२०८ | भार्गव श्रीरंग अनिल | ५ | १५००००११ | नखाते गणेश विनोद | ८ | १५००००२५ | कात्यायन गणेश त्रिंबकराव | |
| ३ | १२०००२०९ | भार्गव श्रीरंग अनिल | ६ | १५००००१९ | नखाते गणेश विनोद | ९ | १७००००१९ | अतुल नरेंद्र साळवे | |
| शाखा – राजुरा ,मुल | | | | | | | | | |
| अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | |
| १ | ९०००२४७ | हरिहर किरण नारायण | ३ | ९०००३६६ | आले प्रकाश विठोबा | ५ | १००००१०३ | तुपकर राजेश हरिभाऊ | शाखा - राजुरा आसफाबाद रोड, पंचायत समिती जावळ, राजुरा, जिल्हा चंद्रपूर वार – सोमवार दिनांक -१३.०१.२०२६ वेळ-०२ .०० वा |
| २ | ९०००३२२ | असत उल्ला बेग आजीज बेग | ४ | १००००००८९ | सतीश विलास राऊत | ६ | १००००१०७ | प्राची प्रवीण सायमवार | |

**लिलावाच्या अटी शर्ती :-**

१) लिलावात भाग घेणारास रु.५,०००/-रोख भरुन भाग घ्यावा लागेल.

२) लिलाव मंजूर,नामंजूर किंवा स्थगित करणेचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.

३) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखविण्यात येतील.

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित .वणी

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ बुधवार, दि. २५, डिसेंबर २०२४ ■

# मध्यस्थी करणे जीवावर बेतले

**नागपूर :** काही तरुणांना एका मजुरासोबत भांडताना पाहून एका व्यक्तीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र यामुळे चिडून आरोपींनी त्या व्यक्तीवरच चाकूने हल्ला करून गंभीर जखमी करीत त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तीन तरुणांना अटक केली आहे. मोहम्मद फैजान मोहम्मद इब्राहिम (19), मोहम्मद दानिश अरशद अली (19) आणि साहिल अली मुश्ताक अली (19) तिन्ही रा. हसनबाग अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. जखमी फिरोज खान मेहबूब खान (38) रा. शारदा लेआऊट, वाठोडा यांच्यावर मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सोमवारी रात्री 9.30 वाजताच्या सुमारास फिरोज हे त्यांच्या मित्र-ासोबत हसनबाग परिसरातील ताज दरबाज ऑटोडीलसमोर बोलत उभे होते. परिसरात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या दरम्यान वरील आरोपी पुलाचे बांधकामावरील एका मजुराला शिविगाळ आणि मारहाण करताना दिसले. फिरोज यांनी आरोपींना फटकारत त्या मजुराला त्यांच्या तावडीतून सोडवले.

यामुळे आरोपी चिडले. त्यांनी मजुराला सोडून फिरोज यांच्याशीच भांडण सुरू केले. शिविगाळ करीत मारहाण करू लागले. या दरम्यान फैजानने चाकू काढला. फिरोज यांचा गळा, पोट आणि कंबरेवर वार केले. फैजान यांना गंभीर जखमी करून आरोपी फरार झाले. फैजान यांच्या मित्राने घटनेची माहिती पोलिसांना दिली.

# सुमतीताईंचे संघर्षमय जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी : नितीन गडकरी

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सुमतीताई सुकळीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
पक्ष, संघटना संकटात असताना सुमतीताई सुकळीकर यांनी राष्ट्रकार्य सोडले नाही. पक्षाला मान-सन्मान नव्हता. मान्यता नव्हती. पक्षाचे काम जवळपास संपुष्टात आले होते. पण राष्ट्राच्या पुनर्निमाणाचा विचार सुमतीताईंनी संघषार्तून पुढे नेला. ताईंचे संघर्षमय जीवन आम्हा सर्वांसाठी प्रेरणा आहे, या शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी लोकमाता सुमतीताई सुकळीकर यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

नागपूरच्या सामाजिक, राजकीय जीवनात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या व जनसंघाच्या तत्कालीन आघाडीच्या नेत्या स्व. सुमतीताई सुकळीकर यांच्या जन्मशताब्दी वषार्चा सांगता समारंभ मंगळवारी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला ना. श्री. नितीन गडकरी अध्यक्षस्थानी होते. सिव्हिल लाइन्स येथील स्व. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसच समितीचे संयोजक प्रा. अनिल सोले, माजी न्यायाधीश मीराताई खडक्कार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू योगानंद काळे, आमदार चैनसुख संचेती, माजी आमदार अरुण अडसड यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. 'खेल खिलाडी खेल'चे संपादक संजय लोखंडे यांनी ताईंच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संपादित केलेल्या 'निष्ठा तुझे नाव ताई' या विशेषांकाचे प्रकाशन यावेळी झाले.

समाजातील शोषित पीडित माणसाचे जीवन बदलण्याचा पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदयाच्या विचारांवर त्यांनी कार्य केले. सुमतीताई व त्यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आयुष्यभर संघर्ष सोसला म्हणून आज आपल्या पक्षाला चांगले दिवस आले आहेत. आज आपल्या पक्षाला, विचाराला जागतिक मान्यता मिळाली आहे. त्याचे श्रेय जुन्या-जाणत्या कार्यकर्त्यांना आहे. मात्र, हे यश सहज प्राप्त झालेले नाही, याची जाणीव नवीन पिढीतील कार्यकर्त्यांनी ठेवणे आवश्यक आहे, अशी अपेक्षाही ना. श्री. गडकरी यांनी व्यक्त केली.

१९७७ मध्ये जनता पार्टीच्या चिन्हावर निवडणूक लढवली गेली, तेव्हा अर्ध्या नागपुरात रिक्षावर अनाऊन्समेंट करायला मी फिरलो. रिक्षावर फिरायला अनेक लोक तयार व्हायचे नाहीत. त्यामुळे लोक आदर करायचे नाही. त्या प्रतिकूल परिस्थितीतही सुमतीताई झोपडपट्टीत जाऊन लोकांची सेवा करायच्या. आज पक्षाचा आमदार निवडून येणे सोपे आहे. मात्र आम्ही सर्वांनी प्रयत्न करूनही ताईंनी निवडून आणून देऊ शकलो नाही याची खंत आहे, असेही ना. गडकरी म्हणाले.

### सुमतीताईंनी पक्षाचा दिवा घरोघरी नेला : मुख्यमंत्री फडणवीस

जनसंघाचा दिवा घेऊन सुमतीताई जनमानसात सातत्याने गेल्या. त्यांनी पक्षाचे कार्य मोठे केले. भारतीय जनसंघाची खरी ताकत मातृशक्ती होती, असे म्हटले जायचे. सुमतीताई चारवेळा निवडणूक लढल्या. पक्ष मोठा झाला पाहिजे आणि पक्ष घरोघरी पोहोचला पाहिजे, या उद्देशाने लढल्या. निवडणूक हरल्या तरीही मनाने कधी हरल्या नाहीत. प्रत्येकवेळी तेवढ्याच ताकदीने उभ्या व्हायच्या. सातत्याने कार्य केले. पोलिसांशी संघर्ष केला. नेता म्हणून जशा कणखर होत्या, तेवढ्याच त्या कार्यकर्त्यांसाठी मातृतुल्य होत्या. भारतीय जनसंघाचे कुटुंब त्यांनी उभे केले, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमतीताई सुकळीकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.

### सुमतीताईंच्या सहकाऱ्यांचा गौरव

जनसंघाच्या काळात सुमतीताई सुकळीकर यांच्यासोबत विविध आंदोलनात भाग घेणारे सर्व ज्येष्ठ कार्यकर्ते योगानंद काळे, सुधाताई सोहोनी, शोभाताई फडणवीस, आनंदराव ठवरे, सविताताई काळे, मालतीताई बढिये, उमाताई पिंपळकर, नंदिनीताई हलकंदर, निर्मलाताई चितळे, रमेश दलाल, शशीताई जोशी, मालाताई केकतपुरे, दारुराम देवांगण, मामा पांढरीपांडे, मोरुभाऊ बरडे, अब्दुल लतीफ बाबा, विजय केवलरामानी यांचा ना. श्री. गडकरी व ना. फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ, पुस्तक आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

# राज्यसेवा २०२४ च्या जागावाढीसाठी विद्यार्थ्यांचे सरकारला साकडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) ४३१ जागांसाठी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ही शेवटची वस्तूनिष्ठ परीक्षा नुकतीच घेण्यात आली. यात खुल्या वगार्साठी अत्यंत कमी जागा असून शासकीय सेवेतील तहसीलदार, पोलीस उपविभागीय अधिकारी अशी अनेक पदे रिक्त आहेत. तर, २०२५ पासून राज्यसेवा परीक्षेत बदल होणार असून ती वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे. त्यामुळे जुन्या पद्धतीने परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी ही शेवटी संधी आहे. त्यामुळे राज्य शासनाने विद्यार्थी हिताचा विचार करता मुख्य परीक्षेपूर्वी राज्यसेवा २०२४च्या जागांमध्ये वाढ करावी अशी मागणी होत आहे.

एमपीएससीने जून २०२२ मध्ये परीक्षेची पद्धत व अभ्यासक्रमामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला. बदलाची अंमलबजावणी २०२३ पासून होणार होती. वर्णनात्मक स्वरूपाच्या प्रश्नपत्रिका, मुलाखत आणि लेखी परीक्षा मिळून २ हजार २५ गुण असे सुधारित योजनेचे स्वरूप होते. मात्र, एका वर्षात परीक्षेत मोठ्या बदलांस विद्यार्थ्यांनी विरोध केला. त्याची दखल घेत एमपीएससीने परीक्षेचे वर्णनात्मक स्वरूप २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यसेवा २०२४ ही वस्तुनिष्ठ पद्धतीने झालेली शेवटी परीक्षा आहे.

त्यामुळे या परीक्षेत जागावाढ झाल्यास अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. यापूर्वी २०२२ मध्ये ६२३ पदांसाठी राज्यसेवा परीक्षा घेण्यात आली होती. तसेच राज्यात आताही राजपत्रित अधिकाऱ्यांच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्यामुळे शासनाने याची दखल घेत एमपीएससीकडे वाढीव जागांचे मागणीपत्र पाठवून राज्यसेवा २०२४च्या परीक्षेतील जागांमध्ये वाढ करण्याची विनंती करावी, अशी मागणी विद्यार्थी करीत आहेत.

राज्यसेवा २०२४ पूर्व परीक्षा १ डिसेंबरला घेण्यात आली असून एप्रिल महिन्यात मुख्य परीक्षा होणार आहे. मात्र, जागावाढ करण्याचा अधिकार हा राज्य सरकारला आहे. यासाठी सरकारकडून एमपीएससीला पुन्हा सुधारित मागणीपत्र पाठवून इतर जागांची मागणी करावी लागणार आहे. विशेष म्हणजे राज्यसेवा २०२४ मध्ये ४३१ पैकी खुल्या वगार्साठी केवळ ७० जागा आहेत. त्यामुळे राज्य शासनाने जागावाढ केल्यास सर्वांनाच फायदा होणार आहे.

# महिला आयोगाकडे सर्वाधिक तक्रारी वैवाहिक समस्यांबाबत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
राज्य महिला आयोगातील समुपदेशन व विधी शाखेकडे १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान सर्वाधिक १ हजार ८८३ तक्रारी वैवाहिक समस्यांबाबत नोंदवण्यात आल्या. सामाजिक समस्या व बलात्काराबाबतही दीड हजारावर तक्रारी नोंदवण्यात आल्या.

राज्य महिला आयोगातील समुपदेशन व विधि शाखेकडे १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान राज्यात वैवाहिक समस्यांबाबत १ हजार ८८३ तक्रारी, सामाजिक समस्या व बलात्काराबाबत १ हजार ५३७, मालमत्तेविषयक ४४७, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाबाबत २८, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाबाबत ४२९, इतर प्रकरणांबाबत १ हजार ७४९ अशा एकूण ६ हजार ७३ तक्रारी दाखल झाल्या.

आधीच्या व नवीन अशा एकूण ७ हजार ७७४ तक्रारींपैकी ५ हजार ९६६ तक्रारी निकाली काढण्यात आल्या.

त्यानंतरही राज्यात १ नोव्हेंबर २०२४ रोजी वैवाहिक समस्यांबाबत ८६० तक्रारी, सामाजिक समस्या व बलात्काराबाबत ३३३, मालमत्तेविषयक १६६, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाबाबत ३०, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाबाबत ३०, इतर प्रकरणांबाबत २७३ अशा एकूण १ हजार ८०८ तक्रारी प्रलंबित आहेत. सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी याबाबतची माहिती मागितली होती.




नागपूर : विश्वाला शांती आणि प्रेमाचा संदेश देणारे प्रभू येशू यांघा जन्म दिवस ख्रिसमस म्हणून जगभरात साजरा केला जातो. बुधवारी साजरा होत असलेल्या ख्रिसमस निमित्त चर्च आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले असून रोषणाई करण्यात आली आहे. धर्मगुरू प्रार्थनेपूर्वी तयारी करताना दिसत आहेत.

# माळी समाजाचा परिचय मेळावा आज

**नागपूरः** महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशिबाग अंतर्गत महात्मा फुले उपवर वर-वधु परिचय मेळावा समितीतर्फे माळी समाजाचा उपवर युवक -युवतींचा परिचय मेळावा बुधवारी 25 डिसेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता.

रेशीमबाग येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या सांस्कृतिक सभागृहात होणार आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा.अरुण पवार यांच्या अध्यक्षतेखाली, पोलिस महानिरीक्षक डॉ. दिलीप भुजबळ, अमरावतीचे आमदार चंदु यावलकर, बालरोग तज्ञ अभिलाषा गावतुरे, डॉ. पंकज राऊत यांची उपस्थिती राहतील. या मेळाव्यास जास्तीत जास्त मोठ्या संख्येने वर-वधु व समाज बांधवांनी उपस्थित राहावे. असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अरुण पवार यांनी केले आहे.

# साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर तर्फे वीर बाल दिवस केला जाणार साजरा

**नागपूर :** दहावे शीख गुरु श्री गुरु गोविंद सिंग जी यांचे धाकटे पुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग जी आणि बाबा फतेह सिंग जी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ भारत सरकार 2022 पासून 26 डिसेंबर रोजी वीर बाल दिवस साजरा करण्याचे ठरले. श्री गुरु गोविंद सिंग जी यांच्या धाकट्या पुत्रांच्या महान शौयार्ला आणि सर्वोच्च बलिदानाला श्रद्धांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी "वीर बाल दिवस" केला जातो.

सांस्कृतिक मंत्रालय आणि महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या सूचनेनुसार, 'वीर बाल दिवस' निमित्त बाल कलाकारांच्या कार्यक्रमाचे आयोजन दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र , नागपूर कॅम्पस येथे करण्यात आले आहे. 26 डिसेंबर 2024 सायंकाळी 5 वा. यामध्ये बाल कलाकारांकडून नृत्य, संगीत आणि गायन सादर केले जाणार आहे. याशिवाय मुलांकडून ढोल-ताशा पथकाचे दमदार सादरीकरण होणार आहे. 'वीर बाल दिवस ' अंतर्गत, दक्षिण मध्य क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्र, नागपूर, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांच्यातर्फे 26 डिसेंबर 2024 रोजी केंद्रातील सहभागी राज्यांमध्ये विविध ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यामध्ये बाल कलाकारांकडून विविध कलाप्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहे.

# छतावर सौर ऊर्जानिर्मितीसाठी महावितरणतर्फे मोफत नेट मीटर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आता महावितरणतर्फे ग्राहकांना मोफत नेट मीटर मिळेल. त्यामुळे ग्राहकांना आपल्या प्रकल्पात किती वीजनिर्मिती झाली व घरामध्ये किती विजेचा वापर झाला याची अद्ययावत माहिती मोबाईल ॲपवर मिळेल. मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ग्राहकांना ही सवलत देण्यात येत आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.



मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्या अंतर्गत तीन किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेचे प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत ग्राहकाच्या छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पात किती वीज तयार झाली, ग्राहकाने घरात किती वीज वापरली व किती अतिरिक्त वीज ग्राहकाकडून महावितरणला विकली गेली याची नोंद करण्यासाठी एक वेगळा नेट मीटर बसवावा लागतो. आतापर्यंत त्याचा खर्च ग्राहकाला करावा लागत होता. आता महावितरणने ग्राहकांना सोलर नेट मीटर विनामूल्य पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळेल. त्यानुसार त्यांना वीजवापराचे नियोजन करून वीजबिल शून्य येण्यासाठी नियोजन करता येईल.

राज्यात सध्या 3 लाख 23 हजार ग्राहकांनी महावितरणकडे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. या सर्व ग्राहकांना महावितरणच्या सोलर नेट मीटर विनामूल्य देण्याच्या निर्णयाचा लाभ होईल.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या वर्षी फेब्रुवारी महिन्यात सुरू झाल्यापासून राज्यात 83,074 ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांची एकत्रित क्षमता 315 मेगावॅट आहे व त्यांना केंद्र सरकारकडून 647 कोटी रुपये अनुदान मंजूर झाले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. महावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत फेसलेस व पेपरलेस पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे.

# बीम सरकल्याने बुटीबोरी उड्डाणपूलाचा जोड झाला वरखाली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
नागपूर-चंद्रपूर आणि नागपूर-वर्धा मार्गाला जोडणारा आणि पुढे हैदराबादकडे जाणारा राष्ट्रीय महामार्गावरील बुटीबोरी येथील उड्डाणपूलाला जोडणारा बीम सरकल्यामुळे पूलाचा जोड सांधा खालीवर झाली. परिणामी वाहतूक पोलिसांनी उड्डाणपूलावरील वाहतूक उड्डाणपूला खालून वळवल्याने वाहतुकीची कोंडी झाली.

या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प आणि वाहतूक विस्कळीत झाली आहे. वर्धा रोड आणि बुटीबोरी एमआयडीसीकडे जाणाऱ्या चौकात राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा उड्डाण पूल १७ जून २०२१ रोजी वाहतुकीसाठी खुला केला. आता तीन वषांत पुलाच्या कामाच्या दजार्ची पोलखोल झाली आहे.

स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार बुटीबोरी येथे अगदी चौकातील पुलाचा काही भाग सुमारे अर्धा फुट खचला आहे. या पुलाचे ह्यमटेरियलह्न खाली पडत आहे. मंगळवारी सकाळी ही बाब लक्षात आल्यानंतर सुरुवातील एका बाजूने वाहतूक बंद करण्यात आली. त्यानंतर दोन्ही बाजूची वाहतूक पुलावरून बंद करण्यात आली आहे. परिणामी ही वाहतूक बुटीबोरीच्या मुख्य चौकातून वळवण्यात आली आणि वाहतूक अतिशय संथ गतीने सुरू आहे.



सकाळी उड्डाणपुलाजवळील सपोटिंग बीम तुटल्याने एकच खळबळ उडाली असून, बीम तुटल्याने उड्डाणपूलाला जोडणारा सांधा सुमारे ८ ते १० इंच खचला. या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. कारण या चौकात नेहमीच लोकांची गर्दी असते. घटनेचे गांभीर्य पाहून स्थानिक पोलिसांनी तातडीने उड्डाण पुलावरील वाहतूक बंद केली. संपूर्ण वाहतूक सर्व्हिस रोडवरून वळवण्यात आली.

सर्व्हिस रोडच्या दुरुस्तीकडे कायमचे दुर्लक्ष होते. उड्डाण पुलाच्या उद्घाटनानंतर कंत्राटदार टीएनटी कंपनीला उड्डाण पुल आणि त्याला जोडलेल्या १६०० मीटर लांबीच्या सर्व्हिस रोडच्या दुरुस्तीचे ५ वर्षांचे कंत्राट देण्यात आले आहे. संबंधित प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

भूमिपूजन समारंभात गडकरी यांनी बांधकामाचे कंत्राट घेतलेल्या टीएनटी कंपनीच्या कामाच्या दजार्चे कौतुक केले होते. आणि उड्डाणपूलाच्या मजबुतीसाठी २०० वर्षांची हमी दिली होती. १ डिसेंबर २०१८ रोजी बांधकाम सुरू झाले आणि १७ जून २०२१ रोजी गडकरींनी स्वतः पुलाचे उद्घाटन केले. उड्डाणपूलावरून जाणाऱ्या वाहतुकीमुळे स्थानिक नागरिक व इतर वाहतूकदारांना काहीसा दिलासा मिळाला.

# हिंगणा तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अजय धर्मपुरीवार

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २४ :

तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अजय धर्मपुरीवार, कार्याध्यक्ष रवींद्र कुंभारे तर सरचिटणीस पदी मनोज झाडे यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. तालुका पत्रकार संघाची विशेष सभा रवीवारी( २२) झोन चौक येथील हॉटेल ग्लोरी सभागृहात जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष सुभाष वऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



पत्रकार संघाचे तत्कालीन पदाधिकारी स्व. मधुकरजी राजधरकर, स्व. संजय खळतकर, पत्रकार देवेंद्र सिरसाट यांना पत्रकार संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.यानंतर हिंगणा तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदासाठी सवार्नुमते अजय धर्मपुरीवार, उपाध्यक्ष सुनील भोंबळे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कावळे, कार्याध्यक्ष रवींद्र कुंभारे, सरचिटणीस मनोज झाडे, कोषाध्यक्ष रोशन आमनेरकर यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कार्याध्यक्ष सुभाष वऱ्हाडे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. मावळते अध्यक्ष राजेंद्र सांभारे, सरचिटणीस मधुसूदन चरपे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष सुभाष वऱ्हाडे, जिल्हा प्रतीनीधी गणेश धानोरकर,नरेंद्र कुकडे, माजी अध्यक्ष रमेश पाटील, राजेंद्र सांभारे, डॉ. शीतल उमरे, मधुसुदन चरपे, जितेंद्र वाटकर, गणपत सोनकुसळे, प्रवीण राजधरकर, विजय राऊत उपस्थित होते. सभेचे संचालन अजय धर्मपुरीवार व आभार मधुसूदन चरपे यांनी मानले.

## तंबाखू-गुटखा विक्रेत्यावर धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

कळमना पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि गुटखा विक्रेत्यावर धाड टाकून मोठ्या प्रमाणात माल जप्त केला. राजू अमरलाल शाहू (35) रा. दुर्गा चौक, विजयनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. राजू हा त्याच्या घरूनच सुगंधित तंबाखू, गुटखा आणि खरार्चीी विक्री करीत असल्याची माहिती पेलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर शुक्रवारी रात्री पोलिसांनी त्याच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये घरच्या पहिल्या माळ्यावरील खोलीत विविध कंपन्यांचा तंबाखू, गुटखा, खर्रा बनविण्याची मशीन आणि कापलेल्या सुपारीसह 63,250 रुपयांचा माल मिळाला. राजूविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

# सभापती प्रा.राम शिंदे यांचा सकल धनगर समाजाच्या वतीने सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

सकल धनगर समाज विदर्भ या बॅंनर खाली धनगर समाज महासंघ, धनगर युवक मंडळ, धनगर अधिकारी कर्मचारी संघटना म. रा. अहिल्यादेवी स्मृती स्मारक समिती, अहिल्यादेवी होळकर महिला मंडळ, धनगर संघर्ष समिती, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्थापना मंडळ झिंगाबाई टाकळी नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने व इतर सामाजिक संघटनेच्या सहकायार्ने रविवार २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता रविभवन कॉटेज क्रमांक १८ येथे नामदार प्रा.राम शिंदे यांची विधानपरिषद सभापती पदावर एकमताने निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी मंचावर सकल धनगर समाजाचे मुख्य समन्वयक पुरुषोत्तम डाखोळे, अमरावती विभाग समन्वयक ॲड. दिलीप एडतकर, धनगर युवक मंडळाचे अध्यक्ष रमेश पाटील, धनगर अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिलकुमार ढोले, अहिल्यादेवी स्मृती स्मारक समितीचे महादेव पातोंड उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरुषोत्तम डाखोळे यांनी तर संचालन रामचंद्र चुकांबे यांनी केले.यावेळी प्रा.राम शिंदे यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगीतले की ज्या समाजाने मला मोठे केले. त्या समाजाला सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्थापना मंडळ झिंगाबाई टाकळी नागपूरचे विलास डाखोळे, रामचंद्र चुकांबे, शिक्षक यशवंत कातरे, ज्ञानेश्वर बांबल, लिलाधार वैद्य, जयंत डहाके, जगदीश शेकार, विजय निगोट, संदेश शिरपूरकर, देवेंद्र टेकाडे, विकास सरोदे, रामकृष्ण भक्ते, श्रीमती अनुराधा थोटे, सिमा कश्यप , नेहा निगोट यांनी पुष्पगुच्छ देऊन सभापती प्रा. रामशिंदें यांचा सत्कार केला.

# लाव्हयात रासेयो शिबिराचा समारोप



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

लाव्हा येथे मनोरमा मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचा राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप पार पडला. राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर १५ ते २१ डिसेंबर दरम्यान होते.

शिबिर 'युथ फॉर भारत आणि युथ फॉर डिजिटल साक्षरता' या थीमवर केंद्रित होते. शिबिरादरम्यान विविध कार्यक्रम आणि उपक्रम या थीमवर प्रतिबिंबित करण्यात आले.

कार्यक्रमाला रासेयो अधिकारी डॉ. सीम बुरेले, समन्वयक वास्तुकार वैजयंती यादव, सरपंच ज्योत्स्ना नितनवरे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुजित नितनवरे, उपसरपंच रॉबिन शेलारे उपस्थित होते. स्वयंसेवकांनी डिजिटल साक्षरतेवर लक्ष केंद्रित केलेल्या उपक्रमांसह अनेक सामुदायिक सेवा उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. 'राष्ट्रीय अभिमान' या विषयावर स्वयंसेवकांनी सांस्कृतिक सादरीकरण केले.

प्रदेशातील समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि विविधता दर्शविते. डॉ. सीमा बुरेले आणि वास्तुकार वैजयंती यादव, डॉ. अविनाश देशमुख, नंदा राठी, प्राचार्य डॉ. प्रतिमा ढोके यांच्यासह व्यवस्थापन मंडळाचे आभार मानले.

सरपंच ज्योत्स्ना नितनवरे यांनी स्वयंसेवकांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांना सामुदायिक सेवा, समर्पण आणि स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय होण्यास प्रोत्साहित केले.

# रायझिंग स्टार्समध्ये 'एकतेचे महत्त्व'

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

मुलांमध्ये काही टॅलेंट असेल तर त्यांनी या व्यासपीठावर येऊन ती वाढवावी. त्यामुळे त्यांच्यात धैर्य आणि आत्मविश्वास वाढेल. इथे त्याच्या कलेला उत्तेजनासोबतच समाधानही मिळते. आता येणाऱ्या नव्या शैक्षणिक धोरणात अभ्यासाबरोबरच विविध क्षेत्रातील विकासकामांनाही महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे या व्यासपीठाची उपयुक्तता आणखी वाढते. व्हीएमव्ही कॉलेजच्या असोसिएट प्रोफेसर डॉ. सरिता राजेश करंगुटकर यांनी हे विचार मुले आणि त्यांच्या पालकांसमोर मांडले.

नवोदित कलागुणांना वाव देण्यासाठी 'उभारते सितारे' हा विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा लोकप्रिय उपक्रम आहे. त्याअंतर्गत 'एकतेचे महत्त्व' या विषयावर मनोरंजक आणि माहितीपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून प्रा. डॉ.सरिता राजेश करंगुटकर उपस्थित होते. संयोजक युवराज चौधरी व सहसंयोजक वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक युवराज चौधरी यांनी केले. ज्यामध्ये त्यांनी छोट्या छोट्या उदाहरणांद्वारे एकतेचे महत्त्व समजावून सांगितले.



यावेळी प्रशांत शंभरकर यांनीही कौटुंबिक एकतेवर आपले विचार मांडत पक्षी जाळीचे उदाहरण देऊन विषय विशद केला.

त्यानंतर मुलांनीही या विषयावर आपले विचार, नृत्य आणि गाण्याने सर्वांची मने जिंकली. ज्यामध्ये भव्य अरोरा यांनी एकता या विषयावरील उत्कृष्ट कविता वाचून सर्वांना भावूक केले. आर्या संदीप भोंगाडे यांनी आपल्या स्टॅंडिंग कॉमेडीने सर्वांना हसवले आणि संदेशही दिला. गौरी उधाडे, श्री बागल, खुशबू दुपारे आदींनी शानदार नृत्य केले. राम बागल आणि भव्य अरोरा यांनी सुंदर गाणी सादर केली.

हुशार मुलांच्या सादरीकरणाला पालकांनी तसेच वेदप्रकाश अरोरा, श्याम उधाडे, आर सी महतो, दीपक भावे, मीनाक्षी केसरवाणी, सीमा लुहा, प्रीती अभिजीत बागल, प्रज्ञा वेंगुर्लेकर, संदीप भोंगाडे, नरेंद्र दुपारे, बाबा खान आदींनी भरभरून दाद दिली. प्रशांत शंभरकर यांनी कार्यक्रमात सहकार्य केले. कार्यक्रमाचे कुशल संचालन सहसंयोजक वैशाली मदारे यांनी केले. आणि, संयोजक युवराज चौधरी यांनी उपस्थित सर्व प्रेक्षक, पालक आणि कलाकारांचे आभार मानले.

# बालदरबार बाल नाट्य स्पर्धेचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

भवन्स, सिव्हिल लाईन्सतर्फे नुकत्याच आटोपलेल्या बालनाट्य स्पधेर्चा बक्षीस समारंभ पार पडला. बेलतरोडीच्या स्कूल ऑफ स्कॉलर्सला तिसरा क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या शाळेतर्फे हॅशटॅग आमचे स्टेटसनाटक सादर करण्यात आले होते. मोबाईलच्या जमान्यात स्कॅम होणे, छायाचित्राचा दुरुपयोग होणे व सायबर गुन्हे होत असल्याचे या नाटकाच्या एक चांगला संदेश देण्यात आला.

## सत्तरीपार तरूण निघाले भारत भ्रमणाला

**नागपूर :** फेडरेशन ऑफ इंडियन रेशनलिस्ट असोसिएशनचे १३ वे राष्ट्रीय अधिवेशन त्रिचनापल्ली येथे २८,२९ डिसेंबरला होत आहे. यासाठी 'विज्ञान दृष्टिकोण' हा विषय घेवून पंजाब तर्कशील सोसायटीचे महामंत्री, ॲड. हरिंदर लाली,आणि हरियाणाचे तर्कशास्त्री डॉ.राजाराम हंडियाया बाईकने त्रिचनापल्लीला निघालेले आहेत. सत्तरी गाठलेले हे दोघे दोन वेगवेगळ्या बाईकवर तिरंगा ध्वज लावून सोबत स्वयंपाकाचे साहित्य घेवून निघालेले आहेत. या दोन तरूणांचे स्वागत अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय महासचिव, हरीश देशमुख यांनी केले. स्वागताला उत्तर देतांना त्यांनी चला आपण त्रिचनापलीच्या अधिवेशनात भेटू असा आशावाद व्यक्त करीत निरोप घेतला. यावेळी शहर अध्यक्ष सुनील वंजारी, राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे, श्रीगुरूदेव युवामंच प्रवर्तक ज्ञानेश्वर रक्षक, श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे डॉ. शांतीदास लुंगे, डॉ. चंद्रकांत मेहर उपस्थित होते.

## भार्गव, श्रावणी व जयंतचा सुमद्र खाडी पोहण्याचा विक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

साहसी सागर पोहण्याच्या शर्यतीत यश संपादन केल्याबद्दल जलतरणपटू कृष्णप्रकाश (आयपीएस), भार्गव मोकादम, श्रावणी गर्जे व जयंत दुबळे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी नुकत्याच मुंबईत राजभवन ते बीच समुद्रातील (खाडी) हे २२ किमी अंतर ५ तास ५७ मिनिटात पोहून पूर्ण केले. रविवारी सकाळी ७.४८ ला सुरू केलेल्या या मिशनला त्यांनी दुपाकी १.४५ वाजता सतत पोहत पूर्ण केले. यापैकी तीन जलतरणपटूंना यापूवीर्चा अनुभव नसला तरी हे मिशन यशस्वी केले. या साहसी पोहण्याचा त्यांचा मोटो मुख्यत्वे समुद्रातील स्वच्छता, होत असलेल्या समुद्री प्रदुषण हा होता. समुद्र जलतरणाचे प्रशिक्षक डॉ.जयप्रकाश दुबळे यांनी ६ महिन्यांपासून जलतरणपटूंची यासाठी तयारी घेतली होती. महाराष्ट्र स्विमिंग असोसिएशनचे सुशील दुरुगकर व अरुण भुते यांनी बोटीवरून या मिशनचे संपूर्ण निरिक्षण केले. रद्धेल्लॅ शूिुङ्गशू नागपूरच्या फायर ऑफिसचे अधिकारी चंद्रशेखर जाधव व मुंबईतील वरिष्ठ अधिकारी यांनी संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. बाबी डॉ. ऐश्वर्या दुबळे व प्राजक्ता दुबळे यांनी सांभाळले. बोटीमध्ये वेदप्रकाश मोकदम व विवेक गडीकर उपस्थित होते. नागपूरचे जलतरण प्रशिक्षक डॉ. संभाजी भोसले यांनी चमूचे अभिनंदन केले आहे.

# माजी मुख्याध्यापिका स्नेहल शंभरकर यांनी केला मोठा घोटाळा

## चौकशी करून निलंबित करण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २४ :

समाज कल्याण विभागाच्या बार्टीच्या अनुदानावर सुरू असलेल्या सफाई कामगारांच्या मुलामुलींच्या निवासी शाळेत अजब गजब कारभार पाहायला मिळत आहे. सन २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीत शालेय विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील बोगस कारभार उघडकीस आल्यानंतर आमच्या प्रतिनिधींनी दूरध्वनीद्वारे सफाई कामगारांच्या शाळेतील हल्लीच्या कर्मचाऱ्यांना विचारपूस केली असता या प्रकरणात माजी मुख्याध्यापिका या जबाबदार आहेत अशी माहिती मिळाली.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अगोदर भोजनपुरवठादार हे सुद्धा माजी मुख्याध्यापिका स्नेहल शंभरकर यांच्या इशाऱ्यानुसार नाचत होत्या. भोजन पुरवठाधारक ही एक महिला असल्याने त्यांनी एकमेकांशी घट्ट मैत्री जमवली होती तसेच विद्यार्थ्यांच्या भोजन देयकात अधिकची हजेरी लावून देयकामध्ये बेकायदेशीर वाढ करून द्यायची, बिल काढायची त्यात माजी मुख्याध्यापिकेचा वाटा असायचा अशी माहिती मिळाली आहे. ज्या अर्थी शासन निर्णयाप्रमाणे या वसतिगृहात प्रवेश द्यायला पाहिजे होता.मात्र त्या उलट प्रवेश नियमाची पायमल्ली करत मुजोरबाई स्नेहल शंभरकर हिने आपल्या पदाचा गैरवापर करत आपल्या इच्छेप्रमाणे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र नसतानांही बोगस विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. त्यामुळे प्रवेशीत विद्यार्थी संख्या वाढली व भोजन पुरवठादाराला अधिकचा लाभ मिळू लागला.

माजी मुख्याध्यापिका स्नेहल शंभरकर एवढ्यावरच थांबली नाही तर ती दर रविवार भोजनपुरवठा धारकांकडून मुलांच्या भोजनातील मटनाची भाजी घरपोच पार्सल मागवायची व रविवारी मस्त पार्टी एन्जॉय करायची. कधी कधी पार्टीत समाजकल्याण विभागातील काही कर्मचारी सुद्धा हजेरी लावायचे अशी माहीती मिळालेली आहे. यावरून हे लक्षात येते की,ही बाई अगदी किती छपरी मुलासारखी वागायची. या प्रकरणाची चौकशी सखोलरित्या व्हावी अशी मागणी कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष तुषार गायकवाड यांनी समाज कल्याण आयुक्त यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे.

# आदित्व टेक्नॉलॉजी नागपूरतर्फे केडीकेसीई बीसीए विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स (बीसीए) च्या विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट लाइफ सायकल (एसडीएलसी) चे सखोल ज्ञान प्रदान करण्याच्या उद्देशाने 20 ते 21 डिसेंबर 2024 रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पियुष बनिक आदित्व टेक्नॉलॉजीज नागपूरच्या अनुभवी आयटी व्यावसायिकांनी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत नियोजन आणि डिझाइनपासून अंमलबजावणी आणि




देखभालीपर्यंत सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन विकसित करण्याच्या विविध टप्प्यांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी माऊंडेकर व प्रा. लीना राऊत यांनी केले. डॉ. व्हॅल्सन वर्गीस, प्राचार्य, डॉ. ए. एम. बदर, उप-प्राचार्य, डॉ. अनुप भांगे एचओडी यांनी कामाचे कौतुक केले. राजेंद्र बी. मुळक, सचिव, बीसीवायआरसी आणि मा. श्री. यशराज आर. मुळक, खजिनदार, बीसीवायआरसी यांनी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विभागाचे कौतुक केले.

# क्रिएटिव्ह रायटिंग कार्यशाळेचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

'केमिस्ट्री' जुळली की नाटक चांगलं होतं, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सोमवार, दि. १८ डिसेंबर रोजी 'क्रिएटिव्ह रायटिंग' कार्यशाळेचा समारोप पार पडला. विद्यापीठाचा ललित कला व छंद मंदिर विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने ३ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन ललित कला विभागात करण्यात आले होते.

यावेळी डॉ. काकडे मार्गदर्शन करीत होते. समारोपिय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी भूषविले. यावेळी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त



चित्रपटाचे लेखक उमेश कुलकर्णी लेखक, दिग्दर्शक व कलावंत जयंत गाडेकर, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, ललित कला व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. काकडे यांनी अंगावर शहरे येथील असे लिखाण असण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक मनुष्य हा विश्लेषक असून चुकांना कसे कमी करता येईल, याचे सूक्ष्म नियोजन आपण रचनात्मक लेखकांनी करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

लिखाणाकरिता देखील सराव महत्वपूर्ण आहे सरावाशिवाय कोणतीही गोष्ट पूर्णत्वास येऊ शकत नाही, कार्यशाळेचे आयोजन करीत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना चित्रपट कथानक लेखनासाठी प्रोत्साहित केल्याने त्यांनी विभागाचे अभिनंदन केले. एक चांगला मनुष्य निर्माण व्हावा म्हणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम अंतर्भूत करण्यात आला आहे. त्याकरिता शिक्षकांनी मुलांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

प्रमुख अतिथी उमेश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करताना जगण्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक गोष्टीचा प्रत्येक क्षण अवलोकन करावा लागतो. शिवाय सरावाशिवाय कथानक लिहिणे शक्य नाही, लिखाण करायचे असेल तर लिहित रहावे लागेल, असे ते म्हणाले.

यावेळी कार्यशाळेतील विद्यार्थी निखिल टोंगळे यांनी आपले अनुभव व्यक्त केले. प्रास्ताविक करताना ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी ३ दिवस आयोजित कार्यशाळेतील विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख अतिथींच्या हस्ते आयोजक हर्षद सालपे, पियुष धुमकेकर, विजय जथे यांचे प्रमाणपत्र देत सत्कार करण्यात आला.

सोबतच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# द्रुगधामन्यात जागतिक ध्यान दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

द्रुगधामना येथील उदय फिजिओथेरेपी मेडिकल कॉलेज, श्री साई ताज पॉलीटेक्नीक व पार्श्वनाथ पब्लीक स्कूल यांच्या संयूक्त विद्यमाने जागतीक ध्यान दिवस संस्थेचे संचालक उदय टेकाडे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. उद्घाटक सायकोथेरेपी पिस्ट डॉ. शबिना शेख यांनी केले. प्रमुख पाहूणे म्हणून रीत सरोहा उपस्थित होत्या. सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पुजन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुप्रिया तांबे यांनी केले.संचालन मुख्याध्यापिका अन्नू पाल यांनी तर आभार प्रा. दिपा चौरसिया यांनी मानले.आयोजनासाठी मौलिका पाटील, साक्षी मदनकर, रीया कोहले, अलिशा नाज, ओंकार मडावी, सत्यम मदने ,प्रा. निधी गोसावी, प्रा. ज्योती वंजारी, प्रा. ज्ञानेश्वर नाडेकर, शिक्षिका सुजाता गुरवे, रूपाली इंगळे आदींनी सहकार्य केले.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थी बनले वैज्ञानिक

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन व विज्ञान विषयाची रुची निर्माण करण्यासाठी दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये असलेले अंगभूत सुप्त गुण व कल्पकतेला वाव मिळावा हा त्यामागचा मुख्य उद्देश असतो.




त्या अनुषंगाने नागपूर पचायत समीती शिक्षण विभागातर्फे सत्य साई कॉन्व्हेंट, नरसाळा येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनामध्ये नागपूर ग्रामीण तहसील अंतर्गत एकूण ९० शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा सहायक, परिचर यांनी आपला वैज्ञानिक प्रयोग व प्रतिकृती मांडून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उद्घाटन नागपूर पं. स. सभापती रुपाली मनोहर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून पं.स. सदस्य शुभांगी गायधने, संजय खंडाळे, रेवतकर, श्रुती धनंजय, सुषमा चरपे, गट शिक्षणाधिकारी आरती साळुंखे, पौर्णिमा येरपुरवार, गट विस्तार अधिकारी नारायण चाफले, रश्मी शेख, रश्मी वाटाने, संघपाळे, मेश्राम, स्नेहल बांगरे, ढोले, झिले, पालवे, नागपुरे आदी उपस्थित होते.

यात उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी गटातील विद्यार्थ्यांचे ६६, माध्यमिक (९ वी ते १२ वी) गटातील विद्यार्थ्यांचे २३ व प्राथमिक शिक्षक गटातील १०, माध्यमिक शिक्षक गटातील ३ व प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर गटातील २ प्रतिकृती प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. प्रास्ताविक नागपूर ग्रामीण पं. स. शिक्षण विस्तार अधिकारी नारायण चापफले यांनी केले. संचालन आकाश टाले यांनी केले.

तर आभार यांनी मानले.प्रथम तीन विजेत्यांचा पुरस्कार देऊन गौरव विद्यार्थी व शिक्षकांनी प्रस्तुत केलेल्या विज्ञान प्रकल्प व प्रतिकृतींचे मूल्यमापन विज्ञान शिक्षिका आरती भोरे ( घोडे ),डॉ. वर्षा घारपुरे, आशा बावणकर, यांनी केले. विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यात माध्यमिक शिक्षक गटातून भारती निस्ताने (सरस्वती विद्यालय, वाडी), प्राथमिक शिक्षक गटातून रंजना सोनवाने (जि. प. शाळा बोखारा), व प्रयोगशाळा सहायक परिचर गटातून देवराव वासेकर (विद्यार्थी विकास विद्यालय धामना) यांना प्रथम क्रमांक मिळाला. माध्यमिक विद्यार्थी गटातून प्रथम आदित्य राऊत (विमलताई तिडके विद्यालय वाडी), द्वितीय अनन्य ताजनेकर (श्री सत्य साई कॉन्व्हेंट नरसाळा) व तृतीय शौर्य खुळे (भवन्स विद्या मंदिर), तसेच प्राथमिक विद्यार्थी गटातून प्रथम सोनम बागडे , द्वितीय मायरा फैजल (भगवानदास पुरोहित विद्या मंदिर, आष्टी) व तृतीय अंशू टेकाम (जि. प. शाळा, जामठा) यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाच्या आरपीएफचे यशस्वी ऑपरेशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूर रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) नियंत्रण कक्षाला चार संशयित व्यक्तींबद्दल माहिती मिळाली, जे चोरीच्या प्रकरणात सहभागी होते. ते ट्रेन नंबर १२६२५ मधून प्रवास करत होते,ही ट्रेन पुदुमंड पोलिस स्टेशनमध्ये १९ डिसेंबर २०२४ रोजी दाखल केलेल्या गुन्हा क्र. ९३/२०२४ शी संबंधित होती.संबंधित माहिती फोटोसह आरपीएफ नागपूर युनिटला पाठवली गेली.



माहिती मिळताच, निरीक्षक सत्येन्द्र यादव (नागपूर) यांच्या नेतृत्वाखालील एक समन्वयित शोध मोहिम सुरू करण्यात आली. ज्यात इतर अधिकारी आणि कर्मचारी समाविष्ट होते.संबंधित ट्रेन नागपूर रेल्वे स्थानकावर सुमारे २१:४५ वाजता पोहोचल्यावर, निरीक्षक सत्येन्द्र यादव (नागपूर) यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण ट्रेनची तपासणी करण्यात आली. चारही संशयित व्यक्तीना र-६ कोचमधून अटक करण्यात आले. चौकशी केल्यानंतर, त्यांनी आपली अशी नावे सांगितली: १) अनीता ईश्वर गोंड (३८ वर्ष), २) ईश्वर सिंह गोंड (४३ वर्ष), ३) अभय गोंड (१९ वर्ष), ४) अंकित सिंह (१८ वर्ष) हे सर्व छत्तीसगढचे रहिवासी आहेत. संशयितांकडे एक पिस्ता रंगाची ट्रॉली बैग होती.ज्यामध्ये चोरी केलेले सोने आणि चांदीचे दागिने, कृत्रिम आभूषण आणि १९,२६५ रुपये नगद सापडले. या सापडलेल्या सामानात हार, बिछुए, बांगड्या, कानातले, अंगठ्या, नाणी आणि नगद रक्कम यांचा समावेश होता,ज्याची एकूण किंमत रुपये ४.८२ लाख आहे.

चोरीचा माल पुदुमंड पोलिस स्टेशन, नीलगिरी जिल्हा, तमिळनाडू यांना पुढील कारवाईसाठी सोपविला गेला. हे यशस्वी ऑपरेशन आरपीएफच्या सतर्कतेची आणि गुन्ह्यांच्या विरोधात केलेल्या प्रभावी कारवाईचे उत्तम उदाहरण आहे, जे रेल्वे मार्गांवर सुरक्षा सुनिश्चित करते.

# स्व. मातादिनलालजी जैस्वाल शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

दाभा येथील साईनगर मधील स्व. मातादिनलालजी जैस्वाल शाळेत माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख पाहूणे म्हणून श्री विश्वनाथबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जैस्वाल, स्व. मातादिनलालजी जैस्वाल संस्थेचे अध्यक्ष राजेश जैस्वाल, सचिव जयकिशोर जैस्वाल मराठी माध्यमचे मुख्याध्यापक बंडूजी जैस्वाल, प्रेमनाथ झाडे, संतोष नरवाडे, गणपत रागीट,अशोक माने, श्याम मंडपे, निळकंठ रासेकर, पंकज जैस्वाल, सुरेंद्र मोरे, सोनू चरडे उपस्थित होते.

सर्वप्रथम रमेशचंद्र बंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी शाळेतील नर्सरी ते वर्ग ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले. मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर नाटिकेच्या माध्यमातून जनजागृती केली. मुख्याध्यापिका नेहा वासाडे उपमुख्याध्यापिका सुधा बांगर यांच्या मार्गदर्शनात प्रास्ताविक कल्याणी पाल यांनी केले.

# युवा ग्रामीण पत्रकार संघाचे ६ जानेवारीला राष्ट्रीय अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यातच ६ जानेवारी २०२५ ला पत्रकार दिनी विदभार्तील नागपूर शहरात युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय स्तरावरील भव्य अधिवेशन आयोजीत करण्यात आले असून या संदभार्तील माहिती देण्यासाठी, पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांशी व सदस्यांशी भेटीगाठी घेण्याच्या दृष्टिकोनातून युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार हे चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येऊन गेले. यावेळी त्यांचेसोबत विदर्भ पदाधिकारी विनोद कन्नाके होते. या भव्य स्वरूपात होणाऱ्या अधिवेशनात राज्यभरातून युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन चंद्रपूर येथील शासकीय विश्राम गृहात युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या आयोजित बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे. बैठकीत उपस्थित जिलाध्यक्ष सतीश आकुलवार, विदर्भ महिला आघाडी सचिव जर्नलिस्ट माधुरी कटकोजवार, नासिर खान, राहुल गायकवाड, कृष्णा चव्हाण, दीपक बेरशेट्टीवार, बरडे, शेंडे आदी पदाधिकारी व इतर पत्रकारांची उपस्थिती होती.

# झुलेलाल रनर्स अकादमीची किडॅथॉन २९ रोजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

झुलेलाल रनर्स अकादमीतर्फे ४थी किडॅथॉन उत्तर नागपुरात रविवार, २९ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. जरिपटकातील झुलेलाल स्पोर्ट्स मैदान, पिरॅमिड सिटीजवळ ही स्पर्धा सुरू होणार आहे. ५ ते १५ वर्षाआतील मुला-मुलींसाठी ही स्पर्धा असून विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात येतील. शनिवारी २८ डिसेंबरला चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य तीन बक्षिसांशिवाय उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येईल.

## निधन

### आनंद चकोले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

स्व. आनंदराव चकोले यांच निधन वय (९७) ४५, राजाबाक्षा नागपूर येथील रहिवासी आनंदराव रावजी चकोले यांचे सोमवार दि. 23 डिसेंबर २०२४ रोजी हृदय विकाराने दुःख निधन झाले. त्यांचेअंतिम संस्कार मोक्षधाम घाटावर करण्यात आले. त्यांच्या पश्चात खुप मोठा आप्त परिवार आहे. सुप्रसिद्ध कलावंत चंद्रकांत चकोले यांचे वडिल होते.



### लक्ष्मण म्हस्की

नागपूर : स्व.लक्ष्मणराव तुकाराम म्हस्की, वय ९२, रा.५३२ हनुमान नगर नागपूर यांचे सोमवार दि.२३ ला निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा तीन मूली आणि बराच मोठा आप्तपरीवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दि. २४ डिसेंबरला सकाळी ११ वा. मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# बुटीबोरीच्या केमटेक कंपनीत मशिनमध्ये चिरडून दोन कामगारांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसीमध्ये असलेल्या केमटेक कंपनीत भीषण अपघात झाला आहे. जिथे मशीनखाली चिरडून दोन मजुरांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच मदतकार्य सुरू झाले असून सर्वांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. जिथे दोघांना मृत घोषित करण्यात आले. एकावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर येथे केमटेक इंडिया नावाची कंपनी कॅल्शियम पावडर बनवते. ही घटना घडली त्यावेळी कंपनीत त्यांच्या शिफ्टमध्ये 10 कामगार काम करत होते. त्यानंतर अचानक मशिनचा शाफ्ट तुटल्याने मशिनच्या खालच्या भागात काम करणाऱ्या कामगारांना त्याचा फटका बसला. शाफ्टचा एक तुकडा दोन कामगारांवर पडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दोन्ही मजूर गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मेघे कुटुंबियांच्या निवासस्थानी सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर प्रथमच आमदार समीर मेघे यांच्या खामला येथील निवासस्थानी भेट दिली. या ऐतिहासिक क्षणी माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते दत्ताजी मेघे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे पुष्पगुच्छ, शाल आणि श्रीफळ देवून औपचारिक स्वागत केले. या प्रसंगी त्यांनी मुख्यमंत्र्यांना विशेष भेटवस्तू सुद्धा प्रदान केली.



मुख्यमंत्र्यांनी दत्ता मेघे यांच्या तब्येतीची विचारपूस करत त्यांच्या आरोग्यासंबंधी काळजी व्यक्त केली. ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी राज्याचे राज्यमंत्री पंकज भोयर, हिंगणा विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर मेघे, नागपूर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंगणा विधानसभा क्षेत्रातील विकास कामांवर चर्चा केली. स्थानिक पातळीवरील प्रकल्प आणि योजनांबद्दल सविस्तर माहिती घेत त्यांनी पुढील विकासकार्यांसाठी सकारात्मक आश्वासन दिले. समीर मेघे यांनी मुख्यमंत्र्यांच्या या भेटीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत हिंगणा मतदारसंघासाठी पुढील काळात शासनाकडून अपेक्षित सहकार्याबद्दल विश्वास व्यक्त केला.

# ऑन द स्पॉट चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

छोटया मुलांनी काढलेल्या प्रत्येक चित्रातील भाव सहजभावनेने ओळखा, असे चित्र मनापासून मुलांच्या मनातील विविध कल्पना सहजरित्या ओळखता येईल. मुख्यतः मुलांच्या चुका काढणे सोडा म्हणजे मुलांना सांभाळणे सोपे होईल, असे स्पष्ट प्रतिपादन बसोली ग्रुपचे अध्यक्ष, चंद्रकांत चन्ने यांनी केले. लोकमाता श्रध्देय ताई सुकळीकर स्मृती ऑन द स्पॉट बालचित्रकला स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर प्रसिध्द शेफ विष्णू मनोहर, जगदीश सुकळीकर, मीरा खडक्कार व प्रशांत देशपांडे उपस्थित होते.



योग्य संस्कार करण्याचे काम बालजगतचे मुलांच्या हातात मोबाईल ऐवजी जेव्हा रंगाचा ब्रश येतो, तेव्हा मनातील विविध कल्पना चित्रात साकारलेल्या दिसून येतात. तसेच योग्य वयात योग्य संस्कार करण्याचे काम बालजगतच्या माध्यमातून आज होत असल्याचा विश्वास विष्णू मनोहर यांनी व्यक्त केला. पुरस्कार विद्यार्थ्यांमध्ये शौर्य सिंगम, अव्दैत भांडारकर, राधा बागेकर, यथार्थ मोहीते, अमृत रेठे, रस्मा मेलगंडी, अपूर्वा भदे, अरोही वाघमारे, समृध्दी कवाळे, अनन्या रिघे, रुषांक ताजणे, रोमित गावंडे, स्वरा बांगर, अंश पंचभाई, शिखर बाजपेयी, साई कडू, वामिका वाघाये यांचा समावेश होता. विजेत्यांना विष्णू मनोहर, जगदीश सुकळीकर, मीरा खडक्कार व चंद्रकांत चन्ने यांच्या पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन गौरी सरनाईक आभार प्रशांत देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक काशिकर, प्रशांत अत्रे, सतिश बेलवलकर, निकीता लुटे, नम्रता पिंपळखुटे,अशोक काशिकर, संध्या मुळावकर,अंजली साठे, साईली जतकर, रेखा मुडे आदींनी परिश्रम घेतले.

# ३.४२ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

कुटुंब देवदर्शनासाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 3 लाख 42 हजार 500 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी आदित्य शांताराम झोपे (32) रा. पूजानगर, वाठोडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 11 डिसेंबर रोजी झोपे कुटुंब नाशिकच्या शिर्डी येथे देव दर्शनासाठी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख 9 हजार व सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 3,42,500 रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. 17 डिसेंबरला झोपे कुटुंब घरी परतले असता दाराचे कुलूप तुटलेले दिसले. घरात जाऊन पाहिले असता कपाटातील सर्व सामान विखुरलेले होते आणि दागिने व रोकड गायब होती. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. प्राथमिक तपासानंतर वाठोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# जलसमस्या जागरूकतेसाठी परीक्षेचे १ फेब्रुवारी रोजी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

पाण्याची समस्या भेडसावत चालली आहे. आगामी काळात पाण्याचा तुटवडा पाहता या समस्येचे निराकरण करायचे असल्यास घराघरातून वॉटर एक्सपर्ट तयार होणे ही काळाची गरज आहे. हीच गरज ओळखून नटराज निकेतन संस्थेने १ फेब्रुवारी रोजी आणि उपायांविषयी सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी परीक्षेचे आयोजन केले असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा मंगला पात्रीकर व मुकुंद पात्रीकर यांनी पत्रपरिषदेत दिली. पाणी हे जीवन आहे, परंतु असूनही सामान्य जनतेत जलसमस्या आणि त्यांच्या उपायांविषयी पुरेशी जागरुकता नाही. जलसमस्या आणि उपायांविषयी सामाजिक जागरूकता आणि करिअर निर्माण करण्यासाठी या परीक्षेचे आयोजन केले विद्यार्थ्यांना तसेच इतर सर्वांना परीक्षेसाठी प्रवेश नोंदणी संस्थेच्या वेबसाईटवर करता येईल.

परीक्षेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येकासाठी नोंदणी करणे हे गरजेचे आहे. परीक्षा नोंदणीची अंतिम तारीख १५ जानेवारी २०२५ आहे. पत्रपरिषदेत मधुरा व्यास, मधुलिका जगदळे, डॉ. उज्वल गजबे, गार्गी पात्रीकर, निखिल व्यास, अदिती सारवे, आकाश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ८९ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (24) रोजी शोध पथकाने 89 प्रकरणांची नोंद करून 39,700/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 31 प्रकरणांची नोंद करून 12,400/- रुपयांची वसुली करण्यात आली.





व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 200 रुपयांची वसुली करण्यात आली.

दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 1,600/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 14 प्रकरणांची नोंद करून 11,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 29 प्रकरणांची नोंद करून 5,800/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 8 प्रकरणांची नोंद करून 8,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. बालाजी पाईल्स क्लिनीक यांनी मनपा यांच्या विरूध्द विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. तसेच मे. रॉयल बिल्डकॉन यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

हनुमान नगर झोन अंतर्गत मे. शिवचरण बिल्डर्स विधाता अपार्टमेंट यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

नेहरू नगर झोन अंतर्गत श्री. दिलीप कुमार अग्रवाल यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. उपद्रव शोध पथकाने 4 प्रकरणांची नोंद करून रू. 30,000/- दंड वसूल केला.

# घरात घुसून लुटले, नागरिकांनी चोपले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

दिवसाढवळ्या घरात घुसून कुटुंबाला चाकूच्या धाकावर लुटून पळालेल्या आरोपीस वस्तीतील नागरिकांनी पकडून चांगला चोप दिला आणि नंतर पोलिसांच्या स्वाधिन केले. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी धनंजय गणेश पांडे (43) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. नीलेश सुधाकर पुरूषोत्तमवार (33) रा. रवींद्रनगर, बल्लारपूर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

धनंजय पांडे हे कुटुंबासह पारडीच्या दुर्गानगर परिसरात राहतात. सोमवारी दुपारी ते घरी असताना आरोपी नीलेश चुपचाप त्यांच्या घरात घुसला. पांडे कुटुंबाला चाकू दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. धनंजय यांनी विरोध केला असता आरोपीने चाकू मारून त्यांना जखमी केले आणि खिशातील 3.270 रुपये जबरीने हिसकावून पळ काढला. याच दरम्यान पांडे कुटुंबाने मदतीसाठी आरडा-ओरड केली. परिसरातील नागरिक मदतीला धावले. पाठलाग करून नीलेशला पकडण्यात आले. चांगला चोप दिल्यानंतर पोलिसांना सूचना देण्यात आली.

पारडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. नीलेशविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. सखोल चौकशीदरम्यान आरोपीने आणखी चार ठिकाणी असाच गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून लुटीचे 81,470 रुपये जप्त केले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# आरोग्य सेवा देताना दैनंदिन, मासिक, त्रैमासिक नियोजन करा: मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४:** आरोग्यविषयक सेवा देत असताना त्याचे दैनंदिन, मासिक आणि त्रैमासिक असे नियोजन करण्यात यावे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी दिले.



राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या जिल्हास्तरीय नियामक मंडळाची बैठक तसेच इतर आरोग्यविषयक योजना व उपक्रमांचा आढावा श्री. महामुनी यांनी घेतला, यावेळी ते बोलत होते. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना इत्यादी कार्यक्रमाचा आढावा घेण्यात येऊन शासन स्तरावरुन तसेच शासकीय निदेशार्नुसार सर्व कार्यवाही करण्यात यावीत. तसेच आरोग्य सेवा देत असताना जनतेशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवण्यात येऊन नाविण्यपुर्ण कार्यक्रम राबविण्यात यावेत. तसेच सेवा देत असतांना दैनंदिन, मासिक, त्रैमासिक याप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. जनतेचा सक्रिय सहभाग आरोग्य कार्यक्रमामध्ये घेण्यात यावा.

सर्व जनतेचे आभा कार्ड काढून घ्यावे तसेच शासनस्तरावरुन तसेच दवाखाना आपल्या दारी अंतर्गत दिल्या जाणा ?्या आरोग्य सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात श्री. महामुनी यांनी यावेळी केले.

आढावा बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजकुमार गहलोत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निवृत्ती राठोड,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.विद्यानंद गायकवाड, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.रेवती साबळे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.असिम इनामदार यांच्यासह आरोग्य यंत्रणेतील संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक तसेच जिल्हयातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

# मंदिर ट्रस्टच्या भूखंडावर अवैध ताबा

## तिघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** क्राईम रिपोर्टर. बनावट कागदपत्रांद्वारे एका व्यक्तीने दोन जणांसोबत मिळून अयोध्यानगरच्या लाडीकर लेआऊट येथील राम मंदिर ट्रस्टच्या भूखंडावर ताबा केला आणि परिसरात तोडफोड केली. तपासात बनावट कागदपत्रांच्या आधारावर जमीन बळकावल्याचे पुढे आले. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी विलास रामचंद्र लाडीकर (५०) रा. लाडीकर लेआऊटच्या तक्रारीवरून तीन जणांवर विविध कलमान्वये फसवणूक आणि अवैधरित्या अतिक्रमण केल्याचा गुन्हा नोंदविला आहे. विजय काशीनाथ बांगडे रा. मंगलधाम कॉलनी, भंडारा, राजेंद्र सीतराम देव रा. इंदिरानगर, जाटतरोडी आणि रामकृष्ण गणपत निनावे रा. सोमवारी क्वॉर्टर, रघुजीनगर अशी आरोपींची नावे आहेत.

विलास यांचे वडील रामचंद्र लाडीकर यांची अयोध्यानगरात जमीन होती. या लेआऊटच्या ८ भूखंडांवर राम मंदिर बनविण्यात आले. या मंदिराची देखभाल ट्रस्टच्या माध्यमातून केली जात असून त्याचे विश्वस्त विलास आहेत आणि सर्व अधिकार त्यांच्याजवळ आहेत. २३ फेब्रुवारी २०१८ रोजी बांगडे व इतर आरोपींनी मंदिर परिसरात तोडफोड करून अतिक्रमण केले. याबाबतचा फौजदारी खटला न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयाने अतिक्रमण आणि कोणत्याही प्रकारची हानी न करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यावर बांगडे याने ट्रस्टच्या ताब्यातील भूखंड क्र. २८ चे आममुख्त्यारपत्र अणि मृत्यूपत्र न्यायालयात सादर केले. विलास यांनी हे कागदपत्र पडताळून घेतले असता ते अधिकृत नसल्याचे समजले. बांगडे याला वास्तवात कोणतेही अधिकार देण्यात आले नव्हते. नियमानुसार ट्रस्टची जागा विकता येऊ शकत नाही. त्यानंतरही बांगडे याने देव आणि निनावे यांना साक्षीदार बनवले. कट रचून त्यांचे वडिलांच्या नावावर बोगस कागदपत्र तयार केले. जेव्हाकी त्यांचे वडील त्यावेळी उपस्थितच नव्हते. बांगडे आणि देव पूर्वी विलास यांच्या वडिलांच्या दुकानात काम करीत होते. त्यांचे वडील अर्धांगवायूच्या आजाराने ग्रस्त झाल्यानंतर आरोपींनी बोगसरित्या कागदपत्र तयार केले. वाईट सवयींमुळे विलास यांनी बांगडे आणि निनावे यांना कामावरून काढले होते. त्याचा बदला घेण्यासाठी दोघांनीही कट रचला. विलास यांनी कागदपत्रांसह हुडकेश्वर पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी प्राथमिक तपासानंतर आरोपींवर गुन्हा नोंदविला.

# श्री संत रविदास महाराज मित्रपरिवार नागपूर तर्फे चर्मकार समाज वधु-वर परिचय मेळावा नागपुरात



**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** श्री संत रविदास महाराज मित्रपरिवार नागपूर तर्फे दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत श्री संत रविदास सांस्कृतिक भवन हनुमान नगर मानेवाडा रोड नागपुर येथे आयोजित केला आहे या मेळाव्यामध्ये वधू-वर परिचय घेण्यात येईल व परीचय पुस्तिकेचे विमोचन होणार आहे तरी या करता खालील फोन नंबर ९९२२६६८३३७ वर संपर्क करावा वधुवरांचे बायोडाटा पाठवावेत व पुस्तके करता २०० रु. यासोबत पाठवावा.

ही नम्र विनंती तसेच या मेळाव्यामध्ये मोठे मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत त्यांच्या हस्त्या मेळावा पार पडणार आहे तरी आपणास या मेळाव्यात करिता जास्तीत जास्त मोठ्या संख्येत उपस्थित राहावे. अशी विनंती मेळाव्याचे आयोजक प्रेम (हितेश) मुंदाफळे यांनी आवाहन केले आहे.

# सोमलवारचा संस्थापक दिन समारोह २६ डिसेंबर रोजी

### सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रमुख उपस्थीती

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** सोमलवार शिक्षण संस्थेचा ७० वा संस्थापक दिन समारोह गुरुवार, २६ डिसेंबर २०२४ साजरा केला जात असून या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थति राहणार आहे. सोमलवार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, निकालस शाखेचे प्रांगण, खामला येथे सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल.



सोमलवार एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक स्व. जी. के. उर्फ अण्णासाहेब सोमलवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून डॉ. मोहनजी भागवत उपस्थतिांना संबोधित करतील. याच कार्यक्रमात ह्यअस्मायरह्न या प्रज्ञा शोध परीक्षेचे बक्षिस वितरणदेखील होणार आहे. या स्पर्धेत नागपुरातील ७९ नामांकित शाळांमधील २४००० हून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थति राहावे, असे आवाहन सोमलवार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. एम. एल. सोमलवार यांनी केले आहे.

# भाजपा कार्यकर्त्यांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार

### अटल बिहारी वाजपेयी यांची जन्मशताब्दी होणार साजरी



**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** विधानसभा निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळविल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आरूढ झाले. त्या प्रित्यर्थ त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम भाजप कार्यकर्त्यांकडून ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे आयोजित केलेला आहे.

२३ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि राज्यात भाजपाचे १३२ आमदार निवडून आले. व त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली व त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यांच्या या यशाला भाजप कार्यकर्त्यांकडून दजोरा देण्यासाठी व त्यांच्या पुढील प्रवासाला प्रेरणावजा शुभेच्छा देण्याकरिता देवेंद्र फडणवीस व विदभार्तील भाजपाच्या मंत्र्यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. हा कार्यक्रम २५ डिसेंबरला ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे संध्याकाळी पाच वाजता आयोजित केलेला आहे. २५ डिसेंबर ला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची जन्मशताब्दी आहे. त्यानिमित्ताने कवी असलेल्या अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितांचा कार्यक्रम सोबतच त्यांच्या कवितांवर आधारित नृत्य अविष्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती भाजपा महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय भेंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेत शहर अध्यक्ष बंटी कुकडे, जिल्हा अध्यक्ष सुधाकर कोहळे, मीडिया प्रभारी चंदन गोस्वामी, माजी नगरसेवक बाल्या बोरकर, नंदा जीचकार उपस्थित होते.

# लॉनमधून दागिन्यांची बॅग चोरी

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** क्राईम रिपोर्टर. लॉनमध्ये लग्न समारंभादरम्यान एका महिलेची सोन्याचे दागिने व रोकड असलेली बॅग अज्ञात आरोपीने चोरून नेली. बॅगमध्ये एकूण १ लाख ५२ हजार रुपयांचा माल होता. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी लक्ष्मण भगवान फड (६३) रा. इंदोर, मध्यप्रदेशच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.



लक्ष्मण यांच्या नातेवाईकाचे लग्न व र्धमान नगरातील सातवचन लॉन येथे आयोजित करण्यात आले होते. शुक्रवारी सकाळी ते कुटुंबासह लग्नात सामील होण्यासाठी लॉनमध्ये आले. लग्नासाठी तयार होत असताना लक्ष्मण यांच्या मुलीने तिचे सोन्याचे दागिने व रोख ५ हजार रुपये एका बॅगमध्ये ठेवले आणि पार्लरच्या कामात व्यस्त झाली. या दरम्यान अज्ञात आरोपीने तिच्या खोलीत प्रवेश केला आणि दागिन्यांची बॅग चोरून नेली.

तयारी झाल्यावर मुलीने दागिने घालण्यासाठी बॅग बघितली असता ती मिळून आली नाही. तिने घटनेची माहिती वडिलांना दिली. लकडगंज ठाण्यात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

लॉनमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून आरोपीचा सुगावा लावण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष (वारेंगाव शाखा) अनिल जोगी यांची ईडी व सीबीआयची सखोल चौकशीची मागणी

**कामठी तालुक्या अंतर्गत गट ग्रामपंचाय त वारेगाव गावाकडे शासनाचे दुर्लक्ष !**




**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४** :शाखा वारेगाव गट ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या वतीने गाव विकास कामासाठी शासनाकडून आलेला निधी यातील पैशाची अफरातपर होत आहे असा आरोप त्यांनी पत्र परिषदेत केला. या संदर्भात ईडी आणि सीबीआय द्वारा सखोल चौकशीची मागणी केली आहे. दरवर्षी एक करोड रुपये विकास कामासाठी येतो आहे. येत असतो हे सर्व लेखा विभाग नागपूर, लेखा विभाग मुंबई येथे नोंदच नाही. परंतु गट ग्रामपंचायत वारेगाव येथे मागणी करून सुद्धा आजपर्यंत काहीच रेकॉर्ड मिळाला नाही. संबंधित अधिकारी व पुढारी व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार व अतिक्रमण केल्याची माहिती पत्रपरिषदेत दिली. गाव कामासाठी शासनाकडून आलेल्या निधी च्या संदर्भात संविधानिक नियमाचे उल्लंघन करणा ?्या अधिकाऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत चाललेले आहे. कामठी तालुका अंतर्गत येणाऱ्या गट ग्रामपंचायत वारेगाव तालुका कामठी जिल्हा नागपूर येथे मागील १० ते १५ वषार्पासून गाव विकास कामासाठी औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा अंतर्गत अंशुदान कर निधी, अकृषक कर निधी, आमदार फंड निधी, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत निधी, दलित सुधार योजने अंतर्गत निधी, प्रधानमंत्री घरकुल योजना अंतर्गत निधी, गट ग्रामपंचायत अंतर्गत निधी, या सर्वच पैशाची अप्रातफर होत आहे. गाव कामासाठी कोणताच पैशा मार्गी लागत नाही. यावर शासनाने कठोर कारवाई करून अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी व वारेंगाव व गावं खेड्यांचा विकास करावा. ग्रामपंचायत ते मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर पर्यंत या सर्वांची साखळी तयार झालेली आहे. या सर्वांचा यामध्ये हात आहे व यावर कारवाई करण्यात यावी. आज पर्यंत चौकशी व कारवाई बसलेली नाही आणि झालेली सुद्धा नाही.

# महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४मध्ये बहुविध संधी: सीए जुल्फेश शाह

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** नागपूर २२ डिसेंबर २०२४: या वर्षीच्या १८ जुलै २०२४ पासून लागू झालेल्या आणि वर्षांसाठी वैध असलेल्या महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ मध्ये विविध उद्योग आणि उद्योजकांसाठी आकर्षक आर्थिक आणि गैर-आर्थिक प्रोत्साहनांसह अनेक बहुविध संधी असल्याचे प्रतिपादन सीओएसआयए विदभार्चे अध्यक्ष सीए जुल्फेश शाह यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनने चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे आयोजित केलेल्या एका सत्रात बोलताना, त्यांनी राज्याच्या पर्यटन परिदृश्याचा कायापालट करण्या ?या धोरणाच्या संभाव्यतेबद्दल माहिती दिली. सीए जुल्फेश शाह यांनी त्यांच्या सादरीकरणात धोरणामुळे अपेक्षित असलेल्या महत्त्वपूर्ण आर्थिक परिणामांवर प्रकाश टाकला.




हे धोरण स्थानिक व्यवसायांमध्ये वाढ, हस्तकलेला प्रोत्साहन आणि दुर्गम भागात पायाभूत सुविधा वाढविण्याची खात्री देते. परिणामी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती आणि महसूल निर्मिती करणे शक्य होते. हे धोरण पर्यटन प्रकल्पांसाठी एकल-खिडकी मंजुरीद्वारे सुलभ मंजूरी देणे आणि पर्यावरणपूरक आणि वारसा प्रकल्पांना, तसेच आदरातिथ्य क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी कौशल्य विकास उपक्रमांना प्रोत्साहन देते. सार्वजनिक-खाजगी भागीदारी हा या धोरणाचा मुख्य फोकस असे सांगून यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटन प्रकल्पांमध्ये संयुक्त उपक्रमांसाठी संधी निर्माण होते असेशाह म्हणाले. सीए जुल्फेश शाह यांनीही महाराष्ट्राच्या विविध पर्यटन संधीवर भर दिला. राज्यातील भौगोलिक विविधता, समुद्रकिनारे, टेकड्या, जंगले आणि ऐतिहासिक किल्ल्यांसह, सांस्कृतिक समृद्धीसह यूनेसको जागतिक वारसा स्थळे याठिकाणी विविध विकासात्मक कामे करून पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे असे ते म्हणाले. धार्मिक पर्यटनात शिर्डी, शेगाव, जेजुरी, अष्टविनायक मंदिरे, रामटेक आणि पंढरपूर सारखी धार्मिक स्थळे दरवर्षी लाखो यात्रेकरूंना आकर्षित करतात असे ते म्हणाले.

ट्रेकिंग आणि वन्यजीव सफारीसह साहसी आणि इको-टूरिझम क्रियाकलाप वेगाने लोकप्रिय होत आहेत.

वेलनेस रिट्रीट, आयुर्वेदिक केंद्रे आणि पाककृती पर्यटन, प्रादेशिक पाककृती आणि वाइन पर्यटन यांच्या वाढत्या मागणीवरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन मरियम हुसैन यांनी केले तर सेशन इन्चार्ज शांतनू शेंडे होते.-

# व्यसनमुक्त धोरणाची अंमलबजावणी व्हावी

**महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर,दि. २४ :** महाराष्ट्र सरकारने स्वीकारलेले व्यसनमुक्ती धोरण २०११ ची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा निर्माण करून कार्यवाही करावी. तसेच व्यसनमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाने महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपूर येथे निदर्शने केली. मंचाच्या पुढाकाराने पंचशील चौक, मेहाडिया चौक, भोले पेट्रोल पंप चौकात मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली. प्रतिनिधीमार्फत सरकारला निवेदन देण्यात आले. यासंबंधी पत्रपरिषद झाली. यावेळी मंचाचे निमंत्रक अविनाश पाटील, विदर्भ विभाग संघटक गौरव आळणे, मंचाचे कार्यकर्ते संदीप के, प्रदीप हिवाळे, विशाल विमल उपस्थित होते. 'सरकारने भारतीय संविधानातील व्या कमलानुसार व्यसनाचे नियंत्रण, निर्धारण धोरण राबविण्याची गरज आहे. मात्र व्यसनाच्या विळख्यातून महाराष्ट्राला बाहेर काढण्याऐवजी दारु, तंबाखू, ड्रग्सच्या खाईत अधिकाधिक लोटणारे अत्यंत समाज घातकी निर्णय सरकारने घेतले आहेत. त्याचा आम्ही व्यसन मुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाच्या वतीने जाहीर निषेध व विरोध करीत आलो आहोत', असे प्रतिपादन मंचाचे निमंत्रक अविनाश पाटील यांनी परिषदेत केले. केंद्राच्या नशा मुक्त भारत धर्तीवर व्यसन मुक्त महाराष्ट्र अभियान राबवावे. दारू, गुटखा बंदी ड्रग्ज सोबतच याबाबतचे धोरणाचे पुनर्निधारण करावे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा विषयक कायदे तज्ञ व व्यसन मुक्तीतील प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा समिती नेमण्यात यावी. वैध दारू विक्रीचे परवाने असलेल्या दुकाने, हॉटेलांमधून अल्पवयीन मुलांच्या व्यसनातून गुन्हेगारी, अपघातानंतर नियंत्रणासाठी असलेल्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी. अवैध दारू निर्मिती, वितरण आणि विक्रीचे संपूर्णता निर्मूलन करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करावी. चंद्रपूर जिल्ह्यातील लोक आग्रहाने लागू झालेली दारू बंदी उठविण्याचा निर्णय त्वरित मागे घ्यावी. धान्यापासून दारू निर्मितीला दिलेल्या परवानगी रहित कराव्यात. विदेशी दारूवरील ३००% कर कमी करून १५०% करण्यात आला आहे, तो कर पूर्वस्थित करावा. किरणा दुकानावर वाईन विक्री बाबतच्या चर्चा बंद करून राज्याचे बिघडलेले समाज स्वाथ्य दुरुस्त करण्याच्या उपाययोजना लागू कराव्यात, आदी मागण्या मंचाच्या वतीने अविनाश पाटील यांनी केल्या आहेत. महाराष्ट्राच्या सरकारने मंजुर केलेले व्यसन मुक्ती धोरणाची वर्षांनंतर तरी प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या पुढाकाराने नशा मुक्त भारत अभियान २०२० सालापासून देशातील काही राज्यांच्या काही जिल्ह्यातून राबविण्यात येत आहे. त्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यातून व्यसन मुक्त महाराष्ट्र अभियान राबविण्याविषयी आखणी करावी, अशी मागणी आहे. त्यासाठी व्यसन मुक्त महाराष्ट्र समन्वय मंचातील सहभागी १०० पेक्षा जास्त जनसंघटना, संस्था, गट, व्यसन विरोधी प्रचार प्रसार, व्यसन बंदी, व्यसनावरील उपचार आणि व्यसन विरोधी धोरण-कायदे-योजना संबंधातील आपला अनुभव, तज्ञता, संपर्कसह राज्य सरकारसोबत काम करायला तयार आहे. व्यसन मुक्तीसाठी दारू, गुटखा यासह इतर व्यसनवर्धक पदार्थांच्या निर्मिती, वितरण व विक्री बाबतचे धोरण ड्रग्ज नियंत्रणाच्या धोरणा प्रमाणेच अधिक कठोर, नेमके व सर्वांगिण करावे, अशीही मागणी आहे.




## पत्रकार परिषद आणि निदर्शनात मागणी

### व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंच

महाराष्ट्रातील दारूबंदी कायदा अंमलबजावणीचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कायदे तज्ञ, प्रशासनातील अभ्यासक आणि दारूबंदी, व्यसन मुक्त क्षेत्रातील कार्यरत अनुभवी कार्यकर्त्यांची समन्वय समिती गठीत करून निधारीत कामकाज करण्याची गरज आहे. महाराष्ट्र राज्याच्या उत्पादन शुल्क विभागामार्फत कायदेशीर परवाना दिलेल्या वैध दारू विक्रीचे दुकाने, हॉटेलांमधून अल्पवयीन मुलांना, व्यसन उपलब्ध करून दिल्यामुळे अनेक गुन्हेगारी व अपघातांचे प्रमाण वाढते आहे. विद्यमान काळात अशा अनेक घटना महानगरांपासून खेडे गावापर्यंत अनेक ठिकाणी घडत आहेत. त्यानिमित्ताने संबंधित जबाबदार, यंत्रणातील घटकांचे भ्रष्ट व बेकादेशीर वर्तन, व्यवहार जगासमोर येत आहे.

महाराष्ट्राच्या प्रतिमेला व माणुसकीला काळिमा फासणारा सदर प्रकार आहेत.

त्यामुळे त्यावर कठोर कारवाई केली जाणे अपेक्षित आहे. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित समाज समूहाचे आणि शासकीय यंत्रणांचे प्रबोधन प्रशिक्षण होणे देखील आवश्यक आहे.

त्याची कार्य योजना आखण्यात अयावी, अशी मागणी आहे.